प्रकरण १

# १

# आंतरराष्ट्रीय व्यापाराची ओळख / प्रस्तावना

**घटक रचना :**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय ?

१.४ आंतरराष्ट्रीय व्यापाराची वैशिष्टये

१.५ आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे आणि तोटे

१.६ रिकार्डो यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत

१.७ हेक्श्वर ओहलीन यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत

१.८ सारांश

१.९ प्रश्न

## १.१ प्रस्तावना

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात त्या देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. कारण जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून आपली निर्यात ही मोठया प्रमाणावर वाढते तेव्हा देशाला मोठया प्रमाणावर परकीय चलन मिळते आणि परिणामी आपला व्यापारशेष हा अनुकूल बनतो. तसेच आयातीच्या माध्यमातून गरीब व विकसनशील देशांना विकसित देशातील आधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रांची मोठया प्रमाणावर आयात करता येते आणि त्या देशांच्या आर्थिक विकासाला हातभार लागतो. आधुनिक काळात तर प्रत्येक देशाच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय व्यापाराची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे.

## १.२ उद्दिष्टे

- आंतरराष्ट्रीय व्यापार ही संकल्पना समजावून घेणे
- आंतरराष्ट्रीय व्यापाराची वैशिष्टये समजावून घेणे.
- आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे व तोटे जाणून घेणे
- रिकोर्डो यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांताचा अभ्यास करणे.

munotes.in

## १.३ आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय ?

जेव्हा दोन किंवा दोनपेक्षा जास्त देशांमध्ये व्यापार चालतो तेव्हा त्या व्यापाराला आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात. १७५० ते १८५० या काळात प्रामुख्याने इंग्लंडमध्ये प्रथम औद्योगिक क्रांती मोठया प्रमाणावर झाली आणि या औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडमध्ये विविध वस्तूंचे उत्पादन हे मोठया प्रमाणावर वाढले. हे सर्व उत्पादन खपणे गरजेचे होते आणि तिथूनच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय व्यापाराला सुरुवात झाली. पण खऱ्या अर्थाने २० व्या शतकात संपूर्ण जगभर आंतरराष्ट्रीय व्यापाराचा प्रसार झाला.

## १.४ आंतरराष्ट्रीय व्यापाराची वैशिष्टये

**अ) एक स्वतंत्र विषय :-**

आंतरराष्ट्रीय व्यापार हा आज एक स्वतंत्र विषय म्हणून अस्तित्वात आला आहे. यामध्ये आयात व निर्यात यांचा अभ्यास केला जातो.

**ब) आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतांचा अभ्यास :-**

आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयामध्ये विविध अर्थतज्ज्ञांच्या आर्थिक विकास सिद्धांतांचा अभ्यास केला जातो.

**क) व्यापारविषयक संबंधांचा अभ्यास :-**

आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयामध्ये एका देशाचे दुसऱ्या देशांशी असणाऱ्या व्यापारविषयक संबंधांचा अभ्यास करावा लागतो.

**ड) विदेशी चलन बाजाराचा अभ्यास :-**

आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयामध्ये विदेशी विनिमय बाजाराचा अभ्यास केला जातो. कारण आंतरराष्ट्रीय व्यापारात विदेशी विनिमय बाजाराची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे.

**इ) व्यापार अटींचा अभ्यास :-**

आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयामध्ये व्यापार अटींचा अभ्यास करावा लागतो तसेच या व्यापार अटींचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो याचाही अभ्यास केला जातो.

**ई) व्यापारतोलाचा अभ्यास केला जातो :-**

या विषयामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारातून जे देण्याघेण्याचे व्यवहार निर्माण होतात त्यांचा अभ्यास केला जातो.

munotes.in

### उ) आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या कार्याचा अभ्यास :-

आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयामध्ये जागतिक स्तरावर चालणाऱ्या आयात - निर्यात व्यापाराला मदत करणाऱ्या जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना इ. वित्तीय संस्थांचा अभ्यास केला जातो.

## १.५ आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे / गरज / महत्त्व

आंतरराष्ट्रीय व्यापार हा दोन किंवा दोनपेक्षा जास्त देशांमध्ये चालतो. या व्यापारात आयात आणि निर्यात यांचा समावेश होतो. सर्वसाधारणपणे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे पुढील फायदे आहेत.

### १) दुर्गम भागातून दुर्लक्षित मालाची निर्यात :-

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे गरीब आणि विकसनशील देशांना त्यांच्या दुर्गम भागातून दुर्लक्षित मालाची निर्यात ही श्रीमंत  देशांना केली जाते.

### २) देशातील आयातीचे देणे भागविण्यासाठी :-

गरीब आणि विकसनशील देश हे श्रीमंत देशांकडून आधुनिक तंत्रज्ञानाची आयात करतात आणि त्या बदल्यात गरीब देश श्रीमंत देशांना प्राथमिक वस्तूची निर्यात करून आयातीचे देणे भागवितात.

### ३) देशांतर्गत मालास जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे :-

गरीब आणि विकसनशील देश आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे त्यांचा माल जागतिक स्तरावर निर्यात करतात व त्यांच्या मालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध होते.

### ४) देशाचा सांस्कृतिक विकास :-

दोन देशांमध्ये जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापार होतो तेव्हा सर्व देशांचा सांस्कृतिक  विकास होतो. या देशात आंतरराष्ट्रीय व्यापाराबरोबरच सांस्कृतिक संबंध, सहकार्य आणि मैत्रीचे संबंध निर्माण होतात. तसेच देशादेशांमध्ये सांस्कृतिक बाबींचे आदानप्रदान होते.

### ५) देशातील मक्तेदारी नष्ट होते :-

मक्तेदारीत मक्तेदार हा त्याच्या वस्तूची जादा किंमत आकारून ग्राहकांची पिळवणूक करतो तसेच तो पुरवठ्यावर नियंत्रण ठेवतो. हे सर्व टाळण्यासाठी सरकार परदेशातून वस्तूंची आयात करून या मक्तेदारीवर आळा घालते आणि ग्राहकांचा फायदा होतो.

### ६) श्रमविभागणी आणि उत्पादन तंत्रात सुधारणा :-

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे निर्यात वाढविण्यासाठी उत्पादन क्षेत्रात श्रमविभागणी या तत्त्वाचा अवलंब केला जातो.  तसेच निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंचा दर्जा सुधारण्यासाठी मोठया प्रमाणात उत्पादन तंत्रात सुधारणा केली जाते.

munotes.in

**७) आंतरराष्ट्रीय समन्वय प्रस्थापित करण्यासाठी :-**

देशादेशात निर्माण होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विविध देशात प्रस्थापित होतो.

**८) व्यापारात गुणात्मक बदल केला जातो :-**

आयात निर्यात व्यापारात आपली निर्यात वाढविण्यासाठी प्रत्येक देश हा प्रयत्नशील असतो आणि ही निर्यात वाढविण्यासाठी आपल्या उत्पादित वस्तूची गुणवत्ता वाढविण्याचा प्रत्येक देश प्रयत्न करीत असतो.

**९) संकटकाळी मदत :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असणारे देश कालांतराने एकमेकांचे घनिष्ट मित्र बनतात. आणि या मैत्रीचा फायदा हा महापूर, दुष्काळ, भूकंप, चक्रीवादळ अशा संकटकाळी होतो.

**१०) देशाच्या आर्थिक कल्याणात वाढ :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशाला मोठया प्रमाणावर विदेशी चलन प्राप्त होते. परिणामी देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक कल्याणात वाढ होते.

**११) वस्तूंचे विनिमय मूल्य वाढते :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारात देशातील विविध गुणवत्ताप्राप्त वस्तू विक्रीसाठी उपलब्ध होतात. अशा वस्तूंची जर परदेशातून मागणी वाढल्यास त्या वस्तूंचे विनिमय मूल्य वाढते.

**१२) देशांच्या वास्तव संपत्तीत वाढ :-**

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून जर देशाची निर्यात वाढली तर देशाला मोठया प्रमाणावर परकीय चलन मिळते आणि देशाच्या वास्तव संपत्तीत वाढ होते.

**१३) एकूण उत्पादनात वाढ :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात मोठया प्रमाणावर वस्तू उपलब्ध होतात. परिणामी एकूणच जगामध्ये एकूण उत्पादनात वाढ होते.

अशा प्रकारे आंतराष्ट्रीय व्यापाराचे वरील सर्व फायदे आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे एक प्रकारे देशाच्या आर्थिक विकासाला मोलाची मदत होते.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराचे तोटे**

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे जसे काही फायदे आहेत तसे तोटेही आहेत. असे काही तोटे पुढील प्रमाणे आहेत.

**१) आर्थिक परावलंबन :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारात विशेषतः गरीब आणि विकसनशील देश हे विकसित देशांकडून विविध वस्तूंची मोठया प्रमाणावर आयात करतात. परिणामी त्यांचे आयात मूल्य वाढते. आणि त्या बदल्यात फक्त प्राथमिक वस्तूंची निर्यात करतात त्यामुळे मूल्य कमी होते.

**२) महामंदीची भीती :-**

जर एखाद्या देशाची आयात सातत्याने वाढत गेली तर त्या देशाचे आर्थिक परावलंबन हे वाढत जाते. १९९२ च्या जागतिक महामंदीमुळे अमेरिकेतील उत्पादीत वस्तूंच्या किमतपातळीत झालेल्या ऱ्हासाचा परिणाम हा अमेरिकेवर अवलंबून असलेल्या इतर देशांना भोगावा लागला. त्यामुळे इतर देशांचेही नुकसान झाले.

**३) धोकादायक आणि अपायकारक वस्तूंची आयात व निर्यात :-**

बऱ्याच वेळा विकसित देश अविकसित देशांना वेगवेगळ्या चोरटया मार्गाने धोकादायक आणि अपायकारक वस्तू पाठवितात. उदा. आर. डी. एक्स., ए.के. ४७, चोरटे सोने, अंमली पदार्थ इ. ची आयात केली जाते. त्यामुळे देशाला व देशातील शांततेला बाधा निर्माण होते.

**४) नैसर्गिक संपत्तीचा अपव्यय :-**

आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला तर देशात विविध वस्तूंचे उत्पादन मोठया प्रमाणावर उत्पादन केले जाते. परिणामी देशातील साधनसंपत्तीचा मोठया प्रमाणावर अपव्यय होण्याची शक्यता असते.

**५) देशांतर्गत उद्योगांचा ऱ्हास :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारात गरीब देश हे विकसित देशांकडून मोठया प्रमाणावर विविध वस्तूंची आयात करतात. विकसित देशातील वस्तू या उत्कृष्ट दर्जाच्या आणि कमी किमतीत मिळत असल्याने गरीब देशातील लोक या वस्तूंची मागणी करतात. आणि यामुळे देशातील उद्योगांचा ऱ्हास होतो.

**६) स्पर्धा आणि वैमनस्य यात वाढ होते :-**

कधी - कधी आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे स्पर्धा व वैमनस्य यामध्ये वाढ होते. उदा. भारताचा रशियासोबत दीर्घ मुदतीचा करार झाल्याबरोबर अमेरिकेने पाकिस्तानला आर्थिक आणि शस्त्रास्त्रविषयक मदत देणे सुरु केले.

**७) देशाचा एकांगी विकास :-**

ज्या वस्तूंची मोठया प्रमाणात निर्यात होते त्या उद्योगाच्या विकासासाठी प्रयत्न केला जातो. आणि ज्या वस्तूंची निर्यात कमी होते अशा उद्योगांचा विकास होत नाही.

munotes.in

**८) विदेशी वस्तू वापरण्याची शक्यता :-**

सततच्या आयातीमुळे देशातील लोकांना विदेशी वस्तू वापरण्याची सवय लागण्याची शक्यता असते. परिणामी सातत्याने आयात वाढून व्यवहार तोल बिघडण्याची शक्यता असते.

**९) देशासाठी स्पर्धावृत्ती मारक असते :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्पर्धा ही कधी - कधी देशहितासाठी मारक ठरते. कारण कधी - कधी ही स्पर्धा गळेकापू स्वरूप धारण करते. आणि यामुळे गरीब देशांचे नुकसान होते.

**१०) राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येते :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विदेशात कंपन्यांनी संरक्षणविषयक वस्तूंचे उत्पादन सुरु केल्यास देशाची राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येऊ शकते.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे वरील सर्व तोटे असल्याचे आपल्याला दिसून येते.

## १.६ रिकार्डो यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत

रिकोर्डो यांनी मांडलेला आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत हा तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांत म्हणून ओळखला जातो. जर एखाद्या देशात दोन वस्तू या दुसऱ्या देशातील त्याच प्रकारच्या दोन वस्तूंच्या उत्पादन खर्चापेक्षा कमीतकमी उत्पादन खर्चात तयार होत असतील तर त्या दोन देशात आंतरराष्ट्रीय व्यापार होईल का ? असा जेव्हा प्रश्न निर्माण झाला तेव्हा तेव्हा त्याला उत्तर देण्यासाठी रिकार्डो यांनी हा सिद्धांत मांडला . त्यासाठी त्यांनी पुढील उदाहरण घेतले.

उदाहरणार्थ, समजा रिकार्डो यांच्या मते पोर्तुगाल या देशाला मद्य आणि कापड निर्मितीसाठी इंग्लंडपेक्षा कमी खर्च येतो तर इंग्लंडला या दोन्हीही वस्तूंच्या उत्पादनासाठी पोर्तुगालपेक्षा जास्त खर्च येतो तर अशा स्थितीत या दोन देशांमध्ये व्यापार होणार का ? तसेच व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर होईल का ? याचे विश्लेषण पुढील उदाहरण देऊन स्पष्ट करता येईल.

| देश | मद्य उत्पादन खर्च | कापड उत्पादन खर्च |
|---|---|---|
| पोर्तुगाल | ८० श्रम तास | ९० श्रम तास |
| इंग्लंड | १२० श्रम तास | १०० श्रम तास |

रिकार्डोने दिलेल्या वरील उदाहरणावरून असे दिसते की, पोर्तुगाल या देशाला मद्य आणि कापड या दोन्ही वस्तूंच्या उत्पादनासाठी इंग्लंडपेक्षा कमी खर्च येतो. त्यामुळे अशा स्थितीत या दोन देशात आंतरराष्ट्रीय व्यापार होणार का ? याचे स्पष्ट्रीकरण पुढीलप्रमाणे देता येईल .


यासाठी प्रथम आपण दोन्ही देशातील मद्य आणि कापड या दोन्ही वस्तूंच्या देशांतर्गत विनिमय दर पाहू. पोर्तुगालमध्ये १ परिणाम मद्य निर्मितीसाठी ८० श्रम तास लागतात तर १ परिणाम कापड निर्मितीसाठी ९० श्रम तास लागतात. म्हणून पोर्तुगालमध्ये १ परिणाम मद्याच्या मोबदल्यात ८०÷ ९० = ०.८९ परिमाण इतके कापड मिळेल. तर एक परिमाण कापडाच्या मोबदल्यात ९० ÷ ८० = १.१२ परिमाण मद्य मिळेल.

तर इंग्लंडमध्ये १ परिमाण मद्य निर्मितीसाठी १२० श्रम तास खर्च येतो. त्यामुळे इंग्लंडमध्ये १ परिमाण कापडाच्या मोबदल्यात १०० ÷ १२०= ०.८३ परिमाण मद्य मिळेल. तर १ परिमाण मद्याच्या मोबदल्यात इंग्लंडमध्ये १२० ÷ १०० = १.२० परिमाण कापड मिळेल.

समजा पोर्तुगालने मद्य निर्मितीत व इंग्लंडने कापड निर्मितीत विशेषीकरण केल्यास पोर्तुगालला १ परिमाण मद्याच्या मोबदल्यात इंग्लंडकडून १.२० परिमाण कापड मिळणार आहे पण पोर्तुगालमध्ये हे प्रमाण फक्त ०.८९ परिमाण कापड इतकेच आहे. त्यामुळे पोर्तुगालने कापड उत्पादनाच्या फंदात न पडता इंग्लंडकडून कापड आयात करावे. तसेच इंग्लंडमध्ये १ परिमाण कापडाच्या मोबदल्यात ०.८९ परिमाण मद्य मिळते तर पोर्तुगालमध्ये हेच मद्य १.१२ परिमाण मिळते. त्यामुळे इंग्लंडने मद्याचे उत्पादन न करता हेच मद्य पोर्तुगालकडून आयात करावे आणि आंतरराष्ट्रीय व्यापार सुरु करावा.

munotes.in

**आकृती १.१**




वरील आकृतीत OX अक्षावर मद्य परिमाणाचे मोजमाप दर्शविले आहे तर OY अक्षावर कापड परिमाणाचे मोजमाप करण्यात आले आहे. PB. या रेषेने इंग्लंडमधील विनिमय दर दर्शविण्यात आला आहे. तर DB या रेषेने इंग्लंडमधील विनिमय दर दर्शविण्यात आला आहे. तर KB या रेषेने आंतरराष्ट्रीय विनिमय दर दर्शविण्यात आला आहे.

**टिका:-**

१) या सिद्धांतात रिकार्डोने केवळ श्रमाचा विचार केला आहे. इतर उत्पादन घटकांचा विचार केला नाही.

२) दोन देश आणि वस्तू एवढाच विचार केला आहे.

३) हा सिद्धांत मांडताना अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असतो असे गृहीत धरले आहे. पण प्रत्यक्षात अर्थव्यवस्थेचे संतुलन हे अपूर्ण रोजगार पातळीला असते.

४) रिकार्डोने आपला सिद्धांत मांडताना वाहतूक खर्चाचा विचार केला नाही.

असे असले तरी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संबंधात अडम स्मिथच्या पुढे एक पाऊल पुढे जाऊन रिकार्डोने आपला सिद्धांत मांडला आहे. रिकार्डोनंतर ज्या - ज्या अर्थतज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत मांडला त्या सर्वांनी रिकार्डोच्या सिद्धांताचा आधार घेतला आहे.

## १.७ हेक्श्चर ओहलीन यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत

हेक्श्चर ओहलीन यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे विश्लेषण करण्यासाठी सामान्य संतुलन सिद्धांताचा वापर केला आहे व त्यांचे असे म्हणणे आहे की, अंतर्गत व्यापार सिद्धांतच आंतरराष्ट्रीय व्यापारास लागू करता येतो.

सिद्धांताची गृहिते

१) सदर विश्लेषणात केवळ दोन देशांचाच विचार केला आहे.

२) या देशांमध्ये उत्पादन घटक गतिशील नसतात.

३) हे उत्पादन घटक एकजिनसी असून निरनिराळ्या प्रदेशात सारखे असतात.

४) या उत्पादन घटकांच्या सहाय्याने हे देश वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करतात.

५) कोणत्याही देशात वस्तूचे उत्पादन फलन समान असते.

ओहलीनचा सिद्धांत पुढीलप्रमाणे आहे.

'अ' आणि 'ब' देशात भिन्न - भिन्न उत्पादन घटकांची उपलब्धता आहे. त्यामुळे मुलभूत उत्पादन घटकांच्या किंमतीही दोन देशात भिन्न - भिन्न आहेत. 'अ' देशात भूमीचा पुरवठा विपुल असल्याने ती बरीच स्वस्त आहे. तर श्रम हा घटक दुर्मिळ असल्याने तो बराच महाग आहे. याउलट 'ब' देशात भूमी हा घटक दुर्मिळ असल्याने तो महाग आहे. तर श्रम हा घटक विपुल असल्याने तो बराच स्वस्त आहे.

पुढील कोष्टकात 'अ' आणि 'ब' देशातील वेगवेगळ्या उत्पादन घटकांचा खर्च दर्शविण्यात आला आहे.

| **उत्पादन घटक** | **'अ' देश** | **'ब' देश** |
|---|---|---|
| भूमी | १०/ रुपये | १००/ रुपये |
| श्रम | १००/ रुपये | १००/ रुपये |
| भांडवल | ५०/ रुपये | ५२ / रुपये |



munotes.in

तसेच 'अ' आणि 'ब' हे दोन्ही देश दूध आणि कापडाचे उत्पादन करतात. त्या दोन्ही देशांना या दोन्ही वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणारे उत्पादन घटक पुढीलप्रमाणे आहेत.

| **उत्पादित वस्तू** | **भूमी** | **श्रम** | **भांडवल** |
|---|---|---|---|
| १०० लिटर दूध उत्पादन खर्च | १० मात्रा | ०१ मात्रा | ०१ मात्रा |
| १०० मीटर कापड उत्पादन खर्च | ०१ मात्रा | १० मात्रा | ०२ मात्रा |

वरील दोन्ही कोष्टकावरून काही नवीन कोष्टके पुढीप्रमाणे तयार करता येतील कि, ज्यामध्ये ‘अ’ देशातील १०० लिटर दुशाचा उत्पादन खर्च आणि ‘ब’ देशातील १०० लिटर दुशाचा उत्पादन खर्च तसेच ‘अ’ देशातील १०० मीटर कापडाचा उत्पादन खर्च आणि ‘ब’ देशातील १०० मीटर कापडाचा उत्पादन खर्च पुढीलप्रमाणे आहे.

‘अ’ देशातील १०० लिटर दुशाचा उत्पादन खर्च

| **उत्पादन घटक** | **लागणारे उत्पादन घटक** | **घटकाची प्रतिनग किंमत** | **घटकांवर होणारा खर्च रुपये** |
|---|---|---|---|
| भूमी | १० नग | १० | १० x १० = १०० |
| श्रम | १ नग | १०० | १० x १० = १०० |
| भांडवल | ०१ नग | ५० | ०१ x ५० = ५० |

म्हणजेच एकूण उत्पादन खर्च = २५०/ रुपये

वरील उदाहरणावरून आपण आता ‘अ’ देशातील १०० लिटर दुधाचा उत्पादन खर्च = १०० + १०० +५० = २५०/ रुपये इतका असेल. तसेच ‘अ’ देशात एक लिटर दुधाचा उत्पादन खर्च २५०/१००=२.५० रुपये इतका असेल. यानंतर आपण ‘ब’ देशातील १०० लिटर दुधाचा उत्पादन खर्च पाहूया.

| **उत्पादन घटक** | **लागणारे उत्पादन घटक** | **घटकाची प्रतिनग किंमत रुपये** | **घटकांवर होणारा खर्च रुपये** |
|---|---|---|---|
| भूमी | १० नग | १००/ | १०००/ रुपये |
| श्रम | ०१ नग | १०/ | १०/ रुपये |
| भांडवल | ०१ नग | ५२/ | ५२/ रुपये |

एकूण उत्पादन खर्च = १०६२/ रुपये

आपल्या वरील उदाहरणावरून ‘ब’ देशाचा १०० लिटर दुधाचा एकूण उत्पादना खर्च हा १०६२/ रुपये इतका असेल आणि एक लिटर दुधाचा उत्पादन खर्च हा १०६२/१००=१०.६२ रुपये इतका असेल.

munotes.in

यावरून एक गोष्ट लक्षात येते व ती म्हणजे 'अ' देशात दुधाचे उत्पादन करण्यासाठी लागणारे उत्पादना घटक हे कमीत कमी खर्चात उपलब्ध होत असल्याने 'अ' देशातील दूध उत्पादन हे फायदेशीर आहे. याउलट 'ब' देशात दूध उत्पादनासाठी लागणाऱ्या उत्पादन घटकांचा खर्च जास्त आहे.

यानंतर आपण 'अ' आणि 'ब' या दोन्ही देशातील १०० मीटर कापडाचा उत्पादन खर्च पाहू.

पहिल्यांदा आपण 'अ' देशातील १०० मीटर कापडाच्या उत्पादनासाठी येणारा खर्च पाहूया.

| **उत्पादन घटक** | **लागणारे उत्पादन घटक** | **घटकाची प्रतिनग किंमत रुपये** | **घटकांवर होणारा खर्च रुपये** |
|---|---|---|---|
| भूमी | ०१ मात्रा | १०/ रुपये | १०/ रुपये |
| श्रम | १० मात्रा | १००/ रुपये | १०००/ रुपये |
| भांडवल | ०२ मात्रा | ५०/ रुपये | १००/ रुपये |

एकूण उत्पादन खर्च रुपये = १११०/ रुपये

आपल्या वरील उदाहरणात 'अ' देशात १०० मीटर कापडाचा एकूण उत्पादन खर्च हा १११०/रुपये इतका असेल तर प्रतिमिटर कापडाचा उत्पादन खर्च हा १११०/१००=११.१०/रुपये इतका असेल.

आता आपण 'ब' देशातील १०० मीटर कापडाचा उत्पादन खर्च पाहू.

| **उत्पादन घटक** | **लागणारे उत्पादन घटक** | **घटकाची प्रतिनग किंमत रुपये** | **घटकांवर होणारा खर्च रुपये** |
|---|---|---|---|
| भूमी | ०१ मात्रा | १००/ रुपये | १००/ रुपये |
| श्रम | १० मात्रा | १०/ रुपये | १००/ रुपये |
| भांडवल | ०२ मात्रा | ५२/ रुपये | १०४/ रुपये |

एकूण उत्पादन खर्च =३०४/ रुपये

त्यामुळे 'ब' देशात एक मीटर कापडाचा उत्पादन खर्च ३०४/१००=३.४ रुपये इतका असेल.

यावरून ओहलीन म्हणतो कि, देशात दुधाचा उत्पादन खर्च कमी आहे तर 'ब' देशात दुधाचा उत्पादन खर्च जास्त आहे. याउलट 'ब' देशात कापडाचा उत्पादन खर्च कमी आहे तर 'अ' देशात कापडाचा उत्पादन खर्च जास्त आहे.

त्यामुळे 'अ' देशाने 'ब' देशातून कापड आयात करावे आणि 'ब' देशाने 'अ' देशातून दूध आयात करावे आणि अशाप्रकारे दोन्ही देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी व्हावे असे ओहलीन यांनी सांगितले आहे.

## १.८ सारांश

दोन किंवा दोनपेक्षा जास्त देशांमध्ये चालणाऱ्या व्यापारास आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात. आंतरर्राष्ट्रीय व्यापारामुळे देशाच्या आर्थिक विकासाला मोठया प्रमाणात चालना मिळते. विशेषत: जे गरीब आणि विकसनशील देश आहेत ते त्यांच्या देशातून प्राथमिक वस्तूंची निर्यात विकसित देशांना करतात आणि त्या बदल्यात विकसित देशांकडून आधुनिक यंत्रसामुग्री आणि आधुनिक तंत्रज्ञानाची आयात मोठया प्रमाणावर करतात. याचा एकत्रित परिणाम होऊन विकसनशील देशांना अर्थात औद्योगिक विकासाची संधी उपलब्ध होते.

आंतरर्राष्ट्रीय व्यापार का? आणि कसा सुरु होतो या संदर्भात अनेक अर्थतज्ञांनी अनेक सिद्धांत मांडले. रिकार्डो यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांत मांडला तर ओहलीन यांनी घटक विपुलता हा सिद्धांत मांडला.

विशेषत: भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर आपला आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

## १.९ प्रश्न

१) आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय ते सांगून त्यांची वैशिष्टये स्पष्ट करा.

२) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे व तोटे विषद करा.

३) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा रिकार्डो यांचा सिद्धांत स्पष्ट करा.

४) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हेक्श्वर ओहलीन यांचा सिद्धांत स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

# २

## व्यापारशर्ती किंवा व्यापारअटी

**घटक रचना**


२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ व्यापारशर्ती म्हणजे काय ?

२.४ व्यापारशर्तीचे प्रकार

२.५ व्यापरशर्तीच्या मर्यादा

२.६ व्यापरशर्तीवर परिणाम करणारे घटक

२.७ प्रदान वक्र म्हणजे काय ?

२.८ अन्योन्य मागणी वक्र म्हणजे काय ?

२.९ सारांश

२.१० प्रश्न


munotes.in

## २.१ उद्दिष्टे

- व्यापरशर्ती ही संकल्पना समजावून घेणे
- व्यापारशर्तीचे प्रकार समजावून घेणे
- व्यापारशर्तीच्या मर्यादा समजावून घेणे
- आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे ठरविणारे घटक जाणून घेणे
- प्रदान वक्राची संकल्पना समजावून घेणे
- अन्योन्य मागणी वक्राची संकल्पना समजावून घेणे

## २.२ प्रस्तावना :-

२१ व्या शतकात म्हणजे साधारणपणे जगातील बहुसंख्य देशांनी जेंव्हा जागतिकीकरणाची संकल्पना स्विकारली तेंव्हापासून आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली . तसेच भौगोलिक विशेषीकरण आणि तुलनात्मक खर्चाच्या फायद्यांमुळे अनेक देशांना या

आंतरराष्ट्रीय व्यापारातून मोठ्या प्रमाणावर फायदेही मिळाले आहेत. आणि हे फायदे समजावून घेण्यासाठी आपल्याला व्यापारशर्ती ही संकल्पना जाणून घेणे गरजेचे आहे. त्यामुळेच आपण सदर प्रकरणात व्यापारशर्ती , तिचे प्रकार आणि मर्यादा यांचा अभ्यास करणार आहोत.

## २.३ व्यापारशर्ती म्हणजे काय:-

आंतरराष्ट्रीय व्यापारात ज्या मूल्यावर वस्तूंची देवाणघेवाण होते त्याला ' आंतरराष्ट्रीय विनिमय गुणोत्तर ' किंवा व्यापारअटी असे म्हणतात. अर्थात हे मूल्य देशात निर्धारित होणाऱ्या बाजार मूल्यापेक्षा भिन्न असते. उदा . जर जर्मनीला इंग्लंडला ५००० मीटर ज्यूट कापड पाठवून त्याबदल्यात इंग्लंड जर्मनीला १०००० मीटर लोकरी कापड पाठवित असेल तर व्यापार अट ही ५००० मीटर : १०००० मीटर म्हणजेच १ : २ ( एकास दोन ) अशी होईल. कोणत्याही देशाच्या वस्तूचे आयात मूल्य आणि निर्यात मूल्य यांच्या संबधाला व्यापार अट म्हणतात. व्यापार अटींचे समीकरण पुढीलप्रमाणे आहे .

व्यापारअटी = आयातीचे समस्त मूल्य / निर्यातीचे समस्त मूल्य

### अनुकूल व्यापारअटी किंवा व्यापारशर्ती :--

जेंव्हा एखाद्या देशाच्या आयात मूल्यापेक्षा निर्यात मूल्य अधिक असते तेंव्हा त्याला अनुकूल व्यापार अटी असे म्हणतात .

### प्रतिकूल व्यापारअटी किंवा व्यापारशर्ती :--

जेंव्हा एखाद्या देशाच्या आयात मूल्यापेक्षा निर्यात मूल्य कमी असते तेंव्हा त्याला प्रतिकूल व्यापारअटी असे म्हणतात .

## २.४ व्यापारअटींचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत

### अ ) निव्वळ वस्तूगत व्यापारअटी किंवा व्यापारशर्ती :--

व्यापारशर्तींची ही संकल्पना अगदी सामान्य आहे. ही संकल्पना टॉसिग आणि वायनर यांनी मांडली . यामध्ये निर्यात किंमत व आयात किंमतीचे प्रमाण पाहिले जाते पुढील सूत्राने या प्रकारच्या व्यापारशर्ती मोजल्या जातात .

NBTT = XP / MP यामध्ये NBTT म्हणजे निव्वळ वस्तूगत व्यापारशर्ती, XP म्हणजे निर्यातीची किंमत आणि MP म्हणजे आयातीची किंमत.

### ब) स्थूल वस्तूगत व्यापारशर्ती :--

टॉसिग व वायनर यांनी ही संकल्पना मांडली. यामध्ये आयातीच्या नगसंख्येचे निर्यातीच्या नगसंख्येशी असणारे प्रमाण पाहिले जाते. निव्वळ वस्तूगत व्यापारशर्तीमधील दोष दूर करण्यासाठी ही संकल्पना मांडण्यात आली. पुढील सूत्राच्या सहाय्याने या व्यापारशर्ती मोजल्या जातात.

GBTT = Mq / Xq  यामध्ये GBTT म्हणजे स्थूल वस्तूगत व्यापारशर्ती,  Mq म्हणजे आयातीचे प्रमाण आणि Xq म्हणजे निर्यातीचे प्रमाण होय .

**क) उत्पन्न व्यापारशर्ती :--**

प्रा. जी. एस . डोरांस यांनी ही संकल्पना मांडली. ती पुढील सूत्राने मांडता येते .

ITT= xq  ( XP / Mp ) यामध्ये ITT म्हणजे उत्पन्न व्यापारशर्ती, XQ म्हणजे निर्यातीची किंमत , MP म्हणजे आयातीची किंमत आणि XP म्हणजे निर्यातीचे प्रमाण.

**ड) एक घटकीय व्यापारशर्ती :-**

एक घटकीय व्यापारशर्ती ही संकल्पना पुढील सूत्राने मांडली जाते.

SFTT = Px / Pm × Fx  यामध्ये SFTT म्हणजे एक घटकीय व्यापारशर्ती , Px म्हणजे निर्यात किंमत निर्देशांक ,Pm म्हणजे आयात किंमत निर्देशांक आणि Fx म्हणजे घटक किंमत निर्देशांक.

**इ ) स्थूल विनिमय व्यापारशर्ती :--**

ह्या व्यापारशर्तींचा संबंध हा वस्तूंच्या किंमतीऐवजी वस्तूंच्या नगसंख्येशी असतो. यामध्ये वास्तव निर्यात नगसंख्या आणि वास्तव आयात नगसंख्या यांचा विचार केला जातो. हे पुढील सूत्रांनी मांडले जाते.

G = ge1 / gl1 : ge1 / gl0   यामध्ये G = स्थूल विनिमय व्यापारशर्ती , gl1म्हणजे चालू काळातील आयात नगसंख्या , ge0  म्हणजे आधार काळातील नगसंख्या आणि gl0 म्हणजे आधार काळातील आयात नगसंख्या होय .

## २.५ व्यापारशर्तीच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत

**अ) देशाच्या निर्यातीची माहिती मिळत नाही :-**

व्यापारशर्ती केवळ दोन देशातील आयात व निर्यात यांच्या किंमतीचे गुणोत्तर दर्शविते . परंतु कोणत्या वस्तूंची किती आयात व निर्यात झाली हे मात्र कळू शकत नाही.

**ब) चलनमूल्याचा परिणाम :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारावर देशाच्या चलनमूल्याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. चलनाचे मूल्य अधिक असेल तर व्यापारशर्ती अनुकूल व कमी असेल तर त्या प्रतिकूल बनतात.

**क) राहणीमानाची कल्पना येत नाही. :--**

व्यापारशर्ती या केवळ आयात निर्यातीचे गुणोत्तर दर्शवितात. परंतु कोणत्या वस्तू आयात व निर्यात केल्या जातात हे दर्शवित नाही. तसेच त्या वस्तू किती प्रमाणात आयात व निर्यात केल्या जातात ते दर्शवित नाही व त्यामुळे व्यापारशर्तीमुळे देशाच्या राहणीमानाची कल्पना येत नाही.

**ड) व्यापारशर्ती ठरविणे गुंतागुंतीचे असते :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारात हजारो वस्तूंची व सेवांची आयात व निर्यात विविध देशांकडून होत असते त्यामुळे व्यापारशर्ती ठरविणे गुंतागुंतीचे असते.

**इ) आर्थिक कल्याणाची माहिती मिळत नाही :--**

व्यापारशर्तीमुळे केवळ व्यापारशर्ती अनुकूल किंवा प्रतिकूल आहेत हेच कळते. परंतु आयात व निर्यातीत कोणत्या वस्तू समाविष्ट आहेत हे कळत नसल्याने व्यापारशर्तीमुळे आर्थिक कल्याण होते की नाही हे कळू शकत नाही.

**ई) एकतर्फी :-**

व्यापारशर्ती या देशाच्या आर्थिक विकासावर अवलंबून असतात. त्यामुळे विकसित देशांना त्या नेहमीच अनुकूल तर विकसनशील देशांना नेहमीच प्रतिकूल असतात.

## २.६ व्यापारशर्तीवर परिणाम करणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत

दोन देशातील व्यापारशर्तींचा विचार करताना त्यावर परिणाम करणाऱ्या पुढील घटकांचा विचार करावा लागतो.

**अ) मागणीची लवचिकता :-**

ज्या वस्तूंची मागणी पूर्णपणे अलवचिक आहे अशा वस्तूंच्या बाबतीत त्यांच्या किंमती कितीही वाढल्या तरी त्यांची मागणी कमी होत नाही आणि व्यापारशर्ती आयातदार देशाला प्रतिकूल बनतील. याउलट ज्या वस्तूंची मागणी लवचिक असेल अशा वस्तू कमी किंमतीला आयात केल्या जातील आणि व्यापारशर्ती अनुकूल बनतील.

**ब) पुरवठ्याची लवचिकता :-**

निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंचा पुरवठा अलवचिक असेल तर व्यापारशर्ती निर्यातदार देशाला अनुकूल बनतील. आणि निर्यात वस्तूंचा पुरवठा लवचिक असेल तर व्यापारशर्ती प्रतिकूल बनतील

**क) मागणीचा प्रकार:-**

प्रभावी मागणीच्या आकारावरही व्यापारशर्ती अवलंबून असतात. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या देशात वस्तू व सेवांची प्रचंड मागणी असते. त्यामुळे अशी प्रचंड मागणी कमी किंमतीत उपलब्ध होते. आणि यामुळे आपला नफा वाढून व्यापारशर्ती अनुकूल बनतात.

**ड) निर्यातीचा प्रकार :-**

निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूला परदेशी बाजारपेठ मोठ्या प्रमाणात आणि अंतर्गत बाजारपेठ मर्यादित असेल तर व्यापारशर्ती प्रतिकूल ठरतील. कारण या वस्तू परदेशात न

खपल्यास देशात तशाच पडून राहतील. याउलट वस्तुंना देशांतर्गत बाजारपेठ मोठ्या प्रमाणावर असेल तर व्यापारशर्ती अनुकूल ठरतात.

**इ) पर्यायी वस्तूंची उपलब्धता :-**

एखाद्या देशाकडून निर्यात होणाऱ्या वस्तूला जवळचा पर्याय नसेल तर, त्या वस्तूच्या उत्पादनात त्या देशाला मक्तेदारी प्राप्त होते. आणि जादा किंमत मिळाल्याने त्या देशाच्या व्यापारशर्ती अनुकूल ठरतात.

**ई) विनिमय दर :-**

देशांना आपल्या चलनाचे मूल्य इतर देशांच्या चलनाच्या संदर्भात वाढवून अनुकूल व्यापारशर्ती प्राप्त करून घेता येतात. कारण एखाद्या देशाने चलनाच्या मूल्यात वाढ केल्यास त्या देशाच्या निर्यात किंमती मोठ्या प्रमाणावर वाढतात व व्यापारशर्ती अनुकूल बनतात.

**उ) जकात :-**

जो देश आयातीवर जकाती लावतो त्यामुळे आयात कमी होऊन व्यापारशर्ती सुधारतात. परंतु दुसरा देशही या पहिल्या देशाच्या मालावर जकाती लावतो आणि संघर्षाचे वातावरण तयार होते.

**ऊ) आर्थिक वृद्धी :-**

राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन आणि देशाच्या उत्पादन क्षमतेत वाढ होऊन व्यापारशर्तीवर अनुकूल परिणाम होतात. याउलट राष्ट्रीय उत्पन्न कमी झाल्यास व्यापारशर्ती प्रतिकूल बनतात.

**ए) चवीतील बदल :-**

देशातील लोकांच्या चवीतील बदलानेसुद्धा दुसऱ्या देशासह त्याच्या व्यापारशर्तीवर परिणाम होतो. कारण चवीतील बदलामुळे एखाद्या देशातील वस्तूंची मागणी कमी होण्याची शक्यता असते.

अशा प्रकारे एखाद्या देशाच्या व्यापारशर्तीवर वरील विविध घटकांचा परिणाम होतो.

## २.७ प्रस्ताव वक्र किंवा प्रदान वक्राची संकल्पना

मार्शल आणि एजवर्थ यांनी प्रस्ताव किंवा प्रदान वक्राची संकल्पना मांडली. ह्या संकल्पनेद्वारे मिलच्या अन्योन्य मागणी संकल्पनेचे अधिक स्पष्टीकरण केलेले आढळते. मार्शल आणि एजवर्थ यांचे विश्लेषण पुढील गृहितांवर आधारलेले आहे.

**अ) दोन देश - दोन वस्तू** **ब ) वाहतूक खर्चाचा अभाव**

**क) मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार** **ड) उत्पादन घटक गतिशीलता**

**इ) तौलनिक खर्च - लाभ** **ई) संपूर्ण विशेषीकरण**

वर उल्लेख केलेल्या गृहितांच्या चौकटीत पुढील भारत आणि इंग्लंड या दोन देशांच्या उदाहरणांच्या सहाय्याने पुढील माहितीच्या आधारावर दोन्ही देशांचे प्रस्ताव वक्र तयार करता येतील .

| वस्तू | भारत | इंग्लंड |
|---|---|---|
| गहू | ०६ नग | ०६ नग |
| कापड | १० नग | १८ नग |

उपलब्ध उत्पादन साधनांचा वापर करून भारतात ०६ नग गहू आणि १० नग कापड आणि इंग्लंडमध्ये ०६ नग गहू आणि १८ नग कापड उत्पादित केले जाते.

आंतरराष्ट्रीय व्यापार सुरू होण्यापूर्वी गहू आणि कापड या दोन वस्तूंमधील दोन्ही देशांचा अंतर्गत विनिमय दर पुढीलप्रमाणे आहे.


| | |
|---|---|
| भारत -- ०६ नग गहू | = १० नग कापड |
| इंग्लंड -- ०६ नग गहू | = १८ नग कापड |

यावरून धन किमतरेषा किंवा व्यापार होण्यापूर्वीचा किंमतीचा बोध होतो. आणि या आवाक्यातच व्यापारशर्ती ठरतात.

**भारताचा प्रस्ताव किंवा प्रदान वक्र**

विशेषीकरणानंतर भारत ६ नग गव्हाच्या बदल्यात १० किंवा त्यापेक्षा कापडाचे कमी नग स्वीकारणार नाही. कारण या दोन वस्तूंचा भारतातील विनिमय दर ६ नग गहू = १० नग कापड असा आहे. याचा अर्थ असा आहे की , भारत हा ६ नग गव्हाच्या मोबदल्यात १० नगापेक्षा जास्त कापड मिळाले तरच आंतरराष्ट्रीय व्यापारास तयार होईल अन्यतः नाही. जसजसे हा विनिमय दर भारताच्या बाजूने झुकू लागेल म्हणजेच ६ नग गहू = १२ नग कापड , ६ नग गहू = १४ नग कापड , ६ नग गहू = १६ नग कापड असा होईल तेंव्हाच भारत आंतरराष्ट्रीय व्यापारास तयार होईल . या विविध विनिमय दरासंदर्भात भारताचे निर्यात प्रस्ताव दाखविणारे बिंदू जोडल्यास भारताचा प्रस्ताव वक्र पुढीलप्रमाणे प्राप्त होतो .

**आकृती २.१**




वरील आकृतीत. OX अक्षावर कापड आणि OY अक्षावर गहू या वस्तू दर्शविल्या आहेत. ६:१०, ६:१२ , ६:१४, ६:१६ या विविध विनिमय दरांना भारताचा प्रस्ताव वक्र हा प्रामुख्याने KDE या बिंदूतून जातो.  B हा व्यापाररहित बिंदू आहे.

आता यानंतर इंग्लंडचा प्रस्ताव वक्र पाहू

भारताप्रमाणेच इंग्लंडदेखील ६ नग गव्हाच्या बदल्यात १८ नग किंवा त्याहून अधिक कापडाचे नग निर्यात करण्यास तयार होणार नाही. म्हणजेच इंग्लंड ह्यापेक्षा कमी दराने भारताशी व्यापार करण्यास तयार होईल. म्हणजेच हा दर ६ नग गहू = १६ नग कापड , ६ नग गहू = १४ नग कापड , ६ नग गहू = १२ नग कापड यापैकी असेल.  त्यामुळे इंग्लंडचा प्रस्ताव वक्र पुढीलप्रमाणे तयार होईल.


**आकृती २.२**




वरील आकृतीत OX अक्षावर कापड तर OY अक्षावर गहू आहे. तसेच ६:१८ ही इंग्लंडची व्यापाररहित रेषा आहे. कारण या ठिकाणी इंग्लंड भारताशी व्यापार करणार नाही . ६.१२, ६.१४, ६.१६ या विनिमय दराला मात्र इंग्लंड भारताशी व्यापार करेल.

आता प्रस्ताव वक्राच्या आधारे इंग्लंड व भारत या दोन्ही देशांच्या व्यापारशर्ती कशा निश्चित होतात. ते पुढील आकृतीच्या सहाय्याने पाहू.

**आकृती २.३**




munotes.in

वरील आकृतीत OX अक्षावर कापड तर OY अक्षावर गहू या वस्तू दर्शविल्या आहेत . यामध्ये गहू ही भारताची वस्तू आहे तर कापड ही इंग्लंडची वस्तू आहे. OP आणि OY हे अनुक्रमे भारत आणि इंग्लंड या दोन देशांचे प्रस्ताव वक्र आहेत. हे दोन्ही वक्र एकमेकांना S बिंदूत छेदतात . तर OM ही किमतरेषा व्यापारशर्ती दर्शविते. आंतरराष्ट्रीय विनिमय दर हा OK इतके कापड = OM इतका गहू असा निश्चित झाला आहे. आणि हा व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर ठरणारा आहे.

या ठिकाणी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे ती म्हणजे या प्रस्ताव वक्राचे स्थित्यंतर झाल्यास व्यापारशर्ती अनुकूल अथवा प्रतिकूल होतील. उदाहरणार्थ भारताचा प्रस्ताव वक्र उजवीकडे सरकल्यास व्यापारशर्ती भारताला अनुकूल होतील तर डावीकडे सरकल्यास इंग्लंडला अनुकूल होतील.

## २.८ अन्योन्य मागणीची संकल्पना

प्रसिद्ध अर्थतज्ञ जे. एस. मिल यांनी अन्योन्य मागणी ही संकल्पना मांडली. या संकल्पनेच्या आधारे व्यापारशर्ती कशा ठरतात हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मिल यांचे हे विवेचन खालील गृहितांवर आधारित आहे.

**अ) पूर्ण रोजगाराची अट** **ब) खुला विदेशी व्यापार**

**क) दोन देश व दोन वस्तूंचे प्रतिमान** **ड) पूर्ण स्पर्धा**

**इ) उत्पादन घटकांची खुली गतिशीलता इ .**


एका उदाहरणाच्या सहाय्याने ही संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करता येईल उदा. भारत व बांगला देश हे दोन्ही देश तांदूळ आणि गहू या दोन वस्तूंची निर्मिती करतात. या दोन्ही देशात दोन्ही वस्तूंचा विनिमय दर पुढीलप्रमाणे आहे.

१) भारतात १ किलो तांदूळ = १ किलो गहू

२) बांगला देशात १ किलो तांदूळ = २ किलो गहू

वरील परिस्थितीत भारत तांदळाच्या उत्पादनात विशेषीकरण करील. भारताने बांगला देशाला तांदूळ पाठवून त्या बदल्यात बांगला देशाकडून गव्हाची आयात करावी. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात या दोन देशांचा विनिमय दर हा १ किलो तांदूळ = २ किलो गहू असा राहील. या दोन मर्यादांमध्ये प्रत्यक्षात विनिमय दर कोठे राहील हे अन्योन्य मागणी वक्रावर अवलंबून राहील. या व्यापारात जोपर्यंत १ किलो तांदळाच्या मोबदल्यात १ किलोपेक्षा जास्त गहू मिळेल तोपर्यंत या दोन देशात आयात निर्यातिचा आंतरराष्ट्रीय व्यापार सुरू राहील. या व्यापारशर्ती या १ किलो तांदूळ = १ ते २ किलो गहू या दरम्यान कोठेतरी ठरतील. यासाठी मागणी पुरवठ्याची लवचिकता पहावी लागेल . समजा, भारताची गव्हाची मागणी लवचिक आहे आणि बांगला देशाची तांदळाची मागणी अलवचिक आहे अशा स्थितीत व्यापारशर्ती भारताला अनुकूल राहतील. मात्र याउलट स्थितीत उलट घडेल.

**आकृती २.४**




वरील आकृतीत दोन्ही वक्र एकमेकांना B बिंदूत छेदतात

आणि त्या ठिकाणी व्यापारशर्ती निश्चित होतात. B बिंदूपाशी दोन्हीही देशांचा समतोल प्रस्थापित होतो. या समतोल स्थितीत भारत OK इतका तांदूळ बांगला देशाला निर्यात करील आणि बांगला देश इतकाच तांदूळ आयात करील. तर बांगला देश OD इतका गहू निर्यात करील आणि भारत एवढाच गहू आयात करील. आणि हा व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर ठरेल यात शंका नाही.

## २.९ सारांश

आंतरराष्ट्रीय व्यापारात व्यापारशर्ती ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात ज्या मूल्यांवर वस्तूंची देवाणघेवाण होते त्याला व्यापारशर्ती किंवा व्यापार अटी असे म्हणतात. म्हणून व्यापार अटी म्हणजे आयातीचे समस्त मूल्य आणि निर्यातीचे समस्त मूल्य यांचे गुणोत्तर असते.

सर्वसाधारणपने व्यापारशर्ती या अनुकूल किंवा प्रतिकूल असतात. या व्यापारशर्तीचे अनेक प्रकार आहेत. यामध्ये निव्वळ व्यापारशर्ती, स्थूल व्यापारशर्ती, उत्पन्न व्यापारशर्ती, एक घटक व्यापारशर्ती, द्विघटक व्यापारशर्ती इ. प्रकार पडतात. तसेच व्यापारशर्तीवर मागणीची लवचिकता, पुरवठ्याची लवचिकता, मागणीचा प्रकार, निर्यातीचा प्रकार, पर्यायी वस्तूंची उपलब्धता, विनिमय दर, जकात, आर्थिक वृद्धी, इ. अनेक घटकांचा परिणाम होतो. त्याचप्रमाणे मार्शल आणि एजवर्थ यांनी अन्योन्य मागणीची संकल्पना मांडली.

## २.१० प्रश्न :-

१) व्यापारशर्ती ही संकल्पना स्पष्ट करा आणि व्यापारशर्तीचे प्रकार सांगा.

२) व्यापारशर्तीवर परिणाम करणारे घटक आणि मर्यादा स्पष्ट करा

३) प्रदान वक्राची संकल्पना स्पष्ट करा

४) अन्योन्य मागणीची संकल्पना स्पष्ट करा

❖❖❖❖

**प्रकरण २**

# ३

# व्यापारी धोरण
## भाग १

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ व्यावसायिक व्यापार धोरणाचा अर्थ आणि उद्दिष्टे

३.२ मुक्त व्यापाराचा अर्थ, फायदे आणि तोटे

३.३ संरक्षणाचा अर्थ, फायदे आणि तोटे

३.४ जकातीचा अर्थ, प्रकार आणि प्रभाव

३.५ जकात विरहीत अडथळे

३.६ सारांश

३.७ प्रश्न

## ३.० उद्दिष्टे

१) व्यावसायिक व्यापार धोरणाची संकल्पना आणि त्याची उद्दिष्टे समजून घेणे

२) मुक्त व्यापाराचे फायदे आणि तोटे यांचे विश्लेषण करणे

३) संरक्षणाचे फायदे आणि तोटे यांचे विश्लेषण करणे

४) जकात संकल्पना, प्रकार आणि त्याचे परिणाम यावर चर्चा करणे.

५) जकात विरहीत अडथळ्यांची संकल्पना समजून घेणे

## ३.१ व्यावसायिक व्यापार धोरण

### ३.१.१ अर्थ

व्यावसायिक धोरण किंवा व्यापार धोरण हे देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संबंधात सरकारच्या धोरणाचा संदर्भ देते. एका देशातील कंपन्या आणि व्यक्ती इतर देशांतील कंपन्या आणि व्यक्तींसोबत व्यापार आणि वाणिज्य कसा करतात हे नियंत्रित करणारे नियम आणि धोरणे म्हणून त्याचे वर्णन केले जाऊ शकते त्याला व्यापार धोरण म्हणतात.

munotes.in

### ३.१.२ उद्दिष्टे

देशाच्या व्यावसायिक व्यापार धोरणाची खालील काही उद्दिष्टे आहेत

१. इतर देशांसोबत व्यापाराचे प्रमाण वाढवणे.

२. देशाच्या तुलनात्मक फायद्यावर आधारित निर्यातीला प्रोत्साहन आणि चालना देणे.

३. वस्तू आणि सेवांचे उत्पादन वाढवणे आणि मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थांचा आनंद घेणे.

४. देशांतर्गत उद्योगांच्या विकासास चालना देणे.

५. देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण आणि परकीय चलन साठा जतन करण्यासाठी संरक्षणवादी धोरणे स्वीकारणे.

६. देशांतर्गत उद्योगांचे विविधीकरण आणि स्वयंपूर्णता प्राप्त करणे

७. संरक्षणवादी धोरणांचा अवलंब करून देयकाचे अनुकूल संतुलन राखणे.

८. सहभागी देशांसाठी परस्पर फायद्यांवर आधारित इतर देशांशी व्यापार करणे.

## ३.२ मुक्त व्यापाराचा अर्थ, फायदे आणि तोटे

### ३.२.१ अर्थ

मुक्त व्यापार धोरण राष्ट्रांमधील वस्तू आणि सेवांच्या मुक्त हालचालींना प्रोत्साहन देते. मुक्त व्यापार धोरणांतर्गत, वस्तू आणि सेवा आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून त्यांची देवाणघेवाण रोखण्यासाठी कमी किंवा कोणतेही सरकारी शुल्क, कोटा, सबसिडी किंवा प्रतिबंधांशिवाय खरेदी आणि विक्री केली जाऊ शकते. मुक्त व्यापार ही संकल्पना व्यापार संरक्षणवाद किंवा आर्थिक अलगाववादाच्या विरुद्ध आहे. ॲडम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो हे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ मुक्त व्यापाराचे पुरस्कर्ते होते. ॲडम स्मिथच्या मते, मुक्त व्यापाराच्या फायद्यांचा आनंद घेण्यासाठी जकात काढून टाकले पाहिजेत.

### ३.२.२ मुक्त व्यापाराचे फायदे

मुक्त व्यापार देशांमधील वस्तू आणि सेवांची मुक्त वाहतूक सक्षम करते. मुक्त व्यापाराचे खालील फायदे आहेत.

**१) विशेषिकरणाचे फायदे:**

प्रथम, मुक्त व्यापार श्रमांच्या आंतरराष्ट्रीय विभागणीचे सर्व फायदे सुनिश्चित करतो. प्रत्येक देश त्या वस्तूंच्या उत्पादनात विशेषज्ञ असेल ज्यामध्ये त्याचा व्यापार भागीदारांपेक्षा तुलनात्मक फायदा आहे. यामुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर होईल आणि त्यामुळे उत्पादन खर्चात कपात होईल.

**२) सर्वांगीण समृद्धी:**

दुसरे म्हणजे, देशांमधील मुक्त व्यापारामुळे, जागतिक उत्पादन वाढते कारण विशेषीकरण, कार्यक्षमता इत्यादींमुळे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. मुक्त व्यापारामुळे देशांना स्वस्त

दरात वस्तू मिळू शकतात. यामुळे जगातील लोकांचे जीवनमान उंचावते. अशा प्रकारे, मुक्त व्यापारामुळे उच्च उत्पादन, उच्च वापर आणि उच्च अष्टपैलू आंतरराष्ट्रीय समृद्धी येते.

**३) स्पर्धात्मक भावना विकसित करण्यास मदत करते:**

तिसरे म्हणजे, मुक्त व्यापारामुळे अर्थव्यवस्थेत स्पर्धेची भावना निर्माण होते. मुक्त व्यापारांतर्गत तीव्र परकीय स्पर्धेची शक्यता असल्याने, देशांतर्गत उत्पादकांना त्यांचीबाजारपेठ गमावायचीनाही. स्पर्धेमुळे कार्यक्षमता वाढते. शिवाय, देशांतर्गत मक्तेदारी निर्माण होण्यापासून रोखण्यासाठी आणि ग्राहकांना निवड देण्याकडे त्याचा कल आहे.

**४) वस्तू आणि सेवांची उपलब्धता:**

चौथे म्हणजे मुक्त व्यापारामुळे प्रत्येक देशाला अशा वस्तू मिळू शकतात ज्यांचे उत्पादन तो अजिबात करू शकत नाही किंवा केवळ जास्त किंमतीवर उत्पादन करू शकतो. देशांतर्गत अनुपलब्ध वस्तू आणि कच्चा माल कमी किमतीतही मुक्त व्यापारामार्फत मिळवता येतो.

**५) आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देते:**

पाचवे म्हणजे भेदभावाविरूद्ध मुक्त व्यापार संरक्षण. मुक्त व्यापारांतर्गत- कोणत्याही देशाद्वारे कच्चा माल किंवा वस्तूंवर लक्ष ठेवण्यास वाव नाही. मुक्त व्यापार अशा प्रकारे आर्थिक आणि राजकीय सहकार्याद्वारे आंतरराष्ट्रीय शांतता आणि स्थिरता वाढवू शकतो.

**६) सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त:**

शेवटी, मुक्त व्यापार नोकरशाहीच्या हस्तक्षेपांपासून मुक्त असतो. जर एखाद्या देशाने मुक्त व्यापार धोरणाचे पालन केले तर त्याचा व्यापारात सरकारी हस्तक्षेप कमी असेल. नोकरशाही आणि भ्रष्टाचार हे संरक्षणवाद प्रकारच्या व्यापार धोरणाशी खूप संबंधित आहेत.

### ३.२.३ मुक्त व्यापाराविरुद्ध युक्तिवाद:

हे गुण असूनही, अनेक लोक व्यापार निर्बंधांचे समर्थन करतात.

मुक्त व्यापाराविरुद्ध खालील युक्तिवाद मांडले आहेत:

**१) विकसनशील देशांसाठी गैरसोयीचे :**

प्रथम, मुक्त व्यापार प्रगत देशांसाठी फायदेशीर असू शकतो परंतु आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या देशांना नाही.जर पूर्वीचा अनुभव काही मार्गदर्शक असेल असेलमुक्त व्यापाराने गरीबकमी विकसित देशांना पुरेसा त्रास दिला आहे.१९४७ पूर्वी भारत हे ब्रिटनच्या साम्राज्यवादी सत्तेवर वसाहतवादी अवलंबित्वाचे उत्कृष्ट उदाहरण होते.

**२) देशांतर्गत उद्योग/उत्पादने नष्ट करणे:**

दुसरे म्हणजे, यामुळे देशांतर्गत उद्योगांचा नाश होऊ शकतो. मुक्त व्यापारामुळे, आयात केलेला माल स्वस्त दरात उपलब्ध होतो. त्यामुळे देशांतर्गत आणि परदेशी उद्योगांमध्ये एक अयोग्य स्पर्धा निर्माण होते. या प्रक्रियेत देशांतर्गत उद्योगांना मोठा फटका बसला आहे.

**३) सर्वांगीण विकासाचा अभाव:**

तिसरे म्हणजे मुक्त व्यापारामुळे उद्योगांचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. तुलनात्मक खर्चाचे तत्त्व असे सांगते की देश काही वस्तूंच्या उत्पादनात माहिर आहे. दुसरीकडे अकार्यक्षम उद्योग दुर्लक्षित राहतात. अशा प्रकारे, मुक्त व्यापार अंतर्गत, सर्वांगीण विकास नाकारला जातो.

**४) अति अवलंबित्वाचा धोका:**

चौथे म्हणजे मुक्त व्यापारामुळे अवलंबित्वाचा धोका निर्माण होतो. एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापार भागीदाराला आर्थिक मंदीचा सामना करावा लागू शकतो. १९२९-३० मध्ये अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या महामंदीने जगभर धुमाकूळ घातला आणि सर्व देशांची अर्थव्यवस्था तत्कालीन मंदीच्या कचाट्यात सापडली नसली तरीही त्याचा मोठा फटका बसला. अति अवलंबित्वामुळे आर्थिकदृष्ट्या कमी विकसित देशांवर अधिक शक्तिशाली देशांचे राजकीय वर्चस्व देखील होऊ शकते.

**५) हानिकारक विदेशी वस्तू:**

शेवटी एखाद्या देशाला त्याच्या उपभोगाच्या सवयी बदलाव्या लागतील. मुक्त व्यापारामुळे, हानीकारक, निकृष्ट दर्जाची उत्पादने बहुराष्ट्रीय कंपन्या अविकसित देशांमध्ये निर्यात करतात . याचा स्थानिक उद्योगांवर परिणाम होतो आणि ग्राहक कल्याणाचे नुकसान होते. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी व्यापारावर निर्बंध घालणे आवश्यक आहे.मुक्त व्यापाराविरुद्धच्या या सर्व युक्तिवादाच्या पार्श्वभूमीवर, सरकारांना राष्ट्रीय हित जपण्यासाठी काही प्रकारचे व्यापार निर्बंध घालण्यास प्रोत्साहन देण्यात आले.

## ३.३ संरक्षणाचा अर्थ, फायदे आणि तोटे

### ३.३.१ अर्थ

संरक्षणवाद हे आयात प्रतिबंधित करण्यासाठी किंवा त्यांना अधिक महाग करण्यासाठी जकात , आयात कोटा, अनुदान आणि इतर कोणतेही उपाय वापरून परदेशी स्पर्धेपासून देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करण्याचे धोरण आहे. त्यांच्या देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी संरक्षणवादी धोरणे वापरणे हा हेतू आहे.

### ३.३.२ संरक्षणाचे फायदे

संरक्षणवाद धोरणाचे विविध फायदे खालीलप्रमाणे आहेत:

१. **बालोद्योग संरक्षण युक्तिवाद:** बालोद्योग संरक्षण युक्तिवाद असे सुचवितो की नवीन उद्योगांना स्पर्धा करण्याची ही क्षमता वाढवण्यासाठी त्यांना तात्पुरते संरक्षण दिले जावे. हा युक्तिवाद लागू होतो जेथे उद्योग लहान आणि तरुण आहे आणि जेथे खर्च जास्त आहे

या युक्तिवादानुसार, असे काही उद्योग आहेतते सुरू केले तर ज्यात देशाला खरोखरच तुलनात्मक फायदे होतील आणि परदेशी स्पर्धेचा सामना केल्यास, अशा लहान (तरुण



munotes.in

आणि वाढत्या) उद्योगांना सुरुवातीचा अनुभव आणि आर्थिक ताणतणाव पार करता येणार नाहीत. परंतु अल्पकालावधीसाठी संरक्षण दिल्यास, त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात उत्पादनाची अर्थव्यवस्था विकसित होण्याची अपेक्षा केली जाऊ शकते आणि ते शेवटी संरक्षणाशिवाय परदेशी स्पर्धेला तोंड देण्यास सक्षम असतील. त्यामुळे, लहान वयात अशा उद्योगांना स्वतंत्रपणे स्पर्धेला सामोरे जाईपर्यंत काही कालावधीसाठी संरक्षित केले पाहिजे. सुरुवातीच्या टप्प्यात गृहउद्योगांना चालना देण्यासाठी तात्पुरत्या कालावधीसाठी संरक्षणाची चांगली जागा म्हणून हा युक्तिवाद भारतात मोठ्या प्रमाणावर स्वीकारला जातो.

**२. उद्योगांचे वैविध्यीकरण:** विकसनशील देशाच्या औद्योगिक संरचनेत विविधता आणण्यासाठी संरक्षणाच्या धोरणाचे समर्थन केले जाते. एखादा देश केवळ एक किंवा काही उद्योगांवर अवलंबून राहू शकत नाही; दीर्घकाळात विविध प्रकारचे उद्योग मोठ्या प्रमाणात विकसित होणे आवश्यक आहे. या धोरणामुळे परदेशी बाजारपेठा गमावण्याचा धोका कमी होईल; कारण, एक वस्तू निर्यात करण्यात अयशस्वी झाल्यास, इतर वस्तूंची निर्यात केली जाऊ शकते

**३. रोजगार संरक्षण:** जागतिक अर्थव्यवस्थेच्या गतीशीलतेचा अर्थ असा आहे की कोणत्याही वेळी काही उद्योगांची घसरण होईल. जर ते उद्योग भूतकाळात एखाद्या देशात मोठ्या प्रमाणात रोजगारासाठी जबाबदार असतील, तर त्यांच्या घसरणीमुळे प्रादेशिक बेरोजगारीची समस्या निर्माण होईल. एखाद्या देशाचा घसरणीचा दर कमी करण्यासाठी कंत्राटी उद्योगाला संरक्षण देण्याचे औचित्य आहे जेणेकरून लोकांना अर्थव्यवस्थेत इतरत्र नोकऱ्या शोधण्यासाठी वेळ मिळेल

**४. रोजगार निर्मिती:** गृहउद्योगांना संरक्षण दिल्यास देशात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात आणि त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कमी होऊ शकते. संरक्षण दुसऱ्या मार्गाने रोजगार वाढवू शकते. व्यापाराचे संतुलन सुधारून ते रोजगार आणि उत्पन्न वाढवू शकते.

**५. व्यापाराचा समतोल:** काही देशांना उर्वरित जगासोबतच्या व्यापारात असंतुलन जाणवते. जर ते खूप जास्त वस्तू आयात करत असतील तर ते आयातीवर शुल्क लादून तात्पुरती समस्या दूर करू शकतात. एक योग्य जकात धोरण व्यापाराचा अनुकूल समतोल निर्माण करू शकतो आणि राखू शकतो. संरक्षणाच्या उद्देशाने आयातीवरील निर्बंधांमुळे देशाच्या व्यापाराच्या समतोलात अधिशेष निर्माण होईल.

**६. अवपुंजन:** अवपुंजन ही एक समस्या आहे जी अनेक देशांना भेडसावत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील किंमतीतील भेदभावाचे हे उदाहरण आहे.परदेशी विक्रेते अवपुंजन करण्याच्या पद्धतीचा अवलंब करून त्यांच्या मालाची कमी किमतीत विक्री करून देशांतर्गत बाजारपेठ काबीज करण्याचा प्रयत्न करतात. अशा धोरणाला विरोध करण्यासाठी गृहउद्योगांचे संरक्षण आवश्यक आहे. हे देशांतर्गत बाजारात प्रचलित असलेल्या किमतींपेक्षा कमी किमतीत परदेशी बाजारपेठेतील उत्पादनांची विक्री संदर्भित करते. येथे धोका असा आहे की उत्पादनांच्या अवपुंजनामुळे किंमती मोठ्या प्रमाणात घसरतील. याचा अल्पावधीत ग्राहकांना फायदा होऊ शकतो. परंतु, दीर्घकाळात, देशांतर्गत उत्पादकांना भविष्यात परदेशी पुरवठादारांसाठी व्यवसाय बनवण्याच्या मार्गातून बाहेर काढले जाऊ शकते.

munotes.in

त्यामुळे, अवपुंजनाचे परिणाम अवांछित आहेत आणि, जर ते शोधले गेले तर, त्याच्या प्रतिकूल परिणामांपासून काही संरक्षण न्याय्य आहे.

७. **व्यापाराच्या अटींमध्ये सुधारणा करणे:** जेव्हा ते वस्तूचे एकमेव (किंवा प्रबळ) खरेदीदार असतात तेव्हा देश त्यांची स्थिती सुधारू शकतात. हे दुर्मिळ आहे, परंतु जर चहाचे अमेरिकन आयातदार आयात प्रतिबंधित करण्यासाठी एकमेकांशी सहमत झाले तर जागतिक किंमत घसरेल. अर्थात, यामुळे चहा उत्पादकांना मिळणारे उत्पन्न कमी होईल आणि त्यामुळे ते अवांछित मानले जाऊ शकतात कारण ते बहुतेक गरीब देश आहेत.

८. **जशास तसे धोरण:** इतर देशांनी सुरू केलेल्या संरक्षणाचा बदला म्हणून उद्योगाचे संरक्षण करणे आवश्यक आहे.युरोपियन युनियन अमिरेकेला निर्यात केलेल्या स्टीलची किंमत कमी करण्यासाठी छुपे अनुदान वापरत आहे असे वाटले तेव्हा यूएसएने त्याचा वापर केला.

९. **अयोग्य परदेशी स्पर्धा:** अनेकदा देश अयोग्य परदेशी स्पर्धेविरुद्ध संरक्षणवादाचे धोरण अवलंबतात. 'अयोग्य' स्पर्धा विविध प्रकारची असू शकते. काहीवेळा, परदेशी सरकार त्यांच्या निर्यात उद्योगांना सबसिडी देऊ शकतात. याचा अर्थ घरगुतीउद्योगांना चांगली स्पर्धा करता येत नाही.त्याचप्रमाणे, परदेशी कंपन्या त्यांची उत्पादने परदेशात कमी किमतीला विकू शकतात , कारण ती त्यांच्या देशांतर्गत बाजारात विकली जाऊ शकत नाहीत किंवा प्रतिस्पर्धी नष्ट करण्यासाठी ते परदेशात कमी किमतीला वस्तू विकतात . त्यानंतर ते त्यांच्या किमती वाढवू शकतात आणि मोठा नफा कमावू शकतात देशांना कमी किमतीच्या आयातीपासून संरक्षण आवश्यक आहे. अनेकदा असा युक्तिवाद केला जातो की देशांतर्गत उद्योगांना विकसित होण्यासाठी संरक्षण कालावधी आवश्यक आहे.

१०. **राष्ट्रीय संरक्षण युक्तिवाद:** देशाच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेले उद्योग (उदा. शस्त्रे आणि दारूगोळा, लष्करी उपकरणे इ.) देशाचे राष्ट्रीय स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी संरक्षित केले जावेत. स्वातंत्र्यानंतर भारतात स्वीकारलेल्या संरक्षणाच्या धोरणात संरक्षण उद्योगांना कोणत्याही किंमतीवर संरक्षण विहित केलेले आहे.

११. **स्वयंपूर्णतेचा युक्तिवाद:** अत्यावश्यक वस्तूंमध्ये स्वयंपूर्णता मिळविण्यासाठी संरक्षणाचाही पुरस्कार केला जातो. राष्ट्रीय स्वयंपूर्णतेसाठी आवश्यक असलेल्या उद्योगांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. भारतासारख्या विकसनशील देशांच्या संरक्षणासाठी हा खरोखरच खात्रीलायक युक्तिवाद आहे. खरे तर अशा देशांतील उद्योगांना संरक्षण देण्यासाठी राष्ट्रीय हित हाच एकमेव निकष आहे.

### ३.३.३ तोटे

**१. मुक्त व्यापारात अडथळा:** त्यामुळे मुक्त बहुराष्ट्रीय व्यापारात अडथळे किंवा प्रतिबंध निर्माण होतात. इतर देशांद्वारे लादलेल्या उच्च शुल्कामुळे, एखाद्या देशाला अशा वस्तूंचे उत्पादन करण्याची परवानगी नाही ज्यामध्ये त्याला किमतीचे फायदे आहेत. तर, संरक्षणामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापार केलेल्या वस्तूंचे जागतिक उत्पादन आणि वापर कमी होतो.

**२. अकार्यक्षम संसाधन वाटप:** संरक्षण धोरणामुळे देशांतर्गत उत्पादकांना खर्च कमी करण्याची आणि त्यांची उत्पादकता सुधारण्याची गरज नाही. दीर्घकाळात, ते कमी स्पर्धात्मक बनतात आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करणे कठीण होते.

**३. देशांतर्गत ग्राहकांना होणारी गैरसोय:** आयातीवरील उच्च शुल्कामुळे, ग्राहकांना देशांतर्गत वस्तू, अनेकदा निकृष्ट दर्जाच्या आणि अनेकदा जास्त किमतीत खरेदी कराव्या लागतात. त्यामुळे ग्राहकहिताचे नुकसान होते.

**४. कमकुवत गृहउद्योगांना संरक्षण:** संरक्षण अयोग्य गृहउद्योगांना आश्रय देते. संरक्षणामुळे देशांतर्गत उद्योगांमध्ये अकार्यक्षमता निर्माण होते. उद्योग सरकारी संरक्षणावर अवलंबून राहतात आणि त्यांना त्यांची स्पर्धात्मकता सुधारण्याची गरज वाटत नाही. संरक्षणामुळे राजकीय भ्रष्टाचार आणि निहित स्वार्थ देखील निर्माण होतो.

**५. विविधीकरण नेहमीच शक्य नसते:** कोणत्याही देशासाठी उद्योगांचे संपूर्ण वैविध्य साध्य करणे कठीण असते. मोठ्या प्रमाणावर वैविध्य आणण्यासाठी प्रत्येक देशाकडे नैसर्गिक, मानवी किंवा आर्थिक यासारखी सर्व संसाधने नसतात. देशांतर्गत उत्पादनाद्वारे देश आपल्या सर्व गरजा कार्यक्षमतेने तयार करू शकत नाही. इतर देशांकडून कमी किमतीत वस्तू आयात करण्यास देश प्राधान्य देतील.

**६. श्रम हा उत्पादनाचा एकमात्र घटक नाही:** असा युक्तिवाद केला जातो की जास्त मजूर खर्च असलेले देश कमी कामगार खर्च असलेल्या देशांकडून वस्तू आयात करतात, जास्त खर्च असलेल्या देशांतील कामगारांना जास्त उत्पन्न दिले जाते. परंतु श्रम हा केवळ उत्पादनाचा घटक नाही. जेव्हा एखादा देश उत्पादनासाठी भांडवल-प्रधान तंत्राचा अवलंब करतो, तेव्हा तो उच्च खर्च असूनही त्याची सरासरी किंमत कमी करेल. दुसरीकडे, कमी खर्च असलेले देश श्रम-केंद्रित तंत्रांचा वापर करतात ज्यात सहसा कमी उत्पादकता आणि उच्च खर्च असतो. अशा प्रकारे, प्रगत देश उच्च श्रम उत्पादकतेमुळे जास्त वेतन देतात. कमी मजुरी म्हणजे कमी खर्चाची गरज नाही कारण कमी उत्पादकतेमुळे श्रमाची खरी किंमत जास्त असेल.

**७. इतर देशांकडून बदला घेणे:** संरक्षणामुळे व्यापारी राष्ट्रांमध्ये व्यापार युद्ध आणि आंतरराष्ट्रीय संघर्ष होऊ शकतात

## ३.४ जकातीचे प्रकार आणि प्रभाव

### ३.४.१ जकात दरांचा अर्थ:

जकात हे राष्ट्रीय सीमा ओलांडून व्यापार केलेल्या वस्तूवर देशाच्या सरकारने लादलेले शुल्क किंवा कर आहे. निर्यात आणि आयात या दोन्हीवर दर आकारला जाऊ शकतो. मायदेशात आयात केलेल्या आणि परदेशात उत्पादित केलेल्या मालावर लादलेल्या करास जकात असे म्हणतात. ज्या देशांना त्यांची निर्यात वाढवण्यात रस आहे ते सामान्यतः निर्यात शुल्काचा वापर टाळतात. त्यामुळे दर हे आयात शुल्काचा समानार्थी शब्द बनले आहेत

munotes.in

आयात शुल्क किंवा आयात कर हे परदेशातून आयात केलेल्या वस्तूंवर लावले जातात. आयात शुल्क लागू केल्यामुळे उत्पादनांच्या किमती आणि घटकांमध्ये सापेक्ष बदल होतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संरचनेत महत्त्वपूर्ण बदल घडून येतात. उच्च दर निश्चितपणे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमाण मर्यादित करण्याचा परिणाम करतात.

### ३.४.२ जकात दराचे प्रकार

जकाती अनेक प्रकारच्या आहेत आणि ते खालीलप्रमाणे वेगवेगळ्या गटांमध्ये वर्गीकृत केले जाऊ शकतात:

(१) दर लागू करण्याच्या निकषाच्या आधारावर.

हे अशा प्रकारचे असू शकतात:

(अ) विशिष्ट दर,

(ब) मालाच्या किमतीनुसार कर आकारणी

(क) संमिश्र जकात

**(अ) विशिष्ट दरानुसार जकात :**

विशिष्ट दर म्हणजे प्रति भौतिक एकक किंवा आयात किंवा निर्यात केलेल्या वस्तूच्या वजन किंवा मापानुसार निश्चित रक्कम होय. गहू, तांदूळ, खते, सिमेंट, साखर, कापड इत्यादी वस्तूंवर अशी शुल्के लावली जाऊ शकतात. विशिष्ट शुल्कांचे दर व्यवस्थापित करणे अगदी सोपे आहे, कारण त्यात मालाचे मूल्यमापन समाविष्ट नसते. व्यापार केलेल्या वस्तूंचे मूल्य निश्चित करणे कठीण असू शकते कारण किंमतीचे अनेक प्रकार आहेत जसे कीमागणी किंमत, पुरवठा किंमत, बाजारभाव, कराराची किंमत, बीजक किंमत, एफओबी, (बोर्डवरील विनामूल्य) किंमत, सीआयएफ (खर्च, विमा).मालवाहतूक) किंमत इ. विशिष्ट करांचा अवलंब सरकारला किमतींच्या गुंतागुंतीपासून दूर ठेवण्यास सक्षम करते.

**(ब) मालाच्या किमतीनुसार जकातदर:**

जेव्हा व्यापार केलेल्या वस्तूच्या मूल्याची निश्चित टक्केवारी म्हणून शुल्क आकारले जाते तेव्हा त्याला मालाच्या किमतीनुसार जकात असेम्हणतात. असे कर त्या उत्पादनांवर लावली जातात ज्यांचे मूल्य त्यांच्या वजन किंवा माप यांसारख्या भौतिक वैशिष्ट्यांच्या तुलनेत असमानतेने जास्त आहे. उदाहरणार्थ, जर घड्याळांची आयात ७०टक्के ॲड व्हॅलोरेम टॅरिफच्या अधीन असेल तर, रु. १०००रुपये किमतीच्या घड्याळाला ७००रु. शुल्क लागू होईल आणि १२००रु. किमतीच्या घड्याळाला ८४०रु. शुल्क लागू होईल. ॲड व्हॅलोरेम ड्युटीचा अतिरिक्त फायदा हा आहे की त्यांच्या बाबतीत, दरांची आंतरराष्ट्रीय तुलना सहज करता येते.

**(क) कंपाऊंड टॅरिफ:(संमिश्र जकात ):**

संमिश्र जकात ही विशिष्ट जकात आणि ॲड व्हॅलोरेम जकात यांचे एकत्रित संयोजन आहे. संमिश्र जकातीच्या संरचनेमध्ये वस्तूच्या प्रत्येक नगावर विशिष्ट शुल्क आणि जाहिरात मूल्य शुल्काची टक्केवारी समाविष्ट असते. संमिश्र जकात केवळ महसुलाला अधिक लवचिकता देत नाहीत तर गृहउद्योगांना अधिक प्रभावी संरक्षणाची हमी देतात.

**(ड) स्लाइडिंग स्केल दर (सरकता जकात दर):**
वस्तूंच्या किमतींनुसार बदलणाऱ्या आयात शुल्कांना सरकता जकात दर असे म्हणतात. हे एकतर विशिष्ट किंवा जाहिरात मूल्याच्या आधारावर असू शकतात. प्रत्यक्ष व्यवहारामध्येहे सामान्यतः विशिष्ट आधारावर असतात.

**(२) जकात आकारणी करण्याच्या उद्देशाच्या आधारावर. हे दोन प्रकारचे असू शकतात:**

(अ) महसूली जकातदर

(ब) संरक्षणात्मक जकातदर

**(अ) महसूल दर:**
सरकारला अधिक महसूल मिळवून देण्यासाठी प्रामुख्याने लागू केलेल्या दराला महसूली दर असे म्हणतात. कमी विकसित देशांमध्ये, महसूलाच्या या स्रोतावर सरकारांचा विश्वास आहे

**(ब) संरक्षणात्मक दर:**
परकीय उत्पादित वस्तूंपासून होणाऱ्या गळे कापू स्पर्धेपासून गृहउद्योगांचे संरक्षण करण्यासाठी सरकारकडून हे शुल्क लागू केले जाऊ शकते. जकातीचा दर जितका जास्त असेल तितका जास्त जकातीचा संरक्षणात्मक प्रभाव असू शकतो.

**(३) जर दर भेदभावाच्या विचाराने प्रभावित झाला असेल.**
दोन प्रकारचे दर असू शकतात-

(अ) भेदभावरहित जकात आणि

(ब) भेदभावपूर्ण जकात

**(अ) भेदभावरहित दर:**
मूळ देशाचा विचार न करता सर्व वस्तूंना एकसमान दर लागू होत असल्यास, ते भेदभावरहित दर म्हणून ओळखले जातात. भेदभावरहित जकात दराच्या अशा प्रणालीला एक स्तम्भीय जकात म्हणतात. जकातीची ही प्रणाली प्रशासनासाठी सोपी आणि साधी आहे. तथापि, एक कमतरता आहे की ते देशाच्या उद्योगांच्या बदलत्या गरजांनुसार समायोजित करण्यासाठी पुरेसे लवचिक नाही. महसुलाच्या दृष्टीकोनातूनही, शुल्क आकारणाऱ्या देशासाठी ते समाधानकारक असू शकत नाही.

**(ब) भेदभावपूर्ण दर:**
भेदभावपूर्ण दराच्या बाबतीत, वेगवेगळ्या वस्तूंसाठी वेगवेगळे जकात दर अस्तित्वात आहेत. पसंतीच्या देशांतून उत्पन्न होणारी उत्पादने इतर देशांच्या तुलनेत कमी दराच्या अधीन आहेत. भेदभाव करणारे जकात दर दुहेरी किंवा एकापेक्षा जास्त स्तंभीय असू शकतात.

**दुहेरी स्तंभ दराचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले जाऊ शकते:**

(i) सामान्य आणि पारंपारिक दर

(ii) कमाल आणि किमान दर

(iii) एकाधिक स्तंभ दर.

munotes.in

**(i) सामान्य आणि पारंपारिक दर:**

सामान्य जकात सूची राज्य विधानमंडळाद्वारे निर्धारित केले जाते. आंतरराष्ट्रीय व्यावसायिक करारांच्या दायित्वांची पूर्तता करण्यासाठी आवश्यकतेनुसार जकात दरांमध्ये समायोजन करण्याची तरतूद देखील करतात. पारंपारिक जकात सूची इतर देशांसह देशाच्या व्यावसायिक कराराद्वारे विकसित केले जाते. हे देशांतर्गत परिस्थिती किंवा आवश्यकतांमधील बदलांनुसार जकात दरांमध्ये बदल करण्यास परवानगी देत नाही. संबंधित देशांमधील वाटाघाटी आणि करार झाल्यानंतर किंवा विद्यमान कराराची मुदत संपल्यानंतरच बदल शक्य होऊ शकतात. हे स्पष्ट आहे की पारंपारिक शुल्क पद्धतीत काही ताठरता आहे. याउलट, सामान्य दर पद्धतीतअधिक लवचिकता आहे

**(ii) कमाल आणि किमान दर:**

या प्रणाली अंतर्गत, देशात प्रत्येक वस्तूसाठी कमाल आणि किमान दर आहेत. हे जकात दर कायदेमंडळाद्वारे निश्चित केले जातात आणि विविध देशांमधून आयात केलेल्या वस्तूंवर विशिष्ट दर लागू करण्यासाठी सरकार अधिकृत आहे. 'सर्वाधिक पसंती देश ' म्हणून मानल्या गेलेल्या देशांतून उगम पावलेल्या उत्पादनांवर किमान जकात दर लागू केले जातात. परकीय देशांच्या तुलनेत स्वदेशातील सौदाशक्ती स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने कमाल जकात दर लागू केले जातात.

**(iii) एकाधिक स्तंभ दर:**

बहु स्तम्भीय जकात दर यामध्ये तीन वेगवेगळ्या दरांचा समावेश असतो - एक सामान्य दर, एक आंतरराष्ट्रीय दर आणि एक प्राधान्य दर. सर्वसाधारण आणि आंतरराष्ट्रीय जकात दर हे वर चर्चा केलेल्या कमाल आणि किमान दरांच्या समतुल्य मानले जाऊ शकतात. अधिमान्य दर सामान्यतः विशेष देशांमधून उद्भवलेल्या उत्पादनांवर लागू केले जातात.

**(४) उत्पादनांच्या आधारे वर्गीकरण:**

एखादे उत्पादन आयात किंवा निर्यात केले जाते की नाही हे शुल्काचा आधार असू शकतो. या आधारावर, दर खालील प्रकारचे असू शकतात:

(अ) आयात शुल्क आणि

(ब) निर्यात शुल्क.

**(अ) आयात शुल्क:**

जर देशाने परदेशी आयातीवर जकात लादली आणि आयातीवर बंधने घातली तर त्याला आयात शुल्क म्हणून ओळखले जाते.

**(ब) निर्यात शुल्क:**

जेव्हा स्वदेशातील उत्पादने परदेशी बाजारपेठेत विकण्यासाठी आपला प्रदेश सोडताना कराच्या अधीन होतात, तेव्हा त्या कर किंवा शुल्काला निर्यात शुल्क किंवा निर्यात शुल्क असे म्हणतात. विश्लेषणात्मक आणि धोरणात्मक कारणांमुळे आयात शुल्क हा सखोल स्वारस्याचा विषय राहिला आहे. हे खूप जास्त पसरलेले आहेत आणि जवळ जवळ प्रत्येक देश त्यांचा अवलंब करतो. याउलट, निर्यात शुल्क अत्यंत मर्यादित प्रमाणात लागू केले जाते. अमिरेकेसारख्या काही देशांनी कायद्याने निर्यात शुल्क प्रतिबंधित केले आहे. ज्या देशांमध्ये हे प्रचलित आहेत, त्या देशांतही मूळ उद्देश मोठा महसूल मिळवणे हा आहे.

**(५) प्रतिशोधाच्या आधारावर वर्गीकरण:**

या आधारावर, दर कोणत्या प्रकारचे असू शकतात

(अ) प्रतिशोधात्मक दर आणि

(ब) काउंटरवेलिंग टॅरिफ

**(अ ) प्रतिशोधात्मक दर:**

जर एखाद्या परदेशी देशाने मायदेशातून होणाऱ्या निर्यातीवर शुल्क लादले असेल तर आपणही त्यांच्या देशातून आयात होणाऱ्या वस्तूंवर कर लावल्यास अशा जकातीला प्रतिशोधात्मक शुल्क मानले जाईल. स्वदेशात, हा उपाय स्वीकारताना महसूल वाढवणे किंवा गृहउद्योगांचे संरक्षण करणे हे एकतर एव्हढेच उद्दिष्ट नाही तर बदला घेण्याचे आहे.

**(ब) काउंटरवेलिंग दर:**

जर परदेशी देश निर्यात अनुदानाच्या बळावर आपल्या देशाच्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात उत्पादनांची निर्यात करत असेल, तर मूळ देशाच्या वस्तू आपल्या प्रदेशात प्रवेश करताच परदेशी उत्पादनांवर शुल्क लादून त्यांना मिळणारा 'अयोग्य फायदा' तटस्थ करू शकतो.

**३.४.३ जकातीचे परिणाम**

दर लागू करणाऱ्या देशावर जकातीचे आर्थिक परिणाम होतात. किंडलबर्जरच्या मते, दराचे आठ परिणाम आहेत.जकातीचेपरिणाम खालील गृहितकांवर आधारित आहेत:

**गृहीतके:**


(i) दिलेल्या वस्तूची मागणी आणि पुरवठा वक्र आयात शुल्क लादणाऱ्या देशाशी संबंधित आहे.

(ii) दिलेली मागणी आणि पुरवठा वक्र स्थिर राहतात.

(iii) ग्राहकांच्या आवडीनिवडी, इतर वस्तूंच्या किमती आणि ग्राहकांच्या उत्पन्नात कोणताही बदल होत नाही.

(iv) तांत्रिक सुधारणांचा अभाव आहे

**आकृती क्र. ३.१**



**३. संरक्षणात्मक प्रभाव:**

परकीय स्पर्धेपासून गृहउद्योगाचे रक्षण करण्याच्या उद्देशाने शुल्क लागू केले जाऊ शकते. जकात विदेशी उत्पादनांचा प्रवाह प्रतिबंधित करत असल्याने, देशांतर्गत उत्पादकांना आयात पर्यायांद्वारे देशांतर्गत उत्पादन वाढवण्याची संधी मिळते.

आकृती ३.१ मध्ये, मागणी आणि पुरवठा **OX** अक्षावर आणि किंमत उभ्या **OY** अक्षावर मोजली जाते. D आणि S हे दिलेल्या वस्तूची अनुक्रमे देशांतर्गत मागणी आणि पुरवठा वक्र आहेत. मूळात PW हा वस्तूचा जागतिक पुरवठा वक्र आहे आणि जकात पूर्व किमत किंमत OP आहे. किंमत OP वर, देशांतर्गत पुरवठा OQ आहे आणि मागणी OQ१आहे. मागणी आणि पुरवठा यातील तफावत QQ१विदेशातून वस्तू आयात करून पूर्ण केली जाते. आयातीवर PP१ प्रति नग जकात लादल्यास, किंमत OP१ वर वाढते आणि जागतिक पुरवठा वक्र P१W१ वर सरकतो. या उच्च किमतीवर, मागणी OQ१ वरून OQ२ पर्यंत कमी होते तर देशांतर्गत पुरवठा OQ वरून OQ३पर्यंत वाढतो. QQ३ हा जकात दराचा संरक्षणात्मक प्रभाव आहे.

**२. उपभोग परिणाम:**

एखाद्या विशिष्ट वस्तूवर आयात शुल्क लादल्याने त्याचा ग्राहकांचा वापर कमी होण्याचा परिणाम होतो. मुक्त व्यापार किंमत OP वर एकूण उपभोग OQ१होता. इथे OQ इतक्या देशी वस्तूंचा आणि QQ१इतक्या विदेशी वस्तूंचा उपभोग होतो जकात लादल्यानंतर, जेव्हा किंमत OP१पर्यंत वाढतेतेव्हा उपभोग OQ१वरून OQ२पर्यंत कमी केला जातो. Q१Q२हा जकातीचा उपभोग परिणाम आहे.

**३. महसूल परिणाम:**

आयात शुल्क लागू केल्याने सरकारला महसूल मिळतो. जेव्हा PP१प्रति नग जकात लादली जाते, तेव्हा सरकारची महसुली प्राप्ती प्रति नग दर PP१ (किंवा BF) ला आयात केलेल्या Q३Q२किंवा (EF) च्या प्रमाणात गुणाकार करून निर्धारित केले जाऊ शकते. अशाप्रकारे PP१ × Q३Q२ = BF × EF = BCEF इतकी वरील जकात दराच्या रकमेमुळे महसूल प्राप्ती होते . हा जकातीचा महसूल परिणाम आहे.

**४. पुनर्वितरण प्रभाव :**

एकीकडे जकात लादल्याने ग्राहकांचे समाधान कमी होते आणि दुसरीकडे, मोठ्या प्रमाणात जकात लावल्याने देशांतर्गत उत्पादकांना आणि सरकारला महसूल प्रदान करते. अशा प्रकारे जकात लादणाऱ्या देशात पुनर्वितरणात्मक परिणाम घडवून आणतो. आकृती ३.१ च्या मदतीने पुनर्वितरण प्रभाव दर्शविला जाऊ शकतो.

ग्राहकांच्या अधिशेषातील तोटा = RHP – RCP१ = PHCP१

उत्पादकाच्या अधिशेषात वाढ = TBP१ – TAP = PABP१

सरकारला मिळणारा महसूल = BCEF

निव्वळ तोटा = PHCP१ – (PABP१ + BCEF)

= ΔBAF + ACEH

munotes.in

किंडलबर्जर या निव्वळ तोट्याला जकातीमुळे होणारा "डेडवेट लॉस" म्हणतात. ही जकातीची किंमत दर्शवते. हे स्पष्ट आहे की दरामुळे दिलेल्या देशात उत्पन्नाचे पुनर्वितरण किंवा समाधान होते. ग्राहकांचे नुकसान होते तर उत्पादक आणि सरकारला फायदा होतो.

**५. व्यापार अटीवरील परिणाम :**

व्यापार परिणामाच्या अटी दोन व्यापारी देशांच्या उत्पादनांच्या मागणी आणि पुरवठ्याच्या लवचिकतेवर अवलंबून असतात. जर एखाद्या वस्तूचा विदेशीपुरवठा पूर्णपणे लवचिक असेल किंवा परदेशी पुरवठा दार स्थिर किंमतीवर उत्पादन पुरवठा करण्यास तयार असतील तर, शुल्क लागू केल्याने जकात लावणाऱ्या देशाच्या व्यापार अटींमध्ये सुधारणा होण्याची शक्यता नाही.

एखाद्या वस्तूचा विदेशी पुरवठा पूर्णपणे लवचिक नसल्यास, दोन व्यापारी देशांमधील मागणी आणि पुरवठा यांच्या लवचिकतेनुसार जकात लागू करणाऱ्या देशाच्या व्यापाराच्या अटींवर शुल्क आकारणीचे वेगवेगळे परिणाम होऊ शकतात.

**६. स्पर्धात्मक प्रभाव:**

देशांतर्गत उद्योगांच्या स्पर्धात्मक सामर्थ्यामध्ये जकातीद्वारे वाढ होण्याला स्पर्धात्मक प्रभाव म्हणतात. जकात लादणे, अशा बालउद्योगाच्या वाढीस मदत करू शकते जे अन्यथा परदेशी स्पर्धेला तोंड देण्याच्या स्थितीत नाहीत. जकात परदेशी उत्पादन तुलनेने अधिक महाग बनवते म्हणून, देशांतर्गत बालउद्योगाला संरक्षणात्मक ढाल मागे वाढण्याची संधी मिळते. अशा प्रकारे जकात आकारणी करणाऱ्या देशातील उद्योगांची स्पर्धात्मक शक्ती वाढते

**७. उत्पन्न परिणाम:**

जकात लागू केल्याने परदेशी उत्पादनांची मागणी कमी होते.कारण आयात वस्तूंवर कर लावल्याने आयात कमी होते आणि आयातीवर खर्च होणारा पैसा हा देशांतर्गत उत्पादन वाढविण्यावर खर्च होतो त्यामुळे देशात उत्पादन, रोजगार आणि उत्पन्नात वाढ होईल.

**८. व्यवहार शेष प्रभाव:**

जेव्हा एखाद्या देशाद्वारे परदेशी उत्पादनांवर जकात लादली जाते, तेव्हा देशांतर्गत उत्पादित वस्तू आयात केलेल्या वस्तूंपेक्षा तुलनेने स्वस्त होतात. जकातीमुळे होणारा किमतीचा परिणाम, एकीकडे, इतर देशांमधून होणारी आयात कमी करते आणि दुसरीकडे, उत्पादन वाढवते आणिदेशांतर्गत वस्तूंची खरेदी होते. त्यामुळे मायदेशातील व्यवहार शेषातील तूट कमी होते

## ३.५ जकात विरहीत अडथळे

### ३.५.१ आयात कोटाचा अर्थ

आयात कोटा म्हणजे एका विशिष्ट कालावधीत, साधारणपणे एक वर्षाच्या आत, परदेशातून आयात करायच्या विविध उत्पादनांच्या प्रमाणांची भौतिक मर्यादा होय. आयात कोटा एकतर प्रमाणानुसार किंवा उत्पादनाच्या मूल्यानुसार निश्चित केला जाऊ शकतो.

munotes.in

**३.५.२ आयात कोट्याचे प्रकार**

आयात कोटा प्रणाली पाच प्रमुख प्रकारांमध्ये वर्गीकृत केली जाऊ शकते.

(१) दर पत्रक कोटा/ जकात कोटा
(२) एकतर्फी कोटा,
(३) द्विपक्षीय कोटा,
(४) संमिश्र कोटा, आणि
(५) आयात परवाना.

या प्रणाली अंतर्गत, एका विशिष्ट प्रमाणापर्यंतच्या वस्तूच्या आयातीला शुल्कमुक्त किंवा विशेष कमी शुल्क दराने आयात करण्याची परवानगी आहे. परंतु या निश्चित मर्यादेपेक्षा जास्त आयात केल्यास जास्त शुल्क आकारले जाते. जकात कोटा अशा प्रकारे कोटाच्या वैशिष्ट्यांसह जकातीची वैशिष्ट्ये एकत्र करतो. लवचिकता हा या प्रणालीचा आणखी एक फायदा आहे

**२. एकतर्फी कोटा:**

या प्रणाली अंतर्गत, एखाद्या देशाने दिलेल्या कालावधीत वस्तूंच्या आयातीवर पूर्ण मर्यादा ठेवली आहे. हे परदेशी सरकारांशी पूर्व वाटाघाटी न करता लादले जाते.

असा निश्चित केलेला कोटा एकतर जागतिक किंवा वाटप केलेला असू शकतो. जागतिक कोटा अंतर्गत, कोट्याच्या पूर्ण रकमेपर्यंत वस्तू कोणत्याही देशातून आयात केली जाऊ शकते. वाटप केलेल्या कोटा प्रणाली अंतर्गत, एकूण कोटा निर्दिष्ट पुरवठा करणाऱ्या देशांमध्ये वितरीत केला जातो

**३. द्विपक्षीय कोटा:**

या प्रणाली अंतर्गत, आयात करणारा देश आणि निर्यात करणारा देश (किंवा परदेशी निर्यात गट) यांच्यातील वाटाघाटीद्वारे कोटा निश्चित केला जातो. कोटा परस्पर संमतीने ठरवला जातो. हे भेदभावाची शंका कमी करते. हे कमी अनियंत्रित आहे, आणि म्हणून, निर्यातदार देशांकडून कमी किंवा जास्त असा कोणताही विरोध नाही. अशा प्रकारे, ते कोणत्याही प्रतिशोधाच्या क्रियाप्रक्रियांना उत्तेजन देत नाही.

**४. संमिश्र कोटा:**

हा एक प्रकारचा नियम आहे ज्यामध्ये उत्पादकांना देशांतर्गत तयार मालाचे उत्पादन करण्यासाठी आयात केलेल्या भागांसह देशांतर्गत कच्च्या मालाचा विशिष्ट प्रमाणात वापर करणे आवश्यक आहे.

त्यामुळे देशांतर्गत उत्पादनात आयात आणि वापरल्या जाणाऱ्या विदेशी-निर्मित कच्च्या मालाच्या प्रमाणाची मर्यादा निश्चित करते.

अशा मिश्रण नियमांची दोन प्रमुख उद्दिष्टे आहेत:
(i) कच्च्या मालाच्या देशांतर्गत उत्पादकांना मदत करणे, आणि
(ii) दुर्मिळ परकीय चलन वाचवण्यासाठी.

### ५. आयात परवाना:


आयात परवान्याची यंत्रणा कोटा नियमांचे व्यवस्थापन करण्यासाठी तयार केलेली प्रणाली म्हणून विकसित केली गेली आहे. या अंतर्गत, संभाव्य आयातदारांना निर्दिष्ट कोट्यामध्ये कोणतेही प्रमाण आयात करण्यासाठी योग्य प्राधिकरणांकडून परवाना घेणे आवश्यक आहे. देशाच्या आयात प्रवृत्तीमध्ये त्यांचा वाटा लक्षात घेऊन प्रस्थापित आयातदारांमध्ये सामान्यतः परवाने वितरीत केले जातात. हे आयातीच्या प्रमाणावर अधिक जवळचे नियंत्रण प्रदान करते. हे सट्टा क्रियाप्रक्रिया कमी करते.

### ३.५.२ कोटाचा प्रभाव :

आयात कोट्याचे विविध प्रभाव असू शकतात जसे की किंमत प्रभाव, संरक्षणात्मक किंवा उत्पादन प्रभाव, उपभोग प्रभाव, महसूल प्रभाव, पुनर्वितरण प्रभाव, व्यापार प्रभावाच्या अटी आणि देवघेव संतुलन प्रभाव होय.

आकृती ३.२ च्या मदतीने आयात कोटाच्या परिणामांवर चर्चा केली जाऊ शकते. या आकृतीत, S० हा मुक्त व्यापार अंतर्गत परकीय पुरवठा वक्र आहे आणि तो पूर्णपणे लवचिक आहे. S१ हा देशांतर्गत पुरवठा वक्र आहे जो सकारात्मक उतार दर्शवितो. D हा दिलेल्या वस्तूसाठी मागणी वक्र आहे आणि तो ऋणात्मक उताराचा आहे. दिलेल्या वस्तूची मागणी आणि पुरवठा केलेले प्रमाण OX अक्षावर मोजली जाते आणि किंमत उभ्या OY अक्षावर मोजले जाते.मुक्तव्यापाराच्यापरिस्थितीत, पुरवठा केलेले प्रमाण OQ आहे आणि मागणी केलेले प्रमाण OQ१आहे. परदेशातून आयात करून जादा मागणीची पूर्तता केली जाते.

**आकृती ३.२**




munotes.in

### ३. किंमत प्रभाव:

आयात कोटा म्हणजे परदेशातून आयात केलेल्या वस्तूंच्या प्रमाणाची थेट भौतिक मर्यादा होय . आयात कोट्याची अंमलबजावणी देशांतर्गत बाजारपेठेत त्याची उपलब्धता प्रतिबंधित करते आणि कमतरता निर्माण करते आणि परिणामी किंमतीत वाढ होते. मुळात वस्तूची किंमत Po होती आणि आयात केलेले प्रमाण QQ१ होते. मूळ देशाचे सरकार Q२Q३ च्या मर्यादेपर्यंत आयात कोटा निश्चित करते. देशांतर्ग बाजारातील प्रारंभिक एकूण पुरवठा देशांतर्गत उत्पादन म्हणून OQ आणि आयात म्हणून QQ१, हे OQ + QQ१ =

OQ१इतके होते. आयात कोट्याच्या अंमलबजावणीनंतर, एकूण पुरवठा OQ३आहे ज्यापैकी देशांतर्गत उत्पादन OQ२आहे आणि आयात कोटा Q२Q३आहे (OQ३ = OQ२ + Q२Q३). हे मूळ परिस्थितीच्या तुलनेत वस्तूची कमतरता दर्शवते. परिणामी, पुरवठा OQ३आणि मागणी वक्र D पाहता, किंमत P०ते P१पर्यंत वाढते. वस्तूंच्या किमतीत झालेली ही वाढ हा आयात कोट्याचा परिणाम आहे.

**२. संरक्षणात्मक किंवा उत्पादन प्रभाव:**

आयात कोट्याचा संरक्षणात्मक प्रभाव असतो. यामुळे आयात कमी होत असल्याने देशांतर्गत उत्पादकांना आयात पर्यायाने उत्पादन वाढवण्यास प्रवृत्त केले जाते. आयात कोट्यामुळे वाढलेल्या देशांतर्गत उत्पादनाला संरक्षणात्मक किंवा उत्पादन परिणाम असे म्हणतात. आकृती ३.२ नुसार, मूलतः देशांतर्गत उत्पादन OQ होते. Q२Q३वर आयात कोटा निश्चित केल्यानंतर, देशांतर्गत उत्पादनाचा विस्तार OQ ते OQ२पर्यंत होतो.अशा प्रकारे QQ२ने देशांतर्गत उत्पादनात वाढ झाली आहे. हे संरक्षणात्मक किंवा उत्पादन प्रभाव आहे.

**३. उपभोग परिणाम:**

आयात कोटा विहित केल्यानंतर, दिलेल्या वस्तूच्या देशांतर्गत किमतीत वाढ होते. परिणामी, वस्तूंचा उपभोग कमी होतो. याला उपभोग प्रभाव म्हणून ओळखले जाते. आकृती. ३.२मध्ये, मुक्त व्यापार परिस्थितीत उपभोगOQ१आहे. Q२Q३पर्यंत आयात कोटा निश्चित केल्यानंतर, उच्च किंमत P१वर एकूण उपभोग OQ३पर्यंत कमी केला जातो.अशा प्रकारे आयात कोटा निश्चित झाल्यानंतर OQ१ – OQ३ = Q१Q३द्वारे उपभोगात घट होते. हा उपभोगाचा परिणाम आहे.

**४. पुनर्वितरण प्रभाव:**


आयात कोटा निश्चित केल्यामुळे दिलेल्या वस्तूच्या किमतीत वाढ होते. यामुळे आयात करणाऱ्या देशासाठी ग्राहकांच्या संतोषाधीक्यात घट होऊ शकते. त्याच वेळी, उच्च किंमत आणि वाढलेले उत्पादन उत्पादकांच्या अधिशेषात वाढ सुनिश्चित करते. अशा प्रकारे आयात कोट्यामुळे कोटा लागू करणाऱ्या देशात पुनर्वितरण परिणाम होतो. आकृती ३.२ नुसार आयात कोटा निश्चित केल्यानंतर, किंमत P० वरून P१ पर्यंत वाढते आणि ग्राहकांच्या संतोष्याधिक्यातील तोटा P०EFP१ इतका होतो. नफा म्हणजे उत्पादकाची P०CGP१ची अतिरिक्त रक्कम होय. जर आयातदार संघटित असतील, तर महसूल प्रभावाने GHKF इतकी रक्कम त्यांना जमा होईल. परिणामी, समुदायाचे निव्वळ नुकसान P०EFP१ – (P०CGP१ + GHKF) = ΔGCH + ΔFKE असेल. जर महसुली परिणाम सरकार किंवा आयातदारांवर जमा होत नसेल, तर पुनर्वितरण परिणामामुळे कल्याणात मोठ्या प्रमाणात निव्वळ तोटा होईल. या प्रकरणात, कल्याणातील निव्वळ तोटा P०EFP१ – P०CGP१ = GCEF इतका असेल.

**५. व्यापार परिणामाच्या अटी:**

आयात कोटा लागू केल्याने प्रदान वक्राच्या लवचिकतेनुसार देशाच्या व्यापाराच्या अटींवर अनुकूल किंवा प्रतिकूल मार्गाने प्रभाव पडू शकतो .जर आयात करणाऱ्या देशाचा प्रदान वक्र लवचिक असेल तर व्यापाराच्या अटी त्याला अनुकूल होतील.

याउलट, निर्यात करणाऱ्या देशाचाप्रदान  वक्र लवचिक असल्यास, व्यापाराच्या अटी त्यांच्यासाठी अनुकूल आणि आयात करणाऱ्या देशासाठी प्रतिकूल होण्याची शक्यता आहे. आयात कोट्याच्या व्यापार परिणामाच्या अटी आकृती ३.३ द्वारे स्पष्ट केल्या जाऊ शकतात. कापड ही निर्यात करण्यायोग्य वस्तू आहे आणि स्टील ही कोटा लागू करणाऱ्या देशाची आयात करण्यायोग्य वस्तू आहे  OA हा देश A चा प्रदान  वक्र आहे आणि OB हा प्रदान वक्र B देशाचा आहे.

**आकृती ३.३**




**आकृती ३.३: कोटाच्या व्यापार प्रभावाच्या अटी**

मूलतः P हा विनिमय बिंदू आहे आणि व्यापाराच्या अटी OP रेषेच्या उताराने मोजल्या जातात. देशA ने आयात करण्यायोग्य पोलाद वस्तूवर आयात कोटा OS लादल्यास, विनिमय दर P१ किंवा P२या ठिकाणी निश्चित होऊ  शकतो. जर P१ हा विनिमय बिंदू असेल, तर व्यापाराच्या अटीORरेषेच्या उताराने मोजल्या जातात. OR हा OP पेक्षा जास्त तीव्र असल्याने, व्यापाराच्या अटी मूळ देश A साठी अनुकूल होतात.

याउलट, जर विनिमय P२ वर होत असेल, तर व्यापाराच्या अटी OR१ रेषेने मोजल्या जातात जी OP पेक्षा कमी आहे. या प्रकरणात, व्यापाराच्या अटी कोटा लागू करणाऱ्या देशासाठी प्रतिकूल ठरतात. हे दर्शविते की आयातीवर निर्दिष्ट कोटा लागू केल्यावर व्यापाराच्या अटी खात्री देता न येणाऱ्या  किंवा अनिश्चित असू शकतात.

### ३.५.३ जकात विरहीत अडथळ्यांचे प्रकार

**१) ऐच्छिक निर्यात प्रतिबंध (VERs):** स्वैच्छिक निर्यात प्रतिबंध (VER) हा निर्यातदार देशाच्या सरकारचा आयातदार देशाबरोबर त्यांची निर्यात मर्यादित करण्यासाठी केलेला करार आहे. देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी ते आयातदार देशाद्वारे सक्रिय केले

munotes.in

जाते. आयातीची मर्यादा प्रमाण, मूल्य किंवा बाजारातील वाटा यानुसार निश्चित केला जातो. VERs क्वचितच ऐच्छिक असतात, आयात करणाऱ्या देशांच्या बाजारपेठेत प्रवेश मिळवण्यासाठी ते निर्यातदारांकडून स्वीकारले जातात. VERs चे उदाहरण म्हणजे १९८१मध्ये वाटाघाटी केलेल्या यूएसला जपानी ऑटोमोबाईल निर्यातीवर लावलेले ऐच्छिक प्रतिबंध होय.

**२) काउंटरवेलिंग ड्यूटी(CD):** CD हे आयात केलेल्या उत्पादनांवर लादलेले आयात शुल्क आहे जेव्हा अशी उत्पादने आयात केली जातात. आयात केलेल्या उत्पादनांची वाजवी आणि बाजाराभिमुख किंमत सुनिश्चित करण्याचा आणि त्याद्वारे देशांतर्गत उद्योग आणि कंपन्यांचे संरक्षण करण्याचा हा एक प्रयत्न आहे. काही परदेशी देश त्यांच्या मूळ देशात निर्यात अनुदान आणि निर्यात सवलती यांसारखे फायदे उपभोगतात. आयात केलेल्या उत्पादनांची वाजवी आणि बाजाराभिमुख किंमत सुनिश्चित करण्याचा आणि त्याद्वारे देशांतर्गत उद्योग आणि कंपन्यांचे संरक्षण करण्याचा हा प्रयत्न आहे. काउंटरवेलिंग ड्यूटीचे उद्दिष्ट आयात केलेल्या उत्पादनाद्वारे मिळणारा कमी किमतीचा फायदा दूर करणे हा आहे.

**३) अवपुंजन विरोधी जकात शुल्क:** स्वस्त उत्पादनांची बाहेरून होणारी आयात थांबविण्यासाठी, आयात करणारे देश उत्पादनावर शुल्क लादतात. त्यामुळे आयात केलेल्या उत्पादनाच्या किमतीत वाढ होते. इतर देशांतून येणाऱ्या स्वस्त आयातीपासून देशांतर्गत उत्पादकांचे संरक्षण करण्यासाठी हा जकात विरहीत  अडथळा महत्त्वाचा उपाय आहे.

**४) तांत्रिक, प्रशासकीय आणि इतर नियम:** आंतरराष्ट्रीय व्यापार अनेक तांत्रिक, प्रशासकीय आणि इतर नियमांद्वारे प्रतिबंधित आहे. यामध्ये सुरक्षा नियम, अन्न उत्पादनांसाठी आरोग्य नियम उत्पादनाचा उगम आणि सामग्री दर्शविणारी लेबलिंग आवश्यकता यांचा समावेश आहे. या प्रकारचे अडथळे सामान्यतः विकसित देशांद्वारे विकसनशील देशांकडून होणाऱ्या आयातीविरूद्ध लादले जातात.

**५) प्राधान्य सरकारी खरेदी धोरण:** या धोरणांतर्गत, सरकार त्यांच्या खरेदी धोरणात स्थानिक उत्पादकांना प्राधान्य देते. मंत्रालयांना आयात उत्पादने खरेदी करण्यास मनाई आहे आणि त्यांना देशांतर्गत उत्पादित वस्तूंना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत.

**६) स्थानिक सामग्रीची आवश्यकता:** देशांतर्गत उत्पादकांना देशांतर्गत बाजारातून कच्चा माल खरेदी करणे अनिवार्य करून सरकार कच्च्या मालाच्या आयातीला परावृत्त करू शकते हे प्रमाण एकतर कच्च्या मालाच्या भौतिक प्रमाणानुसार किंवा कच्च्या मालाच्या मूल्याच्या संदर्भात व्यक्त केले जाते.

**७) निर्यात अनुदान:** निर्यात अनुदान म्हणजे थेट पेमेंट किंवा देशाच्या निर्यातदारांना कर सवलत आणि अनुदानित कर्जे देणे होय .परदेशात निर्यात केलेल्या मालाची प्रति नग किंमत कमी करण्यासाठी हे दिले जाते. हे उत्पादन संस्थेला  आपल्या मालाच्या मोठ्या प्रमाणात निर्यात बाजारात घरगुती बाजारापेक्षा कमी किमतीत विकण्यास सक्षम करते. निर्यात अनुदान प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असू शकते. GATs करारानुसार प्रत्यक्ष निर्यात अनुदान प्रतिबंधित असले तरी, देश निर्यात प्रोत्साहनासाठी अप्रत्यक्ष निर्यात अनुदान वापरतात.

munotes.in

यामध्ये अनुदानित कर्ज, दुर्मिळ कच्च्या मालाचे मालमत्ता वाटप किंवा परकीय चलन, कर सवलत यांचा समावेश आहे. इ.

## ३.६ सारांश

या प्रकरणामध्ये आपण व्यावसायिक धोरणाची संकल्पना आणि त्याची उद्दिष्टे यांचा अभ्यास केला आहे. व्यावसायिक धोरणाचे दोन प्रकार आहेत; मुक्त व्यापार आणि संरक्षण धोरण,मुक्त व्यापार अंतर्गतव्यापार, कोणत्याही व्यापार अडथळ्यांशिवाय देशांदरम्यान होतो. मुक्त व्यापारात संसाधनांचे कार्यक्षम वाटप, विशेषीकरण आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यासारखे फायदे आहेत. संरक्षण धोरणांतर्गत, देश आयात प्रतिबंधित करण्यासाठी आणि देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी जकात, आयात कोटा यासारख्या व्यापार अडथळ्यांचा वापर करतात. बालउद्योग युक्तिवाद, उद्योगांचे विविधीकरण आणि रोजगार संरक्षणाच्या आधारावर संरक्षणाचे समर्थन केले जाते. देश आयात प्रतिबंधित करण्यासाठी जकात वापरतात आयात कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी देशाद्वारे शुल्क वापरले जातात. दुसरीकडे कोटा देशात आयात केलेल्या वस्तूंचे भौतिक प्रमाण मर्यादित करतात. हे जकात विरहीत अडथळ्यांचे उदाहरण आहे. देशांतर्गत बाजारपेठेचे रक्षण करण्यासाठी स्वैच्छिक निर्यात प्रतिबंध, अवपुंजनविरोधी कर्तव्ये आणि तांत्रिक, प्रशासकीय आणि इतर नियमांसारखे इतर गैर-शुल्क अडथळे देखील देश वापरतात.

## ३.७ प्रश्न

१) व्यावसायिक व्यापार धोरण म्हणजे काय? त्याची मुख्य उद्दिष्टे काय आहेत?

२) मुक्त व्यापार धोरणाच्या बाजूने युक्तिवाद करा

३) मुक्त व्यापार धोरणाच्या विरोधातील युक्तिवादांवर चर्चा करा.

४) संरक्षण धोरणाच्या बाजूने युक्तिवादांवर चर्चा करा

५) संरक्षणवाद धोरणाविरुद्धच्या युक्तिवादांवर चर्चा करा.

६) जकातीच्या प्रकारांवर चर्चा करा.

७) जकातीचे आर्थिक परिणाम स्पष्ट करा.

८) कोटा म्हणजे काय. कोटाच्या प्रकारांचे वर्णन करा.

९) कोटाचे आर्थिक परिणाम स्पष्ट करा.

१०) कोणत्याही दोन प्रकारच्या जकात विरहीत अडथळ्यांचे वर्णन करा

❖❖❖❖

# ४

# व्यापारी धोरण- भाग २

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ आर्थिक एकत्रीकरणाचा अर्थ, प्रकार आणि उद्दिष्टे

४.२ युरोपियन संघ

४.३ ब्रेक्झिट

४.४ एशियन

४.५ सारांश

४.६ प्रश्न

## ४.० उद्दिष्टे

१) अर्थ, उद्दिष्टे आणि आर्थिक एकात्मतेचे प्रकार यांचा अभ्यास करणे.

२) युरोपियन युनियनचे उद्दिष्ट आणि कामगिरी समजून घेणे

३) ब्रेक्झिटची कारणे समजून घेणे

४) एशियनची भूमिका समजून घेणे

## ४.१ आर्थिक एकत्रीकरण : अर्थ, उद्दिष्टे आणि प्रकार

### ४.१.१ आर्थिक एकत्रीकरणाचा अर्थ

आधुनिक आर्थिक व्यवस्था अशा तंत्रांवर आधारित आहे ज्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले तरच आर्थिकदृष्ट्या ती फायदेशीर ठरते. यासाठी एकीकडे बाजारपेठांचा विस्तार करणे आणि दुसरीकडे लोकांची क्रयशक्ती वाढवणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी, लहान अंतर्गत बाजारपेठा असलेल्या काही देशांनी प्रादेशिक गटांमध्ये स्वतःला संघटित करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्थिक एकात्मता, म्हणजे व्यापक अर्थाने वेगळ्या अर्थव्यवस्थेचे एका मोठ्या अर्थव्यवस्थेत एकत्रीकरण करणे होय. साल्वाटोरच्या मते आर्थिक एकीकरणम्हणजे "केवळ एकत्र सामील होणाऱ्या राष्ट्रांमधील व्यापार अडथळे भेदभावपूर्णपणे कमी करणे किंवा दूर करण्याचे व्यावसायिक धोरण आहे."

अशा प्रकारे आर्थिक एकत्रीकरण अशा व्यवस्थेचा संदर्भ देते ज्याद्वारे दोन किंवा अधिक देश मोठ्या आर्थिक प्रदेशात एकत्रित होतात आणि राष्ट्रीय सीमांवर विद्यमान असमानता आणि

भेदभाव काढून टाकतात आणि समूहाबाहेरील देशांविरुद्ध समान दर आणि व्यापार धोरणांचे पालन करतात. टिनबर्जन यांनी आर्थिक एकीकरणाची व्याख्या "आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या सर्वात इष्ट संरचनेची निर्मिती, इष्टतम कार्यप्रणालीतील कृत्रिम अडथळे दूर करणे आणि समन्वय आणि एकीकरणाच्या सर्व इष्ट घटकांची जाणीवपूर्वक ओळख करून देणे" अशी केली आहे. टिनबर्जनने एकात्मतेच्या नकारात्मक आणि सकारात्मक पैलूंमध्ये फरक केला आहे.

एकात्मतेच्या नकारात्मक पैलूंमध्ये भेदभाव काढून टाकणे आणि सदस्य देशांमधील वस्तूंच्या हालचालीवरील निर्बंध यांचा समावेश होतो. एकात्मतेच्या सकारात्मक पैलूंमध्ये अशा धोरणात्मक उपायांचा अवलंब करणे आणि दिलेल्या आर्थिक क्षेत्रामध्ये बाजारातील विकृती दूर करणे सुलभ करण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था यांचा समावेश होतो.आर्थिक एकात्मता ही एक प्रक्रिया आणि एक स्थिती म्हणून समजली जाऊ शकते. एक प्रक्रिया म्हणून, विविध राष्ट्र राज्यांतील आर्थिक घटकांमधील भेदभाव नष्ट करण्याच्या उद्देशाने उपाययोजनांशी संबंधित आहे. अशा घडामोडींची स्थिती म्हणून, हे विविध राष्ट्र राज्यांचा समावेश असलेले क्षेत्र म्हणून मानले जाऊ शकते ज्यामध्ये विविध प्रकारच्या भेदभावाची अनुपस्थिती आहे.

**आर्थिक एकत्रीकरणाची दोन आवश्यक वैशिष्ट्ये आहेत:**

(i) सदस्य राष्ट्रांमध्ये मुक्त व्यापाराचा परिचय.

(ii) सदस्य नसलेल्या देशांविरुद्ध सामान्य बाह्य शुल्क धोरण लादणे.

या दोन वैशिष्ट्यांवरून आर्थिक एकीकरण हे मुक्त व्यापार आणि शुल्क संरक्षण यांच्यातील संश्लेषण आहे.

## ४.१.२ आर्थिक एकत्रीकरणाची उद्दिष्टे

दोन किंवा अधिक देशांमधील आर्थिक एकात्मता खालील मुख्य फायदे आणते:

**(i) प्रमाणाच्या बचती:**

अंतर्गत बाजारपेठ लहान असलेल्या वैयक्तिक देशांकडे उत्पादन वाढवण्याची क्षमता मर्यादित आहे. आर्थिक एकात्मता कोणत्याही सदस्य देशाने उत्पादित केलेल्या उत्पादनांचा अप्रतिबंधित प्रवेश प्रदान करते. हे उत्पादन वाढवण्यास आणि मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थेच्या फायद्यांचे पूर्णपणे शोषण करण्यासाठी मजबूत प्रोत्साहन देते.

**(ii) आंतरराष्ट्रीय विशेषीकरण :**

आर्थिक एकात्मता सदस्य देशांना उत्पादने आणि प्रक्रिया या दोन्हीमध्ये अधिकाधिक विशेषीकरण प्राप्त करण्यास सक्षम करते. सदस्य देशांद्वारे तुलनात्मक खर्चाच्या फायद्यावर आधारित विशेषीकरणामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात विस्तार होऊ शकतो.

munotes.in

**(iii) उत्पादनामध्ये गुणात्मक सुधारणा:**

अनेक देशांमधील प्रादेशिक आर्थिक सहकार्यामुळे वेगवान तांत्रिक बदल होतात आणि मोठ्या आणि सुलभ भांडवलाच्या हालचाली होतात. सदस्य देश अशा अनुकूल परिस्थितीत उत्पादनात गुणात्मक सुधारणा घडवून आणू शकतात. सदस्य राष्ट्रांमधील व्यापार सुलभ करण्यासाठी पायाभूत सुविधांमध्येही गुंतवणूक केली आहे.

**(iv) रोजगाराचा विस्तार:**

काही देश प्रादेशिक आर्थिक गटांमध्ये स्वत:ला संघटित करतात आणि प्रदेशात श्रमांच्या अनिर्बंध प्रवाहाला परवानगी देतात, त्यामुळे रोजगार आणि उत्पन्न वाढू शकते. यामुळे लोकांचे कल्याण वाढते.

**(v) व्यापाराच्या अटींमध्ये सुधारणा:**

आर्थिक एकात्मतेमुळे सदस्य देशांची सौदेबाजी करण्याची शक्ती उर्वरित जगाच्या तुलनेत सुधारते. त्यामुळे त्यांच्या व्यापाराच्या अटींमध्ये लक्षणीय सुधारणा होते.

**(vi) आर्थिक कार्यक्षमतेत वाढ:**

आर्थिक एकात्मतेमुळे प्रदेशात स्पर्धा वाढते. त्यामुळे संपूर्ण गटाची उच्च पातळीची आर्थिक कार्यक्षमता राखण्यात मदत होते. यामुळे सहभागी देशांसाठी संसाधनांचा अधिक चांगला वापर होतो.

**(vii) राहणीमानात सुधारणा:**

काही देश स्वतःला प्रादेशिक गटांमध्ये संघटित केल्यामुळे, स्पर्धात्मक किमतींवर उत्तम प्रकारच्या वस्तूंची सहज उपलब्धता होते.रोजगाराच्या संधी आणि क्रयशक्ती वाढल्याने लोकांचे जीवनमान सुधारण्यास हातभार लागतो.

**(viii) घटक गतिशीलतेत वाढ:**

आर्थिक एकीकरणामुळे सदस्य देशांमधील कामगार आणि इतर घटकांच्या हालचालींवरील अडथळे दूर होतात. वाढीव घटक गतिशीलता रोजगार वाढवते; घटक खर्च कमी करते; आणि सर्व सदस्य देशांमध्ये उत्पादक क्रिया प्रक्रियांना प्रोत्साहन देते.

**(ix) राजकीय सहकार्य:**

आर्थिक सहकार्यामुळे सदस्य देशांमधील चांगल्या राजकीय संबंधांचा पाया घातला जातो आणि अशा संबंधांचा उपयोग प्रदेशातील संघर्ष सोडवण्यासाठी केला जाऊ शकतो.

## ४.२ आर्थिक एकत्रीकरणाचे प्रकार

आर्थिक एकीकरण खालील मुख्य प्रकार आहेत:

**१) प्राधान्य व्यापार क्षेत्र:**

प्राधान्य व्यापार क्षेत्र किंवा असोसिएशन हा आर्थिक एकात्मतेचा सर्वात ढिला प्रकार आहे. या व्यवस्थेत, सदस्य देश एकमेकांकडून होणाऱ्या आयातीवर शुल्क कमी करतात. दुसऱ्या शब्दांत, सदस्य देश एकमेकांना प्राधान्य देतात. सदस्य नसलेल्या देशांसाठी, ते त्यांचे

वैयक्तिक शुल्क कायम ठेवतात. प्राधान्य व्यापार क्षेत्राचे उत्तम उदाहरण म्हणजे १९३२मध्ये स्थापन झालेली प्राधान्याची राष्ट्रकुल व्यवस्था होय. तिचे नेतृत्व ब्रिटन करत आहे आणि त्यात सर्व राष्ट्रकुल देशांचा समावेश आहे.

**२) मुक्त व्यापार क्षेत्र:**

आर्थिक एकात्मतेच्या या स्वरूपामध्ये, सदस्य देश आपापसात जकात आणि इतर व्यापार निर्बंध पूर्णपणे काढून टाकतात. तथापि, प्रत्येक सदस्य देश गैर-सदस्य देशांविरुद्ध स्वतःचे व्यापार अडथळे राखण्यासाठी स्वतंत्र आहे. मुक्त व्यापार क्षेत्राचे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन (EFTA). ही संघटना नोव्हेंबर, १९५९मध्ये स्थापन करण्यात आली. त्यात इंग्लंड, ऑस्ट्रिया, डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, पोर्तुगाल, स्वित्झर्लंड आणि फिनलंड या देशांचा सहयोगी सदस्य म्हणून समावेश करण्यात आला. अशी दुसरी संघटना म्हणजे लॅटिन अमेरिकन फ्री ट्रेड असोसिएशन (LAFTA). हे १०लॅटिन अमेरिकन देशांनी जून १९६१मध्ये तयार केले होते.

**३) सीमाशुल्क संघ:**

दोन किंवा अधिक देशांमधील एकीकरणाचा अधिक औपचारिक प्रकार म्हणजे सीमाशुल्क संघ होय. एकीकरणाच्या या स्वरूपामध्ये, सदस्य देश आपापसात सर्व शुल्क आणि इतर व्यापार अडथळे रद्द करतात.ते एक सामान्य बाह्य दर आणि व्यावसायिक धोरण देखील स्वीकारतात.सदस्य देशांसाठी सर्व व्यापार अडथळे दूर करण्याच्या बाबतीत सीमाशुल्क संघटना आणि मुक्त व्यापार क्षेत्र समान आहेत.परंतु गैर-सदस्य देशांविरूद्ध सामान्य बाह्य शुल्काच्या संदर्भात सीमाशुल्क संघमुक्त व्यापार क्षेत्रापेक्षा वेगळे आहे.मुक्त व्यापार क्षेत्राच्या बाबतीत, सदस्य देश गैर-सदस्य देशांविरुद्ध त्यांचे स्वतःचे शुल्क आणि इतर व्यापार अडथळे कायम ठेवतात. अशा प्रकारे सीमाशुल्क संघ हा मुक्त व्यापार क्षेत्रापेक्षा एकीकरणाचा अधिक जवळचा विणलेला प्रकार आहे. सीमाशुल्क संघामध्ये, सर्व सदस्य देश सदस्य नसलेल्या देशांविरुद्ध एकल आर्थिक एकक म्हणून कार्य करतात. सीमाशुल्क संघाचे उदाहरण म्हणजे १९५७मध्ये पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, बेल्जियम, नेदरलँड आणि लक्झेंबर्ग यांनी स्थापन केलेला युरोपियन आर्थिक समुदाय.

**४) सामाईक बाजार:**

सामाईक बाजार म्हणजे सीमाशुल्क संघापेक्षा देशांच्या समूहामध्ये अधिक एकत्रित व्यवस्था असणे होय. सामायिक बाजारामध्ये सदस्य देशांमधील जकात आणि व्यापार निर्बंध रद्द करणे आणि सामान्य बाह्य जकातीचा अवलंब करणे समाविष्ट आहे. यात सदस्य राष्ट्रांमध्ये श्रम आणि भांडवलाची मुक्त हालचाल समाविष्ट आहे. अशा प्रकारे समान बाजाराच्या बाबतीत, सदस्य देशांमधील वस्तू आणि घटकांची मुक्त आणि एकात्मिक हालचाल असते. युरोपियन सामाईक बाजार(ECM) ज्याला युरोपियन आर्थिक समुदाय(EEC) असेही म्हटले जाते ते सामाईक बाजाराचे सर्वोत्तम उदाहरण आहे.

munotes.in

**(v) आर्थिक संघ:**

आर्थिक एकात्मतेचा सर्वात प्रगत प्रकार ज्यामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणात सहकार्याचा समावेश आहे तो म्हणजे आर्थिक संघ. आर्थिक संघाच्या बाबतीत, दोन किंवा अधिक देश एक समान बाजारपेठ तयार करतात. याव्यतिरिक्त, एक सामान्य वित्तीय, आर्थिक, विनिमय दर, औद्योगिक आणि इतर सामाजिक-आर्थिक धोरणे स्वीकारतात.सदस्य देश एक समान चलन आणि बँकिंग प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न करतात.आर्थिक संघाचे उदाहरण म्हणजे BENELUX (बेल्जियम, नेदरलँड्स आणि लक्झेंबर्गसह) ज्याची स्थापना १९४८ मध्ये सुरुवातीला सीमाशुल्क संघ म्हणून झाली होती परंतु नंतर १९६० मध्ये त्याचे आर्थिक संघात रूपांतर झाले. हे देश आता EU मध्ये सामील झाले आहेत. युरोपियन आर्थिक समुदाय(EEC) ने १९९१ मध्ये युरोपियन युनियन (EU) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आर्थिक संघात स्वतःचे रूपांतर केले आहे.

## ४.३ युरोपियन युनियन

युरोपियन युनियनचा इतिहास

युरोपियन व्यापार क्षेत्राची संकल्पना प्रथम १९५० मध्ये स्थापित करण्यात आली. युरोपियन कोळसा आणि स्टील समुदाय (ECSC) चेबेल्जियम, फ्रान्स, जर्मनी, इटली, लक्झेंबर्ग आणि नेदरलँड हे सहा संस्थापक सदस्य होते. रोमच्या कराराने १९५७मध्ये एक सामाईक बाजारपेठ स्थापन केली. १९६८मध्ये सीमाशुल्क काढून टाकले आणि विशेषत: व्यापार आणि शेतीमध्ये मानक धोरणे लागू केली. ECSC ने १९७३मध्ये डेन्मार्क, आयर्लंड आणि युनायटेड किंगडम जोडले.त्यांनी १९७९मध्ये पहिली संसद तयार केली. १९८१मध्ये ग्रीस सामील झाले, त्यानंतर १९८६मध्ये स्पेन आणि पोर्तुगाल सामील झाले.मास्ट्रिचच्या कराराने १९९३ मध्ये युरोपियन युनियन सामायिक बाजारपेठ स्थापन केली. दोन वर्षांनंतर युरोपियन समुदायाने ऑस्ट्रिया, स्वीडन आणि फिनलंड जोडले. २००४ मध्ये आणखी बारा देश सामील झाले: सायप्रस, झेक प्रजासत्ताक, एस्टोनिया, हंगेरी, लॅटव्हिया, लिथुआनिया, माल्टा, पोलंड, स्लोव्हाकिया आणि स्लोव्हेनिया इत्यादी. बल्गेरिया आणि रोमानिया २००७ मध्ये सामील झाले.

लिस्बनच्या कराराने २००९मध्ये युरोपियन संसदेचे अधिकार वाढवले. याने युरोपियन युनियनला आंतरराष्ट्रीय करारांवर वाटाघाटी आणि स्वाक्षरी करण्याचे कायदेशीर अधिकार दिले. यामुळे युरोपियन युनियनमध्ये शक्ती, सीमा नियंत्रण, स्थलांतर , नागरी आणि गुन्हेगारी प्रकरणांमध्ये न्यायालयीन सहकार्य आणि पोलिस सहकार्य वाढले.१९ सदस्य राष्ट्रे युरोझोन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आर्थिक संघात सामील झाले, जे युरोचा एकच चलन म्हणून वापर करतात. चलन संघ ३४२ दशलक्ष युरोपियन युनियन नागरिकांचे प्रतिनिधित्व करतो. युरो हे अमेरीकेच्या डॉलर नंतर दुसरे सर्वात मोठे राखीव चलन तसेच जगातील दुसरे सर्वात जास्त व्यापारात असलेले चलन आहे.

munotes.in

**युरोपियन युनियनची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत:**

- शांतता, तिची मूल्ये आणि नागरिकांचे कल्याण यांना प्रोत्साहन देणे
- आश्रय आणि स्थलांतराचे नियमन करण्यासाठी आणि गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि त्यांचा सामना करण्यासाठी बाह्य सीमेवर योग्य उपाययोजना करताना, अंतर्गत सीमांशिवाय स्वातंत्र्य, सुरक्षा आणि न्याय प्रदान करणे .अंतर्गत बाजार स्थापन करणे.
- संतुलित आर्थिक वाढ आणि किंमत स्थिरता आणि पूर्ण रोजगार आणि सामाजिक प्रगतीसह उच्च स्पर्धात्मक बाजार अर्थव्यवस्था यावर आधारित शाश्वत विकास साध्य करणे
- पर्यावरणाच्या गुणवत्तेचे संरक्षण आणि सुधारणा करणे
- वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीला प्रोत्साहन देणे
- सामाजिक बहिष्कार आणि भेदभावाचा सामना करणे
- सामाजिक न्याय आणि संरक्षण, महिला आणि पुरुष यांच्यातील समानता आणि मुलाच्या हक्कांचे संरक्षण करणे
- युरोपियन युनियन देशांमधील आर्थिक, सामाजिक आणि प्रादेशिक एकता आणि एकता वाढवणे
- त्याच्या समृध्द सांस्कृतिक आणि भाषिक विविधतेचा आदर करणे
- एक आर्थिक आणि वित्तीय संघ स्थापन करणे ज्याचे चलन युरो आहे

**व्यापक जगामध्ये युरोपियन युनियनची उद्दिष्टे पुढील प्रमाने आहेत:**

- त्याची मूल्ये आणि हितसंबंध राखणे आणि प्रोत्साहन देणे
- शांतता आणि सुरक्षितता आणि पृथ्वीच्या शाश्वत विकासासाठी योगदान देणे
- लोकांमध्ये एकता आणि परस्पर आदर, मुक्त आणि निष्पक्ष व्यापार, गरिबी निर्मूलन आणि मानवी हक्कांचे संरक्षण यासाठी योगदान देणे
- आंतरराष्ट्रीय कायद्याचे काटेकोर पालनकरणे

**युरोपियन समुदायाची कामगिरी**

**१. शांतता आणि स्थिरता:**

युरोपियन समुदायाने अर्ध्या शतकाहून अधिक शांतता, स्थिरता आणि समृद्धी दिली आहे. हे मुत्सद्देगिरीमध्येही महत्त्वाची भूमिका बजावते आणि त्याच फायद्यांना - तसेच लोकशाही, मूलभूत स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य इ.जगभरात प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करते.

munotes.in

२०१२मध्ये, युरोपियन समुदायाला या क्षेत्रातील कामगिरीबद्दल नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला.

**२. एकल बाजार :**

युरोपियन समुदायाचे मुख्य आर्थिक इंजिन एकल बाजार आहे. हे बहुतेक वस्तू, सेवा, पैसा आणि लोकांना बहुतेक प्रदेशात मुक्तपणे फिरण्यास सक्षम करते. युरोपभोवती फिरणे नक्कीच खूप सोपे झाले आहे - सर्व युरोपियन समुदायातील नागरिकांना कोणत्याही युरोपियन युनिअन देशात अभ्यास करण्याचा, काम करण्याचा किंवा निवृत्त होण्याचा अधिकार आहे. युरोपियन युनियनचे राष्ट्रीय म्हणून, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि कर उद्देशांसाठी, प्रत्येक युरोपियन युनियन देशाने इतर सदस्य देशांच्या नागरिकांशी त्याच्या स्वतःच्या नागरिकांप्रमाणेच वागवणे आवश्यक आहे.

• **युरो–** ३४० दशलक्षाहून अधिक युरोपियन युनियन नागरिकांद्वारे वापरलेले, युरोने चलनातील चढउतार आणि विनिमय खर्चाचा धोका दूर केला आहे आणि आपल्या सर्वांच्या फायद्यासाठी एकल बाजारपेठ मजबूत केली आहे.

• **टेलिफोन आणि डिजिटल सेवा–** युरोपियन युनियन देशांनी आपले रोमिंगचे नियम संपवले आहेत संपूर्ण युरोपियन युरियनमध्ये कोणतेही नागरिक त्यांचा फोन आणि ऑनलाइन सेवा कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय वापरू शकतात

**३. नागरिकांचे हक्क आणि संरक्षण**

युरोपियन युनियनमधील करार युरोपियन युनियनमधील नागरिकांना आणि कायदेशीर रहिवाशांना अनेक क्षेत्रांमध्ये युरोपियन युनियनकायद्यामध्ये लागू केलेले विस्तृत अधिकार देतात.

**४. मूलभूत हक्कांची सनद**

युरोपियन युनियनची मुलभूत हक्कांची सनद युरोपियन युनियनमधील लोकांना उपभोगलेले सर्व वैयक्तिक, नागरी, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अधिकारात एकत्र आणते.

**५. रोजगार हक्क**

युरोपियन युनियनमधील प्रत्येक कामगाराला कामाच्या ठिकाणी आरोग्य आणि सुरक्षिततेशी संबंधित काही किमान अधिकार आहेत; समान संधी; सर्व प्रकारच्या भेदभावापासून संरक्षण; आणि कामगार कायदे इ.कायदे आहेत.

**६. अंकात्मक अधिकार**

आपल्या सर्वांचे आपल्या वैयक्तिक माहितीवर अधिक नियंत्रण आहे याची खात्री करण्यासाठी युरोपियन युनियने वैयक्तिक अधिकार आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण आणि माहिती संरक्षण आणि गोपनीयता कायद्यांमध्ये कठोर भूमिका घेतली आहे.

munotes.in

**७. ग्राहक हक्क**

युरोपियन युनियन ग्राहकांना या माहितीने सुरक्षित वाटू शकते की त्यांनी नको असणारी उत्पादने परत केल्यास त्यांना त्यांचे पैसे परत मिळतील आणि त्यांना प्रवास करताना टाळता येण्याजोगा विलंब किंवा प्रवास रद्द केल्याचा अनुभव आल्यास त्यांना परतावा मिळेल. आणि गुणवत्ता आणि सुरक्षितता या दोन्ही बाबतीत, युरोपियन युनियनच्या दुकानांमधील मानक वस्तू जगातील सर्वात उत्तम वस्तू आहेत.

**८. व्यवसाय, वाढ आणि व्यापार**

युरोपियन युनियन हा जगातील सर्वात मोठा व्यापार गट आहे. हे उत्पादित वस्तू आणि सेवांचे जगातील सर्वात मोठे निर्यातक आहे आणि १०० हून अधिक देशांसाठी सर्वात मोठे आयात बाजार आहे. सदस्यांमधील मुक्त व्यापार हे युरोपियन युनियनच्या संस्थापक तत्त्वांपैकी एक होते. एकल बाजारामुळे  हे शक्य झाले आहे. त्याच्या सीमेपलीकडे, युरोपियन युनियनदेखील जागतिक व्यापार उदारीकरण करण्यासाठी वचनबद्ध आहे.

**९. व्यापार**

युरोपियन युनियनने स्वतंत्र व्यापार धोरणांऐवजी जागतिक मंचावर एकाच आवाजासह कार्य करून मजबूत स्थान प्राप्त केले आहे.जागतिक व्यापाराच्या बाबतीत युरोपियन युनियन प्रमुख स्थानावर आहे. आमच्या व्यापार व्यवस्थेच्या मोकळेपणाचा अर्थ असा आहे की युरोपियन युनियन हा जागतिक व्यापारातील सर्वात मोठा खेळाडू आहे आणि व्यवसाय करण्यासाठी विश्वासार्ह भागीदार आहे.

**युरोपियन युनियन-सिंगापूर मुक्त व्यापार करार:**

२०१८मध्ये स्वाक्षरी केलेला हा करार, युरोपियन युनियन कंपन्यांना सिंगापूरला अधिक निर्यात करणे सोपे करते, कामावरील लोकांच्या हक्कांचे आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यात मदत करते आणि सेवा आणि सरकारी करारांसाठी सिंगापूरची बाजारपेठ युरोपियन युनियन कंपन्यांना खुली करते.

**१०. अन्न गुणवत्ता आणि पर्यावरणीय मानके**

कारण युरोपियन युनियन देश खूप जवळून सहकार्य करतात, अन्न आणि पर्यावरण जगातील काही सर्वोच्च गुणवत्ता मानके पूर्ण करतात.

**११. अन्न**

आरोग्याचे संरक्षण करणे हे सर्व युरोपियन युनियनचे कायदे आणि शेती आणि अन्न क्षेत्रातील मानकांचे उद्दिष्ट आहे. युरोपियन युनियनची –व्याप्ती कायद्याची विस्तृत संस्था युरोपियन युनियनमधील संपूर्ण अन्न उत्पादन आणि प्रक्रिया साखळी तसेच आयात आणि निर्यात केलेल्या वस्तूंचा समावेश करते.

### १२. पर्यावरण

युरोपियन युनियनने जगातील काही कठोर पर्यावरणीय मानके विकसित केली आहेत. युरोपियन युनियन धोरण हवामान, आरोग्य आणि जैवविविधतेचे धोके कमी करण्याचा प्रयत्न करते. युरोपियन युनियनने आधीच उत्सर्जन लक्ष्य गाठले आहे.

### १३. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी आणि विकास

वेगवेगळ्या आकाराच्या २७राष्ट्रांपेक्षा एकजुटीने काम करणाऱ्या युरोपियन युनियन देशांचा जागतिक स्तरावर दबदबा  अधिक आहे. एकत्रितपणे, युरोपियन युनियन संस्था आणि राष्ट्रीय सरकारे हे विकास सहाय्याचे जगातील आघाडीचे दाता आहेत आणि चांगल्या प्रशासनाला चालना देण्यासाठी, उपासमारीचा सामना करण्यासाठी आणि नैसर्गिक संसाधनांचे जतन करण्यासाठी एकत्रितपणे कार्य करतात.

### १४. मुत्सद्दीपणा आणि सुरक्षा

आपल्या राजकीय, व्यावहारिक आणि आर्थिक पाठिंब्याद्वारे, युरोपियन युनियनने युगोस्लाव युद्धांपासून पश्चिम बाल्कनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.एक उदाहरण म्हणजे सर्बिया आणि कोसोवो यांच्यातील युरोपियन युनियनमुळे झालेला सुलभ संवाद होय .ज्यामुळे एप्रिल २०१३मध्ये एक महत्त्वाचा करार झाला जो सध्या युरोपियन युनियन समर्थनासह लागू केला जात आहे.

### १५. मानवी हक्क

युरोपियन युनियने मानवी हक्क धोरण मार्गदर्शक तत्त्वे जसे की दंड, आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, ऑन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धतीनेविकसित केली आहेत. युरोपियन युनियनचे लोकशाही आणि मानवी हक्क या करिता (EIDHR) ज्या देशांमध्ये आणि प्रदेशांमध्ये त्यांना सर्वाधिक धोका आहे तेथे मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्यांचा आदर करण्यासाठी समर्थन प्रदान करते.

### १६. मानवतावादी मदत

जेव्हा मोठ्या आपत्ती किंवा मानवतावादी आपत्कालीन परिस्थिती उद्भवते तेव्हा युरोपियन युनियन युरोपमधील आणि परदेशातील देश आणि लोकसंख्येला मदत पुरवते. एकत्रितपणे, युरोपियन युनियन आणि त्याचे घटक देश हे मानवतावादी मदतीचे जगातील आघाडीचे दाता आहेत. दरवर्षी युरोपियन युनियन८०पेक्षा जास्त देशांमध्ये आपत्ती आणि संघर्षाच्या स्थितीत अडकलेल्या १२०दशलक्षाहून अधिक आपत्ती ग्रस्तांना  अन्न, निवारा, संरक्षण, आरोग्यसेवा आणि स्वच्छ पाणी पुरवते.

### ४.३.१ ब्रेक्झिट

ब्रेक्झिट म्हणजे काय?

'ब्रेक्झिट' हे इंग्लंडच्या  युरोपियन युनियनमधून बाहेर पडण्याला दिलेले नाव आहे. **सार्वमत:** ब्रेक्झिट सोडण्यासाठी सार्वमत २३ जून २०१६ रोजी, इंग्लंडने युरोपियन

युनियनच्या सदस्यत्वावर सार्वमत घेतले. मतदारांसमोर असा प्रश्न होता की : 'इंग्लंडने युरोपियन युनियनचे सदस्य राहावे की युरोपियन युनियन सोडावे?' ५४.८९% मतदारांनी युरोपियन युनियन सोडण्यास मतदान केले. इंग्लंडने३१जानेवारी २०२०रोजी युरोपियन युनियन सोडले.

**ब्रेक्झिटसाठी समयसुची**

२९ मार्च २०१७ रोजी ब्रिटनच्या पंतप्रधान टेरेसा मे यांनी अनुच्छेद ५० लागू केल्यावर युरोपियन युनियन सोडण्याची प्रक्रिया औपचारिकपणे सुरू झाली. सुरुवातीला इंग्लंडकडे युरोपियन युनियनसोबत नवीन संबंधांसाठी वाटाघाटी करण्यासाठी त्या तारखेपासून दोन वर्षे होती. ८ जून २०१७ रोजी झालेल्या स्नॅप निवडणुकीनंतर, मे या देशाच्या नेत्या राहिल्या. तथापि, द कंझर्व्हेटिव्ह पक्षाने संसदेत त्यांचे पूर्ण बहुमत गमावले आणि युरोस्केप्टिक डेमोक्रॅटिक युनियनिस्ट पार्टी (DUP) सोबत करारावर सहमती दर्शविली. यामुळे नंतर तिला संसदेत पैसे काढण्याचा करार मंजूर करण्यात काही अडचण निर्माण झाली. १९जून २०१७रोजी चर्चेला सुरुवात झाली.

२५ नोव्हेंबर २०१८ रोजी, ब्रिटन आणि युरोपियन युनियनयांनी नागरिकांचे हक्क, ब्रेक्झिट विधेयक आणि आयरिश सीमा यासारख्या मुद्द्यांना स्पर्श करून ५९९ पानांचा माघार घेण्याचा करार करून , ब्रेक्झिट करारावर सहमती दर्शवली. १५ जानेवारी २०१९ रोजी संसदेने या करारावर प्रथम मतदान केले. संसदेच्या सदस्यांनी करार नाकारण्यासाठी ४३२-२०२ मते दिली, हा अलीकडील इतिहासातील हाऊस ऑफ कॉमन्समधील सरकारचा सर्वात मोठा पराभव आहे.हाऊस ऑफ कॉमन्सने मंजूर केलेल्या युरोपियन युनियनबरोबर वाटाघाटी केलेला करार तीन वेळा अयशस्वी झाल्यामुळे मे यांनी ७जून २०१९रोजी पक्षाच्या नेत्याचे पद सोडले. पुढच्याच महिन्यात बोरिस जॉन्सन यांची पंतप्रधानपदी निवड झाली.जॉन्सनयांनी ऑक्टोबरच्या अंतिम मुदतीपर्यंत युरोपियन युनियन सोडण्यासाठी एका व्यासपीठावर प्रचार केला आणि म्हणाला की तो करार न करता युरोपियन युनियन सोडण्यास तयार आहे. इंग्लंड आणि युरोपियन युनियन वार्ताकारांनी १७ ऑक्टोबर रोजी ब्रेक्झिट सोडण्याच्या नवीन करारावर सहमती दर्शविली. मे यांच्या करारातील मुख्य फरक म्हणजे आयरिश बॅकस्टॉप कलम नवीन व्यवस्थेसह बदलले गेले आहे.

इंग्लंडने ३१ ऑक्टोबर २०१९ पर्यंत युरोपियन युनियन सोडणे अपेक्षित होते, परंतु इंग्लंडच्या संसदेने सरकारला मुदत वाढविण्यास भाग पाडण्यासाठी मतदान केले आणि नवीन करारावर मतदानास विलंब केला. त्यानंतर बोरिस जॉन्सन यांनी सार्वत्रिक निवडणुकीची मागणी केली. १२ डिसेंबरच्या निवडणुकीत, पाच वर्षांपेक्षा कमी काळातील तिसरी सार्वत्रिक निवडणूक, जॉन्सनच्या कंझर्व्हेटिव्ह पक्षाने हाऊस ऑफ कॉमन्समध्ये ६५० जागांपैकी ३६४ जागांवर प्रचंड बहुमत मिळवले.२४ डिसेंबर, २०२० रोजी, इंग्लंड आणि युरोपियन युनियने एक तात्पुरता मुक्त-व्यापार करार केला ज्यामुळे दोन्ही बाजूंकडून जकात किंवा कोटा या बंधनाशिवाय वस्तूंचा व्यापार करू शकतात. तथापि, भविष्यातील संबंधांचे मुख्य तपशील अनिश्चित राहतात, जसे की सेवांमधील व्यापार, जो इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेच्या ८०% भाग इतका आहे .

munotes.in

इंग्लंडच्या संसदेने १ जानेवारी २०२१ रोजी तात्पुरता करार मंजूर केला होता. त्याला २८ एप्रिल २०२१ रोजी युरोपियन संसदेने मान्यता दिली होती. तर व्यापार आणि सहकार्य करार (TCA) म्हणून ओळखला जाणारा हा करार जकात - आणि कोटा-मुक्त करण्याची परवानगी देतो

**ब्रेक्झिटसाठी युक्तिवाद**

युरोपियन कर्ज संकट, स्थलांतर , दहशतवाद आणि इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेवर ब्रसेल्सच्या नोकरशाहीचा कथित अनिष्ठ परिणाम यामुळे मतदारांनी ब्रेक्झिटला पाठिंबा दिला. ब्रिटन युरोपियन युनियनच्या प्रकल्पांबद्दल बऱ्याच काळापासून सावध आहे, जे मतदारांना वाटते की इंग्लंडच्या सार्वभौमत्वाला धोका आहे: देशाने कधीही युरोपियन युनियनच्या आर्थिक संघाची निवड केली नाही, याचा अर्थ असा की तो युरोऐवजी पौंड वापरतो. जरी ब्रेक्झिटच्या समर्थकांनी राष्ट्रीय अभिमान, सुरक्षा आणि सार्वभौमत्वाच्या मुद्द्यांवर जोर दिला असला तरी ते आर्थिक युक्तिवाद देखील करतात. उदाहरणार्थ, बोरिस जॉन्सन, मतदानाच्या पूर्वसंध्येला म्हणाले, "युरोपियन युनियनचे राजकारणी त्यांच्या "व्यावसायिक हितसंबंधांच्या प्रकाशात" मतदानानंतर दुसऱ्या दिवशी व्यापार करारासाठी दरवाजा ठोठावतील.

## ४.४ दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना (एशियन)

दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना (एशियन) १० दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांचा एक प्रादेशिक गट आहे जो त्याच्या सदस्यांमध्ये आर्थिक, राजकीय आणि सुरक्षा सहकार्याला प्रोत्साहन देतो. ब्रुनेई, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, म्यानमार, फिलीपिन्स, सिंगापूर, थायलंड आणि व्हिएतनाम हे त्याचे सदस्य आहेत. २०२० मध्ये, सर्व एशियन राज्यांचा अंदाजे एकूण GDP अंदाजे ३.०८ ट्रिलियन अमेरिकन डॉलर इतका होता.

**इतिहास:** एशियनची स्थापना ८ऑगस्ट १९६७रोजी बँकॉक, थायलंड येथे संस्थापक सदस्य, इंडोनेशिया, फिलीपिन्स, सिंगापूर आणि थायलंड यांनी आसियान जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करून केली. नंतर, इतर सदस्य प्रादेशिक गटात सामील झाले.

**एसियनची उद्दिष्टे**

- दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांच्या समृद्ध आणि शांततापूर्ण समुदायाचा पाया मजबूत करण्यासाठी समानता आणि भागीदारीच्या भावनेने संयुक्त प्रयत्नांद्वारे प्रदेशातील आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकासाला गती देणे.
- प्रदेशातील देशांमधील संबंधांमध्ये न्याय आणि कायद्याचे राज्य यांचा आदर राखून प्रादेशिक शांतता आणि स्थिरता वाढवणे
- आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक,वैज्ञानिक आणि प्रशासकीय क्षेत्रे इत्यादीमध्ये एकमेकांना सहकार्य करणे .
- शैक्षणिक, व्यावसायिक, तांत्रिक आणि प्रशासकीय क्षेत्रात प्रशिक्षण आणि संशोधन सुविधांच्या स्वरूपात एकमेकांना सहाय्य प्रदान करणे.

- कृषी आणि उद्योग व व्यापार क्षेत्रात आणखी वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी अधिक प्रभावीपणे सहकार्य करणे.
- आग्नेय आशियाई अभ्यासांना प्रोत्साहन देण्यासाठी; आणि
- समान ध्येय आणि उद्दिष्टे असलेल्या विद्यमान आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटनांशी जवळचे आणि फायदेशीर सहकार्य राखणे आणि आपापसात आणखी जवळच्या सहकार्यासाठी सर्व मार्ग शोधणे.

**एसियन संहिता/सनद :**

एसियन संहिता एसियनसाठी कायदेशीर दर्जा आणि संस्थात्मक आराखडा प्रदान करून एशियन समुदाय साध्य करण्यासाठी एक मजबूत पाया म्हणून काम करते. हे एसियन मानदंड, नियम आणि मूल्ये देखील संहिताबद्ध करते; एशियनसाठी स्पष्ट लक्ष्ये निश्चित करते; आणि जबाबदारी सादर करते.

एशियन संहिता१५ डिसेंबर २००८ रोजी अंमलात आली. एशियनसाठी हा अतिशय ऐतिहासिक प्रसंग होता. म्हणून जकार्ता येथील एशियन सचिवालयात एशियन परराष्ट्र मंत्र्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

एशियन सनद लागू झाल्यानंतर, एशियन यापुढे नवीन कायदेशीर चौकटी अंतर्गत कार्य करेल आणि समुदाय-निर्माण प्रक्रियेला चालना देण्यासाठी अनेक नवीन संस्थांची स्थापना करेल असे ठरले.

प्रत्यक्षात, एशियनसनद हा १०एशियन सदस्य राष्ट्रांमध्ये कायदेशीर बंधनकारक करार बनला आहे.

**एसियन संहितेचे महत्त्व खालील संदर्भांमध्ये पाहिले जाऊ शकते:**

• वरच्या स्तरावर नवीन राजकीय बांधिलकी

• नवीन आणि वर्धित वचनबद्धता

• नवीन कायदेशीर आराखडा ,कायदेशीर व्यक्तिमत्व

• नवीन आसियान संस्था

• दोन नवीन खुले-नियुक्त DSGs

• अधिक एशियन बैठका

• एशियन परराष्ट्र मंत्र्यांच्या अधिक भूमिका

• एशियनच्या सरचिटणीसची नवीन आणि वर्धित भूमिका

• इतर नवीन उपक्रम आणि बदल

**एशियन राजकीय सुरक्षा समुदाय:**

राजकीय आणि सुरक्षा सहकार्याच्या क्षेत्रात गेल्या काही वर्षांत जे निर्माण केले गेले आहे त्यावर आधारित, एशियन नेत्यांनी एशियन राजकीय-सुरक्षा समुदाय (APSC) स्थापन करण्यास सहमती दर्शवली. प्रदेशातील देश एकमेकांसोबत आणि जगासोबत न्याय्य, लोकशाही आणि सौहार्दपूर्ण वातावरणात शांततेत राहतील याची खात्री करणे हे APSC चे उद्दिष्ट आहे. समुदायाचे सदस्य केवळ आंतर-प्रादेशिक मतभेदांच्या निराकरणासाठी शांततापूर्ण प्रक्रियेवर विसंबून राहण्याची आणि त्यांची सुरक्षा मूलभूतपणे एकमेकांशी जोडलेली आणि भौगोलिक स्थान, समान दृष्टी आणि उद्दिष्टे यांच्याशी बांधील असल्याची प्रतिज्ञा करतात. त्यात खालील घटक आहेत: राजकीय विकास; नियमांचे आकार आणि सामायिकरण; संघर्ष प्रतिबंध; संघर्ष निराकरण; संघर्षोत्तर शांतता निर्माण; आणि अंमलबजावणी यंत्रणा इ.

आशियाई राजकीय सुरक्षा समुदायाच्या (APSC) ब्लूप्रिंटमध्ये (कार्यक्रम रूपरेषेमध्ये) एशियन हा सामायिक मूल्ये आणि मानदंडांचा नियम-आधारित समुदाय आहे; सर्वसमावेशक सुरक्षेसाठी सामायिक जबाबदारीसह एकसंध, शांततापूर्ण, स्थिर आणि लवचिक प्रदेश आहे ; तसेच वाढत्या एकात्मिक आणि परस्परावलंबी जगात एक गतिमान प्रदेश आहे .APSC ब्लूप्रिंट आसियान चार्टर आणि त्यात समाविष्ट असलेल्या तत्त्वे आणि उद्देशांद्वारे मार्गदर्शन केले जाते. हे २०१५पर्यंत APSC ची स्थापना करण्यासाठी एक आराखडा आणि समयसुची प्रदान करते. त्याचे महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी आणि चिरस्थायी गुणवत्ता ठेवण्यासाठी २०१५नंतरही कार्यक्रम/क्रियाप्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी लवचिकतेसाठी जागा सोडते.

**आशियाई आर्थिक समुदाय:**

आशियाई आर्थिक समुदाय (AEC)हे क्षेत्राच्या आर्थिक एकीकरणाच्या अंतिम उद्दिष्टाची प्राप्ती आहे. हे एशियनची एक एकल बाजारपेठ आणि उत्पादन आधार, एक अत्यंत स्पर्धात्मक क्षेत्र, समान आर्थिक विकासासह आणि जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये पूर्णपणे समाकलित अशी कल्पना करते. AEC चा इतिहास १९९२पर्यंत शोधला जाऊ शकतो जेव्हा एशियननेत्यांनी एशियनमुक्त व्यापार क्षेत्र (AFTA) ची निर्मिती अनिवार्य केली. तेव्हापासून, प्रदेशाच्या आर्थिक क्षमतांचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न तीव्र केले गेले. १९९७मध्ये नेत्यांनी एशियन व्हिजन २०२०चा स्वीकार केल्यामुळे वस्तू, सेवा, गुंतवणुकीचा मुक्त प्रवाह, भांडवलाचा मुक्त प्रवाह, न्याय्य आर्थिक विकास आणि घटलेली गरिबी आणि सामाजिक-आर्थिक विषमता यासह एक अत्यंत स्पर्धात्मक प्रदेश म्हणून एशियनची कल्पना करण्यात आली आहे.

१९९८मध्ये, नेत्यांनी हनोई कृती योजना (HPA) स्वीकारली. एशियन व्हिजन २०२० साकारण्यासाठी आर्थिक एकात्मतेसाठी पुढाकारांचा संच तयार केला. एकात्मिक प्रदेशाची गरज ओळखून, नेत्यांनी २००३मध्ये एशियन सुसंवाद २ ची घोषणा जारी केली ज्याने एशियन समुदायाची स्थापना केली होती (सुरुवातीला लक्ष्य२०१५पर्यंत केले होते परंतु नंतर २०२०द्वारे लक्ष्यित केले गेले) एशियन सुसंवाद २ च्या घोषणेमध्ये AEC सह तीन स्तंभांचा समावेश आहे

आशियाई आर्थिक समुदाय (AEC) ब्लूप्रिंट २०१५ ही २००७ मध्ये AEC च्या स्थापनेला मार्गदर्शन करणारा सुसंगत मास्टर प्लॅन म्हणून स्वीकारण्यात आला. त्यानंतर लगेचच, एशियनच्या आर्थिक एकात्मता कार्यसूचीच्या पुढील टप्प्यासाठी धोरणात्मक दिशानिर्देश निश्चित करण्यासाठी नवीन AEC ब्लूप्रिंट २०२५ विकसित करण्यात आली. AEC ब्लूप्रिंट २०२५आर्थिक एकात्मता अधिक सखोल करण्यासाठी आणि पुढील वैशिष्ट्यांसह अधिक एकात्मिक आर्थिक समुदाय साध्य करण्यासाठी परिकल्पित आहे:

- एक उच्च समाकलित आणि एकसंध अर्थव्यवस्था
- एक स्पर्धात्मक, नाविन्यपूर्ण आणि गतिमान एशियन
- वर्धित सहसंबंध आणि क्षेत्रीय सहकार्य
- एक लवचिक, सर्वसमावेशक, लोकाभिमुख आणि लोक-केंद्रित एशियन आणि
- जागतिक एशियन

ही वैशिष्ट्ये एशियन कम्युनिटी व्हिजन २०२५ अंतर्गत AEC च्या दृष्टीला समर्थन देतात.

**एशियन सामाजिक सांस्कृतिक समुदाय**:

एशियन सामाजिक सांस्कृतिक समुदाय हा एशियन नागरिकांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करून देणारा आहे. ASCC ब्लूप्रिंट २०२५ एशियन नेत्यांनी २२ नोव्हेंबर २०१५ रोजी क्वालालंपूर, मलेशिया येथे झालेल्या २७ व्या एशियन शिखर परिषदेत स्वीकारली होती.

आशियाई सामाजिक, सांस्कृतिक समुदाय (ASCC) यासाठी काम करत आहे:

- एशियन लोकांच्या फायद्यासाठी वचनबद्ध, सहभागी आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार समुदाय
- एक सर्वसमावेशक समुदाय जो उच्च गुणवत्तेचे जीवनमान, सर्वांसाठी संधींमध्ये समान प्रवेश, आणि मानवी हक्कांना प्रोत्साहन आणि संरक्षण देतो.
- एक शाश्वत समुदाय जो सामाजिक विकासाला प्रोत्साहन देतो आणि पर्यावरण संरक्षण याला चालना देतो.
- सामाजिक आणि आर्थिक असुरक्षा, आपत्ती, हवामान बदल आणि इतर नवीन आव्हानांना अनुकूल आणि प्रतिसाद देण्याची वर्धित क्षमता आणि कुवत असलेला एक लवचिक समुदाय, आणि
- एक गतिशील आणि सामंजस्यपूर्ण समुदाय ज्याला त्याची ओळख, संस्कृती आणि वारसा याची जाणीव आणि अभिमान आहे.

हे साध्य करण्यासाठी, सदस्य राष्ट्रे विविध क्षेत्रांवर सहकार्य करत आहेत, ज्यात: संस्कृती आणि कला, माहिती आणि माध्यम, शिक्षण, युवक, क्रीडा, समाज कल्याण आणि विकास, लिंग, महिला आणि मुलांचे हक्क, ग्रामीण विकास आणि गरिबी निर्मूलन, कामगार, नागरी

munotes.in

सेवा, पर्यावरण, धुके, आपत्ती व्यवस्थापन आणि मानवतावादी सहाय्य आणि आरोग्य इत्यादीचा समावेश आहे .

**आसियान आणि भारत:**

भारत १९९६मध्ये एशियन संवादाचा भागीदार बनला. प्राथमिक एशियन आकडेवारी असे दर्शविते की एशियन आणि भारत यांच्यातील द्वि-मार्गी व्यापारी व्यापार २०१९मध्ये USD ७७.०बिलियनवर पोहोचला, तर भारतातून एकूण विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक २.०अब्ज डॉलर्स इतकी झाली. यामुळे भारताला एशियनचा सहावा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आणि एशियन डायलॉग पार्टनर्समध्ये विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा आठवा सर्वात मोठा स्रोत म्हणून स्थान मिळाले. २००३मध्ये झालेल्या दुसऱ्या एशियन-भारत शिखर परिषदेत, नेत्यांनी सर्वसमावेशक आर्थिक सहकार्यावरील एशियन-भारत विकास आराखडा करारावर स्वाक्षरी केली. या कराराने एशियन-भारत मुक्त व्यापार क्षेत्र (FTA) च्या स्थापनेसाठी ठोस आधार दिला आहे, ज्यामध्ये वस्तू, सेवा आणि गुंतवणुकीत मुक्त व्यापार कराराचासमाविष्ट आहे.

**एशियन-इंडिया ट्रेड इन गुड्स करार** (AITIGA) १जानेवारी २०१०रोजी हा करार अंमलात आला. सदर करारावर बँकॉकमध्ये १३ऑगस्ट २००९रोजी स्वाक्षरी केल्याने ४.९अब्ज पेक्षा जास्त लोकसंख्या व एकत्रित स्थूल देशांतर्गत उत्पादन ५.३६ TRILLION डॉलर असणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या मुक्त व्यापार क्षेत्रांपैकी एक निर्माण करण्याचा मार्ग मोकळा झाला. एशियन-भारत व्यापार करार सर्व पक्षांनी १३ नोव्हेंबर २०१४ रोजी नियुक्त केला होता आणि १जुलै २०१५ रोजी अंमलात आला होता. एशियन-भारत गुंतवणूक करारावर १२ नोव्हेंबर २०१४ रोजी सर्व पक्षांनी स्वाक्षरी केली होती.

**सहकार्याची प्राधान्य क्षेत्र**

कार्यक्रम आराखडा करारांतर्गत, एशियन आणि भारत खालील क्षेत्रांना प्राधान्य देतात:

**• व्यापार सुविधा:**

१. परस्पर ओळख व्यवस्था, अनुरूप मूल्यांकन, मान्यता प्रक्रिया आणि मानके आणि तांत्रिक नियम;

२. जकात विरहीत उपाय .

३. सीमाशुल्क सहकार्य

४. व्यापार वित्तपुरवठा; आणि

५. व्यवसाय व्हिसा आणि प्रवास सुविधा.

**• सहकार क्षेत्रे:**

१. कृषी, मत्स्यपालन आणि वनीकरण;

२. सेवा: मीडिया आणि मनोरंजन, आरोग्य, आर्थिक, पर्यटन, बांधकाम, व्यवसाय प्रक्रिया आउटसोर्सिंग, पर्यावरणीय;

munotes.in

३. खाण आणि ऊर्जा: तेल आणि नैसर्गिक वायू, वीज निर्मिती आणि पुरवठा;

४. विज्ञान आणि तंत्रज्ञान: माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक वाणिज्य, जैवतंत्रज्ञान;

५. वाहतूक आणि पायाभूत सुविधा: वाहतूक आणि दळणवळण;

६. उत्पादन: ऑटोमोटिव्ह, औषधे आणि फार्मास्युटिकल्स, कापड, पेट्रोकेमिकल्स, वस्त्रे, अन्न प्रक्रिया, चामड्याच्या वस्तू, हलक्या अभियांत्रिकी वस्तू, रत्ने आणि दागिने प्रक्रिया

७. मानव संसाधन विकास: क्षमता निर्माण, शिक्षण, तंत्रज्ञान हस्तांतरण; आणि इतर: हस्तकला, लघु आणि मध्यम उद्योग, स्पर्धा धोरण, मेकाँग बेसिन विकास, बौद्धिक संपदा हक्क, सरकारी खरेदी.

- व्यापार आणि गुंतवणूक प्रोत्साहन:

१. व्यापारी जत्रा आणि प्रदर्शने;

२. एशियन-भारत वेबलिंक्स; आणि

३. व्यवसाय क्षेत्रातील संवाद.

## ४.५ सारांश

या प्रकरणामध्ये आपण आर्थिक एकात्मता या शब्दाचा अर्थ अभ्यासला. ही एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे विविध देश आर्थिकदृष्ट्या एकत्रित होऊन मोठी अर्थव्यवस्था निर्माण करतात. आंतरराष्ट्रीय विशेषीकरण, मोठे उत्पादन, श्रमांची गतिशीलता याद्वारे मोठी बाजारपेठ निर्माण करणे हे आर्थिक एकीकरणाचे उद्दिष्ट आहे. आर्थिक एकात्मता विविध रूपे घेते. प्राधान्य व्यापार करारांतर्गत, सदस्य देश एकमेकांकडून आयातीवर शुल्क कमी करतात. मुक्त व्यापारांतर्गत, सदस्य देश आपापसात जकात आणि इतर व्यापार निर्बंध पूर्णपणे काढून टाकतात. जकाती संघांतर्गत, सदस्य देश आपापसातील सर्व शुल्क आणि इतर व्यापार अडथळे रद्द करतात. सामायिक बाजारामध्ये सदस्य देशांमधील जकात आणि व्यापार निर्बंध रद्द करणे आणि सामान्य बाह्य जकातीचा अवलंब करणे समाविष्ट आहे. आर्थिक संघ म्हणजे जिथे देश एकल आर्थिक एकक तयार करतात. युरोपियन युनियन हे आर्थिक संघाचे उदाहरण आहे

मास्ट्रिचच्या कराराने १९९३मध्ये युरोपियन युनियन कॉमन मार्केटची स्थापना केली. युरोपियन युनियन चे मुख्य आर्थिक इंजिन एकल बाजार आहे. हे बहुतेक वस्तू, सेवा, पैसा आणि लोकांना बहुतेक प्रदेशात मुक्तपणे फिरण्यास सक्षम करते. २०१६मध्ये, ग्रेट ब्रिटनने युरोपियन युनियन सोडण्यासाठी मतदान केले. यालाच BREXIT असे म्हणतात. एशियन हे १०दक्षिण आशियाई देशांचे एकत्रीकरण आहे. या प्रदेशातील आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकासाला गती देण्याच्या उद्देशाने याची निर्मिती करण्यात आली आहे.

munotes.in

## ४.६ प्रश्न

१) आंतरराष्ट्रीय आर्थिक एकीकरण म्हणजे काय? आंतरराष्ट्रीय आर्थिक एकात्मतेच्या प्रकारांची चर्चा करा.

२) आंतरराष्ट्रीय आर्थिक एकात्मतेच्या उद्दिष्टांची चर्चा करा.

३) आंतरराष्ट्रीय आर्थिक एकात्मतेच्या फायद्यांची चर्चा करा.

४) ब्रेक्झिटच्या विविध पैलूंवर चर्चा करा

५) ब्रेक्झिटची कारणे काय आहेत?

६) युरोपियन युनियनच्या स्थापनेची उद्दिष्टे काय आहेत?

७) युरोपियन युनियनची उपलब्धी काय आहे?

८) एशियनची मूलभूत तत्त्वे आणि दृष्टीकोन यावर चर्चा करा.

९) एशियनच्या उद्दिष्टांची चर्चा करा

❖❖❖❖

munotes.in

## प्रकरण ३

# ५

# व्यवहारतोल आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटन

## भाग - १

**घटक रचना**

५.० उद्दिष्टे

५.१ व्यवहारशेष अर्थ आणि रचना

५.२ व्यवहारशेषातील असंतुलनाचे प्रकार

५.३ व्यवहारशेषातील असंतुलनाची कारणे

५.४ सारांश

५.५ प्रश्न

## ५.० उद्दिष्ट्ये

१) व्यवहारशेषाचा अर्थ आणि रचना समजून घेणे

२) व्यवहारशेषातील असंतुलनाच्या प्रकारांचा अभ्यास करणे

३) व्यवहारशेषातील असंतुलनाच्या कारणांचा अभ्यास करणे

## ५.१ व्यवहारशेषाचा अर्थ आणि रचना

### ५.५.१ व्यवहारशेषाचा अर्थ

देशाचा व्यवहारशेष हा देशाचे रहिवासी आणि उर्वरित जग यांच्यातील सर्व आर्थिक व्यवहारांची पद्धतशीर नोंद आहे. व्यवहारशेष हा वर्षभरातील सर्व आर्थिक व्यवहारांमधून उद्भवलेल्या आणि इतर देशांकडून प्राप्त झालेल्या येणी आणि देणी यांचे एकत्रित खाते आहे .

सी. बी. किंडलबर्जर यांच्या शब्दात, " एखाद्या देशाचा व्यवहारशेष हा दिलेल्या कालावधीत अहवाल देणारे रहिवासी आणि परदेशी देशांमधील रहिवासी यांच्यातील सर्व आर्थिक व्यवहारांची पद्धतशीर नोंद आहे. "

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यवहारशेषाची व्याख्या " सांख्यिकीय विधान म्हणून केली आहे जी नंतर एका विशिष्ट कालावधासाठी, उर्वरित जगासह अर्थव्यवस्थेच्या आर्थिक व्यवहारांचा सारांश देते ".

munotes.in

व्यवहारशेषाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत

१) हे एका देशाचे रहिवासी आणि उर्वरित जग यांच्यातील सर्व आर्थिक व्यवहारांची पद्धतशीर नोंद आहे .

२) यात ठराविक कालावधीत दृश्य वस्तू आणि अदृश्य सेवा आणि भांडवलामधील सर्व व्यवहारांचा समावेश होतो.

३) हे लेखांकनांच्या दुहेरी नोंद प्रणालीवर आधारलेले आहे. अशा प्रकारे प्रत्येक आंतरराष्ट्रीय व्यवहाराचा परिणाम हा समान आकाराच्या जमा नोंद आणि खर्च नोंद यामध्ये होईल.

४ ) उर्वरित जगासोबत चालणारे सर्व आर्थिक व्यवहार हे एकतर जमा किंवा खर्च अशा प्रकारे होतात .

५) लेखांकनांच्या दृष्टीने एकूण खर्च नेहमी एकूण जमेच्या बरोबरी चा असेल म्हणून व्यवहारशेष नेहमी समतोल राहील . परंतु आर्थिक अर्थाने जमा ही खर्चापेक्षा जास्त असेल तर व्यवहारशेष

अनुकूल असेल आणि खर्च हा जमेपेक्षा जास्त असेल तर व्यवहारशेष हा प्रतिकूल राहील .

**५.१.२ व्यवहरशेषाची रचना :--** संबंधित व्यवहारांच्या विस्तृत स्वरूपानुसार एखाद्या देशाचा व्यवहारशेष हा पुढील चार भागांमध्ये विभागलेला आहे.

**१) चालू खाते २) भांडवली खाते ३) त्रुटी व चुका ४) अधिकृत राखीव खाते**

व्यवहारशेषाची रचना पुढीलप्रमाणे असते .

| अ.न . | चालू खाते | |
|---|---|---|
| १) | अ) व्यापारतोल | वस्तूंची निर्यात<br>वस्तूंची आयात |
| | ब) अदृश्य व्यापार | सेवांची निर्यातसेवांची आयात |
| | क) इतर प्रवाह | गुंतवणूक उत्पन्न<br>एकतर्फी हस्तांतरण |
| २) | भांडवली खाते | दीर्घकालीन भांडवली व्यवहार<br>अल्पकालीन भांडवली व्यवहार |
| ३) | त्रुटी आणि चुका | |
| ४) | अधिकृत राखीव खाते | |

munotes.in

### १) चालू खाते :-

व्यवहारशेषाच्या चालू खात्यामध्ये वस्तू आणि सेवांच्या व्यापारातून, एका देशाकडून भांडवलात जमा झालेल्या उत्पन्नापासून आणि दुसऱ्या देशामध्ये गुंतवलेल्या आणि खाजगी आणि अधिकृत अशा दोन्ही प्रकारच्या एकतर्फी हस्तांतरणापासून उद्भवणारे सर्व व्यवहार समाविष्ट आहेत.

चालू खाते पुढील तीन भागात विभागले आहे .

अ) यापैकी पहिल्याला व्यापारतोल किंवा दृश्यमान खाते असे म्हणतात. हे खाते भौतिक वस्तूंची आयात आणि निर्यात नोंदविते. दृश्यमान आयात आणि दृश्यमान निर्यात यांच्या

समतोलाला दृश्य व्यापाराचा समतोल किंवा व्यापाराचा समतोल असे म्हणतात.

ब) खात्याच्या दुसऱ्या भागाला अदृश्य खाते म्हटले जाते कारण ते सर्व निर्यात आणि आयात सेवांची नोंद करते. या व्यवहारांच्या समतोलाला अदृश्य व्यापाराचा समतोल म्हणतात. त्यात जहाजे आणि विमानांचे मालवाहतूक आणि भाडे , विमा आणि बँकिंग शुल्क, परदेश दौरे आणि परदेशात शिक्षण, व्याजातून होणारे व्यवहार आणि परदेशी गुंतवणुकीवरील लाभांश इ. चा समावेश होतो.

क) गुंतवणुकीच्या उत्पन्नामध्ये बोनस आणि कर्जावरील व्याज, नफा आणि लाभांश यांचा समावेश होतो. तर एकतर्फी हस्तांतरणामध्ये अनुदान, भेटवस्तू, पेन्शन यांचा समावेश होतो.

### २) भांडवली खाते :

भांडवली खाते आर्थिक मालमत्तेच्या मालकीच्या आंतरराष्ट्रीय हालचालींशी संबंधित व्यवहार दाखविते. हे शेअर्स, मालमत्ता किंवा कंपन्यांची बँक कर्जे, सरकारी रोखे इत्यादीचे थेट अधिग्रहण यासारख्या विदेशी मालमत्तेमध्ये सीमापार हालचालींचा संदर्भ देते. दुसऱ्या शब्दात, भांडवली खाते परदेशातून आणि परदेशात भांडवलाची निर्यात आणि आयात नोंदविते.

भांडवली खाते हे दोन मुख्य भागांमध्ये विभागलेले आहे. एक म्हणजे अल्पकालीन आणि दुसरा म्हणजे भांडवलाची दीर्घकालीन हालचाल होय. अल्प मुदतीचे भांडवल असे आहे की जे एक वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत परिपक्व होते. जसे की बँक खाती. दीर्घकालीन भांडवल म्हणजे ज्याचा परिपक्वता कालावधी हा एक वर्षापेक्षा जास्त आहे. जसे की दीर्घकालीन रोखे किंवा भौतिक भांडवल होय.

दीर्घकालीन भांडवली खाते पुन्हा दोन श्रेणीचे आहे. ते म्हणजे थेट गुंतवणूक आणि पोर्टफोलिओ गुंतवणूक. थेट गुंतवणूक म्हणजे निश्चित भांडवल निर्मितीवरील खर्चाचा संदर्भ, तर पोर्टफोलिओ गुंतवणूक म्हणजे रोखे, समभाग इत्यादींसारख्या आर्थिक मालमत्तेचे संपादन होय.

**३) चुका आणि वगळणे :--**

व्यवहारशेष नेहमी तत्त्वतः समतोलात असल्याने सर्व खर्च सर्व जमेद्वारे समतोलात केले जाणे आवश्यक आहे. पण प्रत्यक्षात असे क्वचितच घडते कारण आकडेवारी अपूर्ण तसेच चुकीची असल्याने असे होते. म्हणूनच व्यवहारशेषाची खाती ही समतोल ठेवली जातात.

**४) अधिकृत राखीव खाते :-**

एकूण १,२,३ आणि४ मध्ये एकूण शिल्लक समाविष्ट आहे. अधिकृत राखीव खात्याच्या श्रेणीमध्ये सरकारच्या व्यवहारांची निव्वळ रक्कम समाविष्ट असते. हे खाते केंद्रीय चलन प्राधिकरणाद्वारे राखीव मालमत्तेची खरेदी आणि विक्री जसे की सोने, परिवर्तनीय परकीय चलन आणि विशेष आहरण अधिकार यांचा समावेश करते.

व्यवहारशेषाचा सारांश खालीलप्रमाणे असू शकतो.

चालू खात्यातील शिल्लक + भांडवली खात्यातील शिल्लक + राखीव शिल्लक = देयकाची शिल्लक

व्यवहारशेषाच्या मूलभूत समतोलात एकूणच व्यवहारशेष खाती नेहमी हिशेबाच्या दृष्टीने समतोल राहतील. त्यांनी समतोल राखला पाहिजे करण देणी बाजूने परकीय चलनाचा कोणताही प्रवाह येणी बाजूने परकीय चलनाच्या प्रवाहाशी जुळला पाहिजे. हे असे असण्याचे कारण म्हणजे दुहेरी नोंद पुस्तपालन प्रणाली अंतर्गत जमा आणि खर्च व्यवहार एकमेकांशी समान असतात.

व्यवहारशेषातील असमतोल :-हिशेबाच्या दृष्टीने व्यवहारशेष हा नेहमी समतोलात असला तरी प्रत्यक्षात चालू आणि भांडवली खात्यातील फरकामुळे तो असंतुलनात असेल. व्यवहारशेषातील असमतोल म्हणजे अतिरिक्त स्थिती किंवा तूट अशी अवस्था होय.जेंव्हा एकूण जमा एकूण खर्चापेक्षा जास्त होते तेंव्हा व्यवहारशेषात अधिक्य निर्माण होते . अशा प्रकारे व्यवहारशेष = जमा >खर्च आणि जेव्हा एकूण देणी एकूण येण्यांपेक्षा जास्त होतात तेव्हा व्यवहारशेषात तूट निर्माण होते. अशा वेळी व्यवहारशेष = जमा <खर्च असे होते.

स्वायत्त आणि सामावून घेणारी हालचाल :--

व्यवहारशेषात दोन प्रकारचे व्यवहार आहेत . स्वायत्त आणि सोयीस्कर. स्वायत्त व्यवहार असे आहेत की जे व्यवहारशेषाच्या इतर वस्तूंमधील व्यवहाराकडे दुर्लक्ष करून होतात. चालू आणि भांडवली खात्यातील सर्व व्यवहार हे स्वायत्त व्यवहार आहेत. कारण ते व्यवहारशेषातील इतर व्यवहारांपेक्षा स्वतंत्र आहेत आणि उत्पन्न आणि नफा विचारात घेऊन प्रभावित होतात. वस्तू आणि सेवांची निर्यात आणि आयात, थेट परकीय गुंतवणूक यासारख्या व्यवहारांचा समावेश यात होतो. दुसरीकडे सामावून घेणारे व्यवहार हे व्यवहारशेषातील इतर व्यवहारांवर अवलंबून असतात. ते भांडवल किंवा चालू खात्यातील तूट किंवा अधिशेष भरून काढण्यासाठी हाती घेतले जातात. जेंव्हा स्वायत्त व्यवहारांमध्ये असंतुलन होते तेंव्हा ते घडतात. तूट किंवा अधिशेष समतोल प्रवाहाच्या मदतीने संतुलित करणे आवश्यक आहे. ते कर्ज किंवा परदेशातून मिळणाऱ्या स्वरूपात आहेत. त्यांचा वापर

व्यवहारशेषातील तूट किंवा अधिशेष संतुलित करण्यासाठी आणि व्यवहारशेषाचा एकूण समतोल राखण्यासाठी केला जातो.

## ५.२ व्यवहारशेषातील असंतुलनाचे प्रकार

व्यवहारशेषातील असंतुलनाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत

**१) अल्पकालीन असंतुलन** :- हे असंतुलन असे आहे की जे एक वर्ष किंवा त्याहून अधिक काळ टिकते. ते परदेशी वस्तू आणि सेवांच्या मागणीत अचानक बदल झाल्याने होतात. आर्थिक संकटाच्या, नैसर्गिक आपत्तीसारख्या देशांतर्गत समस्यांमुळे आयात वाढू शकते किंवा निर्यात कमी होऊ शकते. असे असमतोल तात्पुरत्या स्वरूपाचे असतात. आणि ते अल्प मुदतीच्या कर्जाद्वारे किंवा भांडवली खात्यातील इतर समायोजनाद्वारे दुरुस्त केले जाऊ शकतात.

**२) दीर्घकालीन असंतुलन** :-- दीर्घकालीन असंतुलन हे एखाद्या देशाच्या व्यवहारशेषामध्ये खोलवर रुजलेली, सततची तूट किंवा अधिशेष दर्शविते. कालक्रमानुसार जमा होणारे अल्पकालीन असंतुलन हे तूट किंवा अधिशेषांमुळे उद्भवणारे भौतिक असंतुलन आहे. एखाद्या देशाच्या व्यवहारशेषातील दीर्घकालीन तूट त्या देशाचा परकीय चलनसाठा कमी करते. आणि सततच्या तुटीमुळे अशा कालावधीत देश परदेशी लोकांकडून आणखी कर्ज उभा करू शकत नाही. थोडक्यात, खरे असंतुलन ही दीर्घकालीन घटना आहे. हे सतत खोलवर रुजलेल्या गतिमान बदलांमुळे होते जे दीर्घ कालावधीत अर्थव्यस्थेत होत असतात . भांडवल निर्मिती, लोकसंख्या वाढ, तांत्रिक प्रगती, नवकल्पना इत्यादी गतिमान घटकांतील बदलांमुळे हे घडते.

**३) चक्रीय असंतुलन** :-- हे व्यापरचक्रांमुळे उद्भवते . समृद्धी आणि मंदी यासारख्या व्यापारचक्राच्या वेगवेगळ्या टप्प्यावर अवलंबून मागणी आणि इतर शक्ती बदलतात, ज्यामुळे व्यापाराच्या अटींमध्ये तसेच व्यापाराच्या वाढीमध्ये बदल होतात आणि त्यानुसार अतिरिक्त किंवा तूट व्यवहारशेषाच्या संतुलनावर परिणाम करते . व्यवहारशेषात चक्रीय असंतुलन उद्भवू शकते कारण

अ) व्यापारचक्रे वेगवेगळ्या देशात वेगवेगळे मार्ग आणि नमुन्यांचे अनुसरण करतात. वेगवेगळ्या देशांमध्ये व्यापार चक्राच्या घटनांची एकसारखी वेळ आणि नियतकालीकता नाही.

ब) विविध देशातील आयातीच्या मागणीची उत्पन्न लवचिकता एकसारखी नसते.

क) आयातीच्या मागणीची किंमत लवचिकता वेगवेगळ्या देशात भिन्न असते.

थोडक्यात, चक्रीय चढउतार यामुळे उत्पन्न, रोजगार, उत्पादन आणि किमतीच्या चलामध्ये चक्रीय बदलांमुळे व्यवहारशेषाच्या संतुलनात असंतुलन निर्माण होते. जेंव्हा समृद्धीच्या काळात किमती वाढतात आणि मंदीच्या काळात घसरतात, तेंव्हा ज्या देशाला आयातीसाठी अत्यंत लवचिक मागणी असते त्या देशाच्या आयातीच्या मूल्यात घसरण होते. आणि जर त्याने आपली निर्यात पुढे चालू ठेवली तर ते व्यवहारशेषात अतिरिक्त प्रमाण

दर्शवेल . तूट आणि अधिशेष पर्यायाने व्यापारचक्राच्या नैराश्य आणि समृद्धी टप्प्यात होत असल्याने संपूर्ण व्यापारचक्रात देयक समतोल आपोआप स्थापित केला जातो.

**४) रचनात्मक असमतोल** :-- जेंव्हा अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल होतात तेव्हा अशा प्रकारचा असमतोल निर्माण होतो. उत्पादन तंत्रात बदल होणे, ग्राहकांच्या आवडी - निवडी , सवयी , फॅशन इत्यादी गोष्टी बदलणे तसेच बाजारात एखादी नवीन पर्यायी वस्तू उपलब्ध होणे यासारख्या कारणांमुळे रचनात्मक असमतोल निर्माण होतो. देशाची आयात कमी होत नाही पण निर्यात मात्र कमी होते. अशा प्रकारच्या असमतोलास रचनात्मक असमतोल म्हणतात.

## ५.३ व्यवहारशेषातील असमतोलाची कारणे

व्यवहारशेषातील चालू आणि भांडवली खात्यातील येणी आणि देणी यांच्यातील असंतुलनाचा परिणाम म्हणजे व्यवहारशेषातील असमतोल होय. देशाच्या व्यवहारशेषातील असंतुलन हे अल्प किंवा दीर्घ कालावधीसाठी उद्भवू शकते . व्यवहारशेषातील हे असंतुलन एकाच वेळी अनेक कारणांमुळे किंवा घटनांमुळे निर्माण होऊ शकते.

देशाच्या व्यवहारशेषातील असंतुलनाची महत्वाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**१) व्यापारचक्र** :-- चक्रीय चढउतार सामान्यतः चक्रीय असंतुलन निर्माण करतात. कोणत्याही विकसित देशातील मंदी किंवा चलनवाढीचा परिणाम उर्वरित जगावर होऊ शकतो. उत्पन्न, मागणी, उत्पादनातील चक्रीय चढउतार एका देशातून दुसऱ्या देशात प्रसारित होतात. यामुळे देशाच्या निर्यातीवर परिणाम होतो आणि व्यवहारशेषात तूट निर्माण होते.

**२) प्रचंड विकासात्मक आणि गुंतवणूक कार्यक्रम**:-- विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये प्रचंड विकास आणि गुंतवणूक कार्यक्रम हे या देशांच्या व्यवहारशेषात असंतुलन निर्माण करतात. जलद औद्योगिकीकरण करण्यासाठी भांडवलाअभावी त्यांची आयात करण्याची प्रवृत्ती वाढतच चालली आहे ; निर्यातीला त्या प्रमाणात चालना मिळत नाही कारण हे प्राथमिक उत्पादक देश आहेत.

**३) बदलती निर्यात मागणी** :-- प्रगत देशांमधील अत्यावश्यक अन्नधान्य, कच्चा माल, पर्यायी वस्तू इत्यादींच्या संदर्भात देशांतर्गत उत्पादनातील सुधारणांमुळे अविकसित देशांमधून प्राथमिक वस्तूंची आयात करण्याची त्यांची गरज कमी झाली आहे. अशा प्रकारे निर्यातीच्या मागणीत लक्षणीय बदल झाला आहे. परिणामी या देशांमध्ये संरचनात्मक असंतुलन निर्माण झाले आहे. त्याचप्रमाणे प्रगत राष्ट्रांना देखील या राष्ट्रांच्या स्वावलंबनाच्या प्रवृत्तीमुळे विकसनशील देशातील बाजारपेठ गमावल्यामुळे निर्यात उत्पन्नात घट झाली आहे. परंतु व्यवहारशेषातील असमतोल म्हणजे तूट ही प्रगत आणि श्रीमंत राष्ट्रांपेक्षा अविकसित किंवा विकसनशील राष्ट्रांमध्ये अधिक तीव्र असल्याचे दिसून येते.

**४) लोकसंख्या वाढ:--** अविकसित देशांमधील उच्च लोकसंख्या वाढ त्यांच्या व्यवहारशेषातील संतुलन स्थितीवर विपरीत परिणाम करते. कारण लोकसंख्या वाढल्याने आयात वाढते आणि निर्यात कमी होते .

**५) अवाढव्य बाह्य कर्ज** :-- व्यवहारशेषाच्या रकमेमध्ये अतिरिक्त किंवा तूट येण्याचे आणखी एक कारण आंतरराष्ट्रीय कर्ज आणि गुंतवणूकीतून उद्भवते. जेंव्हा एखादा देश दुसऱ्या देशाकडून मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतो तेंव्हा त्या देशाचा व्यवहारशेष प्रतिकूल असू शकतो. तर कर्ज देणारा देश अनुकूल व्यवहारशेष अनुभवतो तर कर्ज घेणारा देश प्रतिकूल व्यवहारशेष अनुभवतो.

**६) महागाई :--** जलद आर्थिक विकासामुळे देशात मोठ्या प्रमाणावर महागाई वाढते. आणि याचा परिणाम हा व्यवहारशेष असंतुलित होण्यात जाणवतो. वाढत्या उत्पन्नासह या देशांमध्ये आयात करण्याची सीमांत प्रवृत्ती जास्त आहे यामुळे त्यांची आयात मालाची मागणी वाढते.

तसेच या देशांमध्ये उपभोगाची सीमांत प्रवृत्ती देखील जास्त असल्याने देशांतर्गत वस्तूंसाठी लोकांची मागणीही वाढते. तसेच निर्यातही कमी होते. अशा प्रकारे सर्वसाधारणपणे वस्तू आणि सेवांच्या खरेदीसाठी पैशाची मागणी जास्त असेल त्यामुळे किमत पातळी वाढेल. तुलनात्मक किंमत पातळीतील वाढ निश्चितच आयातीला प्रोत्साहन देते आणि निर्यातीला परावृत्त करते, परिणामी व्यवहारशेषात तूट शिल्लक राहते.

**७) अनुकरण परिणाम** :- अनुकरण परिणाम हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे जो अविकसित देशाच्या व्यवहारशेषात तूट निर्माण करतो. जेंव्हा अविकसित राष्ट्रातील लोकांचा आर्थिक किंवा सामाजिक संबंधाद्वारे प्रगत देशांवर प्रभाव पडतो तेंव्हा या लोकांच्या उपभोग पद्धतीवर प्रात्यक्षिक प्रभाव पडतो आणि ते पाश्चात्य उपभोग पद्धतीचा अवलंब करू इच्छितात जेणेकरून त्यांची आयात करण्याची प्रवृत्ती वाढेल, तर त्यांची निर्यात कमाई उत्पन्नाच्या वाढीसह ते समान राहू शकते किंवा घटू शकते. त्यामुळे देशासाठी विपरीत व्यवहारशेष संतुलन होऊ शकते.

**८) अन्योन्य मागणी** :-- वेगवेगळ्या देशांच्या उत्पादनाच्या परस्पर मागणीची तीव्रता भिन्न असल्याने बहुव्यापार व्यवहारांतर्गत देशाच्या व्यापाराच्या अटी वेगवेगळ्या देशांबरोबर वेगवेगळ्या पद्धतीने स्थापित केल्या जाऊ शकतात ज्यामुळे एक प्रकारे असंतुलन होऊ शकते.

**९) जागतिकीकरण** :-- अलीकडच्या काळात जागतिकीकरणामुळे वस्तू आणि सेवांच्या हालचाली आणि परदेशी गुंतवणूक वाढली आहे. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या स्पर्धात्मक वातावरणामुळे कांहीं देशांच्या व्यवहारशेषात तुट निर्माण झाली आहे.

## ५.४ सारांश

या प्रकरणात आपण व्यवहारशेषाच्या संरचनेचा अभ्यास केला आहे. व्यवहारशेष हे एखाद्या देशाचे उर्वरित जगाशी असणारे आर्थिक व्यवहाराचे सारणीबद्ध प्रतिनिधित्व आहे. त्यात चालू खाते, भांडवली खाते, त्रुटी आणि वगळणे आणि अधिकृत राखीव खाते असे एकूण

चार भाग असतात. चालू खात्यात वस्तू आणि सेवांची निर्यात आणि आयात असते तर भांडवली खात्यामध्ये आर्थिक मालमत्तेतील व्यवहार असतात. व्यवहारतोल हा दुहेरी नोंद पुस्तपालन प्रणालीवर आधारित आहे. या प्रणाली अंतर्गत खर्च आणि जमा बाजू समान असणे आवश्यक आहे. लेखांकनांच्या अर्थाने एकूण खर्च नेहमी एकूण जमेच्या बरोबरीचे असेल म्हणजे व्यवहारतोल नेहमी समतोल असेल. परंतु आर्थिक अर्थाने जर येणी ही देण्यांपेक्षा जास्त असतील तर व्यवहारशेष अनुकूल आहे असे म्हटले जाते तर येण्यांपेक्षा देणी मोठी असतील तर व्यवहारतोल प्रतिकूल आहे असे म्हटले जाते. लोकसंख्या वाढ , चलनवाढ, व्यापरचक्र, गुंतवणूकीची मागणी, आणि जागतिकीकरण यासारख्या विविध कारणांमुळे हे असंतुलन निर्माण होते.

## ५.५ प्रश्न

१) व्यवहारशेषाची संकल्पना आणि रचना स्पष्ट करा .

२) व्यवहारशेषाच्या चालू आणि भांडवली खात्याचे तपशीलवार वर्णन करा.

३) व्यवहारशेषाअंतर्गत स्वायत्त आणि अनुकूल प्रवाहाची संकल्पना स्पष्ट करा.

४) व्यवहारशेष नेहमी समतोलात असतो. चर्चा करा.

५) व्यवहारशेषातील असंतुलनाची कारणे स्पष्ट करा.

६) व्यवहारशेषातील असंतुलनाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

# ६

# व्यवहारतोल आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटन भाग -२

**घटक रचना**

६.० उद्दिष्टे

६.१ व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी उपाय

६.२ जागतिक व्यापार संघटनेची तत्वे आणि कार्ये

६.३ TRIPs ,TRIMs.आणि GATs कराराचा अभ्यास

६.४ भारतीय अर्थव्यवस्थेवर जागतिक व्यापार संघटनेचा प्रभाव

६.५ सारांश

६.६ प्रश्न

## ६.० उद्दिष्टे

१) व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी उपायांचे विश्लेषण करणे

२) जागतिक व्यापार संघटनेची तत्वे आणि कार्ये अभ्यासणे

३) TRIPs ,TRIMs आणि GATs कराराचा अभ्यास करणे

४) भारतीय अर्थव्यवस्थेवर जागतिक व्यापार संघटनेचा प्रभाव अभ्यासणे

## ६.१ व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी उपाय

### १) खर्च कमी करणारे धोरण :-

आयात कमी करण्याचा आणि त्याद्वारे व्यवहारशेषातील तूट कमी करण्याचा महत्त्वाचा मार्ग म्हणजे आर्थिक आणि वित्तीय धोरणे स्वीकारणे जे अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी कमी करण्याचा प्रयत्न करतात . अर्थव्यवस्थेत एकूण मागणी कमी झाल्याने आयात कमी होते आणि व्यवहारशेष संतुलनाची समस्या सोडवण्यासाठी मदत होते.

एकूण मागणी कमी करण्यासाठी दोन महत्त्वाच्या साधनांचा वापर केला जातो.

**१) कठोर आर्थिक धोरण आणि**

**२) संकुचित वित्तीय धोरण**

बँक कर्जाचे दर वाढवून आणि कर्जाची उपलब्धता मर्यादित करून एकूण मागणी तपासण्यासाठी कठोर आर्थिक धोरणाचा वापर केला जातो. यासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेकडून व्याजदर वाढविले जातात ज्यामुळे व्यापारी बँकांकडून आकारले जाणारे कर्जाचे दर वाढविले जातात. यामुळे व्यावसायिकांना गुंतवणूकीसाठी कर्ज घेण्यास आणि ग्राहकांना

munotes.in

टिकाऊ ग्राहकोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी कर्ज घेण्यापासून परावृत्त केले जाते . त्यामुळे गुंतवणूक आणि उपभोग खर्चात घट होते. याशिवाय बँकांचे रोख राखीव प्रमाण वाढवून आणि खुल्या बाजारात सरकारी रोख्यांची खरेदी विक्री करून गुंतवणूक आणि उपभोगाच्या उद्देशाने कर्ज देण्यासाठी कर्जाची उपलब्धता कमी केली जाते. एकूण मागणी कमी करण्याकडे कल असतो ज्यामुळे आयात कमी होण्यास मदत होते.

**२) संकुचित वित्तीय धोरण :-**राजकोशीय धोरण देखील एकूण मागणी कमी करण्याचे एक महत्वाचे साधन आहे. उत्पन्न करासारख्या प्रत्यक्ष करात वाढ झाल्याने एकूण मागणी कमी होईल. खर्चातील कपातीचा एक भाग म्हणून आयातीत घट होऊ शकते.उत्पादन शुल्क आणि विक्रीकर यासारख्या अप्रत्यक्ष करांमध्ये वाढ झाल्याने मागणीत घट होईल. इतर राजकोशीय धोरण उपाय म्हणजे सरकारी खर्च, विशेषतः अनुत्पादक खर्च कमी करणे. सरकारी खर्चात कपात केल्याने केवळ प्रत्यक्ष खर्च कमी होणार नाही तर अप्रत्यक्षपणे गुणकाच्या कार्यप्रणालीद्वारे हा खर्च कमी होईल. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की जर कठोर मौद्रीक आणि आकुंचनात्मक राजकोशिय धोरणे एकूण खर्च कमी करण्यात यशस्वी झाली तर किमती कमी होतात किंवा महागाईचा दर कमी होतो. यामुळे व्यवहारशेष संतुलन सुधारण्यासाठी दोन मार्गानी मदत होईल. प्रथम देशांतर्गत किंमती घसरल्याने लोक आयात वस्तूंऐवजी देशांतर्गत वस्तू खरेदी करण्यास प्रवृत्त होतील. आणि दुसरे म्हणजे देशांतर्गत किंमती कमी झाल्याने निर्यातीला चालना मिळेल. आयातीतील घसरण आणि निर्यातीतील यामुळे व्यवहारशेषातील तूट कमी होण्यास मदत होईल. तथापि, यावर पुन्हा जोर दिला जाऊ शकतो की आकुंचनात्मक आर्थिक आणि वित्तीय धोरणांद्वारे खर्च कमी करण्याची पद्धती मर्यादांशिवाय नाही. एकूण मागणी कमी झाल्याने गुंतवणूक कमी झाली तर याचा आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होईल. अशा प्रकारे आकुंचनात्मक वित्तीय धोरणाचा वापर करून व्यवहारशेषात सुधारणा केली जाऊ शकते.

**२) खर्च धोरणे बदलणे :-अवमूल्यन :-**

व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी वापरली जाणारी दूसरी पध्दती म्हणजे बदलत्या खर्च धोरणाचा वापर होय. खर्च बदलण्याची धोरणे सापेक्ष किमतीमध्ये बदल करून किंवा विनिमय दरांद्वारे कार्य करतात. देशांतर्गत उत्पादित वस्तू तुलनेने स्वस्त करून आयातीच्या किंमती वाढविल्या जातात. खर्च बदलण्याची धोरणे निर्यातीच्या किंमती कमी करू शकतात ज्यामुळे देशाच्या निर्यातीला प्रोत्साहन मिळेल. अशा प्रकारे किंमती बदलून खर्च बदलणे धोरण व्यवहारशेषातील असमतोल सुधारण्यासाठी मदत करतात. खर्च बदलणे धोरणाचा महत्त्वाचा प्रकार म्हणजे आपल्या चलनाचे अवमूल्यन करणे होय. अवमूल्यनाचा अर्थ असा आहे की इतर देशांच्या चलनाच्या संदर्भात देशांतर्गत चलनाचे मूल्य किंवा विनिमय दर कमी करणे होय. चलनाच्या अवमूल्यनामुळे आपल्या वस्तूंच्या किमती कमी होतात आणि आपली निर्यात वाढते आणि आयात महाग झाल्याने आयात कमी होण्यास मदत होते. आणि यामुळे आपल्या देशाचा व्यवहारशेषातील तूट भरून काढण्यासाठी मदत होते.

**मार्शल लर्नरची अट :-**

मार्शल लर्नरच्या अटीनुसार अवमूल्यन किंवा घसारा यामुळे निर्यात कमाई वाढेल आणि आयात खर्च कमी होईल की नाही हे निर्यातीसाठी परदेशी मागणी आणि आयातीसाठी देशांतर्गत मागणीच्या किंमत लवचिकतेवर अवलंबून असते. मार्शल आणि लर्नरच्या अटींमध्ये असे नमूद केले आहे की जर निर्यातीच्या किंमतीची लवचिकता आणि आयातीची किमत लवचिकता यांची बेरीज एकापेक्षा जास्त असेल तर अवमूल्यन धोरण व्यवहारशेषातील संतुलन सुधारण्यात यशस्वी होईल. अशा प्रकारे मार्शल लर्नर अटीनुसार अवमूल्यनाने व्यवहारशेष सुधारतो जर

$e x + e m > 1$ येथे $e x$ म्हणजे निर्यात किंमत लवचिकता

आणि $e m$ म्हणजे आयात किंमत लवचिकता

जर एखाद्या देशाच्या बाबतीत $e x + e m < 1$ असेल तर व्यवहारशेष स्थिती सुधारण्याऐवजी अवमूल्यनाचा समतोलावर विपरीत परिणाम होईल. आणि $e x + e m = 1$ असेल तर अवमूल्यनामुळे व्यवहारशेषातील असंतुलन अपरिवर्तीत राहील.

**३) अप्रत्यक्ष उपाय** :-- देश थेट उपाय देखील अवलंबू शकतात जे व्यवहारशेषात समतोल राखण्यासाठी आयात प्रतिबंधित करण्यास आणि निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी मदत करतील.

असे उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

**अ ) जकात दर :--** जकात दर म्हणजे आयातीवर लादलेले शुल्क आहे. जेंव्हा आयातीवर जकात लादली जाते तेव्हा आयात वस्तूंच्या किंमती जकातीच्या मर्यादेपर्यंत वाढतात. वाढलेल्या किमतीमुळे आयात वस्तूंची मागणी कमी होईल. आणि त्याच वेळी देशांतर्गत उत्पादकाना आयात पर्यायाची अधिक निर्मिती करण्यास प्रवृत्त केले जाईल.

**ब) कोटा पध्दती :--** कोटा पद्धतीअंतर्गत सरकार आयतदारांना विशिष्ट काळात विशिष्ट मर्यादेपर्यंत एखाद्या वस्तूची आयात करण्याची परवानगी देते. अशा प्रकारे कोटा पद्धतीने आयात नियंत्रित करून व्यवहारशेषातील असमतोल सुधारला जातो .

**क) निर्यात प्रोत्साहन :--** निर्यात वाढविण्यासाठी विविध मार्गांनी निर्यात वाढीला प्रोत्साहन दिले जाते. यामध्ये निर्यात प्रधान उद्योगांना स्वस्त दरात कर्जपुरवठा केला जातो तसेच अनुदान दिले जाते . करात सवलती दिल्या जातात. या सर्वांमुळे निर्यात वाढीला चालना मिळते आणि देशाचा व्यवहारशेषातील असमतोल सुधारण्यासाठी मदत होते .

**ड) विनिमय नियंत्रण :--** या अंतर्गत सर्व निर्यातदारांना त्यांचे परकीय चलन देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे समर्पण करण्याचे आदेश दिले जातात. आणि नंतर त्याचे परवानाधारक आयतदारांमध्ये ते रेशनिंग पध्दतीने वाटप केले जाते. आयातीच्या पूर्वपरवानगीशिवाय इतर कोणालाही आयात करण्याची परवानगी दिली जात नाही. आणि यामुळे आयात मर्यादित राहून व्यवहारशेषात सुधारणा होते.

## ६.२ जागतिक व्यापार संघटनेची तत्वे आणि कार्ये

### ६.२.१ परिचय

जागतिक व्यापार संघटना ही एक आंतर - सरकारी संस्था आहे जी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन करते आणि सुविधा उपलब्ध करून देते . आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करणारे नियम स्थापित करण्यासाठी, सुधारण्यासाठी आणि लागू करण्यासाठी सरकार या संस्थेचा वापर करतात. १ जानेवारी १९९५ रोजी ( GATT ) चे रूपांतर जागतिक व्यापार संघटनेत करण्यात आले. सध्या जगातील सर्वात मोठी संघटना म्हणजे जागतिक व्यापार संघटना आहे. सध्या या संघटनेचे एकूण १६४ देश सदस्य आहेत.

जागतिक व्यापार संघटना सहभागी देशांमधील वस्तू सेवा आणि बौद्धिक मालमत्तेमध्ये व्यापार कराराच्या वाटाघाटीसाठी

एक आराखडा प्रदान करून व्यापारी करार सुलभ करते. ज्याचे उद्दिष्ट सामान्यतः शुल्क, कोटा आणि इतर निर्बंध कमी करणे किंवा काढून टाकणे आहे. या करारावर सदस्य सरकारांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या कायदेमंडळाद्वारे मंजूर केली आहे. जागतिक व्यापार संघटना सहभागीच्या व्यापार कराराचे पालन करण्यासाठी आणि व्यापार संबंधित विवादांचे निराकरण करण्यासाठी स्वतंत्र विवाद निराकरण देखील प्रशासित करते. संघटना व्यापार भागीदारांमधील भेदभाव प्रतिबंधित करते , परंतु पर्यावरण संरक्षण, राष्ट्रीय सुरक्षा, आणि इतर महत्वाच्या उद्दिष्टांसाठी अपवाद प्रदान करते .

**६.२.२ जागतिक व्यापार संघटनेची तत्वे :--**जागतिक व्यापार संघटनेकडे सर्व सदस्य राष्ट्रांसाठी बंधनकारक धोरणांची एक चौकट आहे .ही व्यापारी तत्वे सदस्य राष्ट्रांमध्ये वस्तू आणि सेवांच्या मुक्त हालचालींना प्रोत्साहन देण्याचे काम करतात . जागतिक व्यापार संघटनेची तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

**१) गैर - भेदभाव :-** यात प्रमुख दोन घटक आहेत : सर्वात अनुकूल राष्ट्र नियम आणि समान वागणूक धोरण . हे दोन्ही वस्तू, सेवा आणि बौद्धिक मालमत्तेवरील जागतिक व्यापार संघटनेच्या मुख्य नियमांमध्ये अंतर्भूत आहेत, परंतू त्यांची अचूक व्याप्ती आणि स्वरूप या क्षेत्रामध्ये भिन्नता आहे ती पुढीलप्रमाणे आहे.

सर्वात पसंती राष्ट्र :-- यामध्ये सर्व सदस्य राष्ट्रांना सर्वात पसंती राष्ट्रांचा दर्जा दिला जातो. याचा अर्थ असा होतो की सर्व सदस्य राष्ट्रांना समान वागणूक दिली जाते. एका सदस्य राष्ट्रला दिलेली वागणूक किंवा कोणतीही व्यापारी सवलत इतर सर्व राष्ट्रांना द्यावी लागते. जागतिक व्यापार संघटना सर्वात पसंती राष्ट्र असा दर्जा दिलेल्या सदस्यांना उपडणासाठी व व्यापारासाठी समान वागणूक सुनिश्चित करते.

समान वागणूक :-- हे सदस्य राष्ट्रांचे स्वतःचे नागरिक आणि इतर देशांचे नागरिक यांच्यात भेदभाव करण्यास मनाई करते. परदेशी उत्पादनांना देशांतर्गत उत्पादनाप्रमाणेच वागणूक दिली जाते.

**२) मुक्त व्यापार :--** जागतिक व्यापार संघटनेचे उद्दिष्ट हे व्यापारातील अडथळे दूर करून व्यापार उदारीकरणाकडे आहे. जकात दर आणि अबकारी कर कमी करून किंवा काढून टाकून व्यापार मुक्त करण्याचे जागतिक व्यापार संघटनेचे उद्दिष्ट आहे. पुरोगामी उदारीकरणाद्वारे बाजारपेठ खुली करण्याचा विचार आहे.

**३) निष्पक्ष स्पर्धेला प्रोत्साहन देणे :--** जागतिक बाजारपेठेत स्पर्धेला प्रोत्साहन देणे हे जागतिक व्यापार संघटनेचे उद्दिष्ट आहे. जागतिक व्यापार संघटनेने जकातीचे दर कमी करण्यासाठी परवानगी दिली आहे. परंतु सदस्य राष्ट्रांना अनुदानित आयातीवर समकक्ष शुल्क लावण्याचे अधिकार दिले आहेत.

**४) बंधनकारक आणि पारदर्शकतेद्वारे अंदाज** :-- जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यांनी व्यापार प्रक्रियेशी त्यांच्या वचनबद्धतेचे बंधन घालणे आवश्यक आहे. हे बाजाराला भविष्यातील संधीचे स्पष्ट चित्र देते जे गुंतवणूक आणि व्यापाराला प्रोत्साहन देते आणि अधिक स्थिरता आणि पारदर्शकता आणते.

**५) सामाजिक विकास आणि आर्थिक सुधारणांना प्रोत्साहन :--** जागतिक व्यापार संघटनेची तत्वे अशा प्रकारे तयार केली जातात की जी विकसनशील देशांना त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सुधारणांमध्ये विशेष सहाय्य आणि वेळेत जागतिक व्यापार संघटनेच्या करारांची अंमलबजावणी करण्यासाठी लावचिकतेद्वारे समर्थन देतात. राष्ट्रांना जागतिक व्यापार बाजाराच्या बरोबरीने आणणे हा यामागचा उद्देश आहे.

**६.२.३ :--जागतिक व्यापार संघटनेची कार्ये :-**

**१) कराराची अंमलबजावणी करणे :- जागतिक व्यापार संघटना**

बहुपक्षीय व्यापार कराराची अंमलबजावणी, प्रशासन आणि क्रियाकलाप सुलभ करते. हे बहुपक्षीय व्यापार करारांच्या अंमलबजावणी आणि प्रशासनासाठी आराखडा प्रदान करते.

**२) वाटाघाटीसाठी मंच :-** जागतिक व्यापार संघटना सदस्यांना वाटाघाटी करण्याची आणि आपापसात व्यापार व्यवस्था ठेवण्याची संधी देते.

**३) विवादांचे निराकरण :-** सदस्य देश विविध मुद्द्यांवर व्यापार विवाद करू शकतात. जागतिक व्यापार संघटना विवादांचे निराकरण करण्यासाठी नियम आणि प्रक्रियांचे व्यवस्थापन करते.

**४) व्यापार धोरण पुनरावलोकन यंत्रणा:-** जागतिक व्यापार संघटना व्यापार धोरण पुनरावलोकन यंत्रणा प्रशासित करते. जागतिक व्यापार संघटना सदस्य राष्ट्रांमधील व्यापारी संबंध दृढ करण्यासाठी आराखडा प्रदान करते.

**५) इतर संस्थांबरोबर जागतिक व्यापार संघटनेचे सहकार्य :-** सुसंगत आर्थिक धोरण तयार करण्यासाठी जागतिक व्यापार संघटना ही आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आणि जागतिक बँक यासारख्या इतर संस्थांशी सहकार्य करते. यामुळे जागतिक व्यापार संघटनेचे कार्य आणखी प्रभावी होण्यास मदत होते.

## ६.३:-TRIPs , TRIMs आणि GATs कराराचा अभ्यास

**६.३.१:- बौद्धिक संपदा अधिकार ( TRIPs ) च्या व्यापार संबंधित पैलूंवरील करार :-**
TRIPs करार हा बौद्धिक संपदा अधिकाराचे संरक्षण हा बहुपक्षीय व्यापार प्रणालीचा अविभाज्य भाग बनवतो , जसे की हे जागतिक व्यापार संघटनेचे मूर्त स्वरूप आहे. या कराराला अनेकदा जागतिक व्यापार संघटनेच्या तीन " स्तंभापैकी एक " म्हटले जाते , इतर दोन म्हणजे वस्तूंचा व्यापार आणि सेवांचा व्यापार होय .

TRIPs च्या आधी बौद्धिक संपदा अधिकारांचे संरक्षण आणि अंमलबजावणीची व्याप्ती सर्व राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणात बदलत होती आणि बौद्धिक संपदा अधिकाराच्या व्यापारात ती अधिक महत्वाची बनल्यामुळे, हे फरक आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधांमध्ये तणावाचे कारण बनले. त्यामुळे अधिक सुव्यवस्था आणि अंदाज येण्यासाठी तसेच विवादांचे सुव्यवस्थितपणे निराकरण करण्यासाठी बौद्धिक मालमत्ता अधिकारासाठी नवीन नियम असणे शहाणपणाचे मानले जात होते. बौद्धिक संपदा अधिकाराच्या व्यापार संबंधित पैलूंवरील कराराने प्रथमच जागतिक व्यापार संघटनेने बहुपक्षीय व्यापार प्रणालीमध्ये बौद्धिक संपदा नियमांचा समावेश केला. बौद्धिक संपदा अधिकार हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा महत्त्वाचा भाग आहे. ते कॉपीराईट, पेटंट, ट्रेडमार्क, भौगोलिक नियम, औद्योगिक डिझाईन, लेटआउट डिझाईन असे अनेक प्रकार समाविष्ट करतात. बौद्धिक संपदा अधिकार काराराद्वारे अंतर्भूत असलेल्या बौद्धिक संपत्तीच्या प्रत्येक मुख्य क्षेत्राच्या संदर्भात हा करार प्रत्येक सदस्याद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या संरक्षणाची किमान मानके निश्चित करतो. विकसित देश बहुतेक बौद्धिक मालमत्तेचे मालक असतात. तर विकसित आणि विकसनशील दोन्ही देशांद्वारे त्यांचा वापर केला जातो. बौद्धिक संपदा अधिकार करार नियमांच्या अंमलबजावणीसाठी मानदंड आणि मानके प्रदान करतो . TRIPs करारांतर्गत, प्रत्येक देशाने बौद्धिक संपदा अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आपल्या देशांतर्गत कायद्यांमध्ये पुरेशी प्रक्रिया आणि उपाय तयार करणे आवश्यक आहे. TRIPs करारावरील विवाद हे जागतिक व्यापार संघटनेच्या विवाद निपटारा प्रक्रियेअतर्गत नियंत्रित केले जातात. जागतिक व्यापार करारांतर्गत, विकसित देशांना १ जानेवारी १९९५ पासून TRIPs कराराचे पालन करण्यासाठी १ वर्ष देण्यात आले होते. विकसनशील देशांना २००० पर्यंत ५ वर्षे देण्यात आली होती. तर कमी विकसित देशांना २००६ पर्यंत ११ वर्षे देण्यात आली होती जी औषधनिर्माण पेटंटसाठी २०१६ पर्यंत वाढवली आहे. याचा विकसनशील देशांवर होणारे परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

१) याच्या परिणामामुळे औषधनिर्माण आणि रसायनांसारख्या उत्पादनांच्या किंमतीमध्ये वाढ होऊ शकते .

२) नवकल्पनांचा अनुकूल परिणाम हा त्याच्या पुरवठ्यावर होईल.

३) विकसनशील देश नवीन तंत्रज्ञानाचे उत्पादक बनू शकतात.

४) TRIPs करारामध्ये संशोधन आणि विकास विकसित देशांकडून विकसनशील देशांमध्ये हस्तांतरित करण्यात मदत होऊ शकते.

### ६.३.२ व्यापार संबंधित गुंतवणूक उपाय ( TRIMs ) :-

TRIMs चा असा विश्वास आहे की व्यापार आणि गुंतवणूक यांच्यात मजबूत संबंध आहे. व्यापार संबधीत गुंतवणूक उपायांचे उद्दिष्ट जगभरातील सर्व गुंतवणूकदार सदस्यांना योग्य वागणूक देणे हे आहे. TRIMs करारात सांगितल्याप्रमाणे सदस्यांना त्यांच्या सध्याच्या TRIM ( व्यापार संबंधित गुंतवणूक उपायांच्या ) च्या विविध सेवा आणि वस्तूंची खरेदी आणि विक्री करण्यासाठी जागतिक व्यापार संघटना कौन्सिलला सूचित करावे लागेल जे कराराशी विसंगत आहेत.

TRIM ची मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

* हे फक्त वस्तूंच्या व्यापाराशी संबंधित गुंतवणूक उपायांना लागू होते .

* हे सेवा व्यापाराला लागू होत नाही .

* हे परदेशी उद्योग किंवा गुंतवणूकीच्या प्रवेशाचे नियमन करत नाही.

* हे आयात / निर्यात केलेल्या उत्पादनांच्या भेदभावपूर्ण वागणुकीबद्दल आहे.

* विकसित देशांच्या बाबतीत २ वर्षाचा, विकसनशील देशांच्या बाबतीत ५ वर्षे आणि कमी विकसित देशांच्या बाबतीत ७ वर्षाचा संक्रमण कालावधी , हा करार लागू झाल्यापासून, जो१ जानेवारी १९९५ आहे. या करारामध्ये समाविष्ट असलेले एक महत्वाचे बंधन हे आहे की सदस्यांनी कोणत्याही व्यापाराशी संबंधित गुंतवणूकीचे उपाय लागू करणार नाहीत जे राष्ट्रीय हिताच्या विसंगत असतील किंवा परिमाणवाचक निर्बंधांच्या सामान्य निर्मूलनाशी विसंगत असतील.

### ६.३.३ सेवा व्यापारावरील सामान्य करार ( GATs ) :-

सध्या जागतिक उत्पादन आणि रोजगारात सेवा क्षेत्राचा वाटा हा दोन तृतीयांश इतका असताना , त्या सेवा एकूण व्यापाराच्या २५ %पेक्षाजास्तप्रतिनिधित्वकरीतनाहीत . शिवाय, जरी सेवांचा त्यांच्या स्वतःच्या अधिकारात वाढत्या प्रमाणात वापर होत असला तरी त्या वस्तूंच्या उत्पादनात महत्वपुर्ण आदान म्हणून काम करतात. आणि परिणामी मूल्यवर्धित अटींमध्ये मूल्यमापन केल्यास सेवांचा जागतिक व्यापारात सुमारे ५० % वाटा असतो. GATS ची निर्मिती ही उरुग्वे फेरीतील ऐतिहासिक कामगिरीपैकी एक आहे. ज्याचे परिणाम जानेवारी १९९५ मध्ये लागू केले . GATS ची प्रेरणा आंतरराष्ट्रीय व्यापार नियमांची एक विश्वासार्ह आणि खात्रीची प्रणाली तयार करण्याच्या उद्देशाने होती ; सर्व सहभागीशी न्याय्य आणि समान वागणूक सुनिश्चित करणे , खात्रीशीर धोरण बंधनाद्वारे आर्थिक क्रियाप्रक्रियांना उत्तेजन देणे आणि प्रगतिशील उदारीकरणाद्वारे व्यापार आणि विकासाला चालना देणे ही उद्दिष्टे आहेत. GATs दोन आवश्यकतांवर आधारित आहेत . पहिला म्हणजे भेदभाव न करणे आणि दुसरे म्हणजे पारदर्शकता. GATs बहुपक्षीय नियमांचा संच प्रदान करतात जे पारदर्शकता आणि प्रगतिशील उदारीकरणाच्या अटींखाली सेवांमधील व्यापार नियंत्रित करतात . विकसनशील देशांना त्यांच्या स्वतःच्या विकासाच्या प्राधान्यक्रमाचा पाठपुरावा करण्यासाठी आणि पुढील वाटाघाटीमध्ये कोणत्या क्षेत्राचे

उदारीकरण करायचे हे ठरविण्यासाठी लवचिकता दिली जाते. GATs ने निर्माण केलेल्या संधीचा लाभ घेण्यासाठी विकसनशील देशांनी त्यांच्या सेवा क्षेत्रात सुधारणा करण्यास सुरुवात केली आहे. याचा या देशांना फायदा होईल आणि विकसनशील देशांच्या वाढीस मदत होईल.

## ६.४ भारतासारख्या विकसनशील देशांवर जागतिक व्यापार संघटनेचा प्रभाव

**फायदे :-**

**१) वाढलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा फायदा :-** जागतिक बँकेच्या मते, भारतासारख्या देशासाठी व्यावसायिक व्यापार वाढेल . वस्त्र, कृषी उत्पादने , खाद्यपदार्थ यासारख्या वस्तूंच्या वाढीमुळे व्यापारात वाढ होईल. यापैकी अनेक उत्पादनामध्ये भारताला उत्पादन आणि व्यापार करण्यात मोठा फायदा आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची कापड आणि कपड्यांच्या वस्तूंची निर्यात वाढल्याने भारताला फायदा होईल.

**२) धोरणांचे पुनरावलोकन करणे:-** जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापणेमुळे धोरणांचे पुनरावलोकन करणे आणि व्यापारी भागीदारांमधील विवाद सोडवणे यासाठी यासाठी यंत्रणा मजबूत झाली. या पायऱ्यांमुळे देशांना अडथळे सोडवण्यात आणि निर्यातीसाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश करण्यास मदत होईल.

**३) जकात दर कपात:-** औद्योगिक वस्तूंमध्ये मोठ्या प्रमाणात जकात दर कपात केली जाईल ज्यामुळे भारतासारख्या देशांना फायदा होईल. विकसनशील देशांना विकसित देशांच्या बाजारपेठेत प्रवेश मिळेल.

**३) GATs करार:-** GATs करार हा सेवांच्या व्यापारातील हक्क आणि बंधने परिभाषित करण्याची पहिली पायरी आहे . याचा फायदा भारतासारख्या देशांना फायदा होईल.

**४) TRIPs आणि TRIMs:-** TRIPs आणि TRIMs वरील करारामुळे जकातविरहित अडथळ्यांचा वापर रोखण्यात मदत झाली आहे आणि अवपुंजनविरोधी जकात , समकक्ष कराचे दर उपाय आणि सुरक्षा उपायांचा वापर यासंबंधीचे नियम मजबूत झाले आहेत . हे भारतासारख्या देशांसाठी अनुकूल असतील.

**तोटे :-**

**१) TRIMs:-** भारतासारख्या विकसनशील देशांसाठी, TRIMs करारातील तरतुदी स्वावलंबी विकासाच्या धोरणाच्या विरोधात आहेत. परकीय गुंतवणुकीवरील निर्बंध हटवल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशांतील महत्वाच्या उद्योगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न करू शकतात. TRIMs कराराचा परिणाम म्हणून देशांतर्गत उद्योगांना त्रास होऊ शकतो.

**२) TRIPs:-**TRIPs कराराचा विकसनशील देशांना फायदा होणार नाही कारण TRIPs कराराची पूर्ण अंमलबजावणी झाल्यास औषध उत्पादनाच्या किंमती वाढतील . अशा प्रकारे

पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्कच्या मदतीने बौद्धिक संपदा अधिकारांचे संरक्षण विकसित देशांना उपयुक्त ठरेल. नवीन वनस्पती वाणांचे पेटंट घेतल्याने लाभ बहुराष्ट्रीय कंपन्याना हस्तांतरित होईल.

**३) GATs:-** GATs केवळ आर्थिक, शिपिंग, वाहतूक आणि दळणवळण, आरोग्य यासारख्या सेवांच्या उदारीकरणाला महत्त्व देते. त्या क्षेत्रात विकसनशील देशांना विकसित देशांकडून असमान स्पर्धेला सामोरे जावे लागते.

**४) जागतिक व्यापार संघटनेच्या संरचनेत असमानता:-** जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार निर्णय घेतलेले युक्तिवाद श्रीमंत विकसित देशांना अनुकूल आहेत. विकसनशील देशांनी ते स्वीकारले पाहिजे. हे अन्यायकारक आहे कारण समायोजनाचा भार विकसनशील देशांना सहन करावा लागतो. विवाद निपटारा यंत्रणा श्रीमंत देशांच्या बाजूने आहे जी विकसनशील देशांना उपयुक्त नाही.

## ६.५ सारांश

या प्रकरणात आपण व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी देशांनी अवलंबलेल्या विविध उपाययोजना पहिल्या आहेत. व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी आकुंचनात्मक आर्थिक आणि राजकोशीय धोरणे वापरणे समाविष्ट आहे. तसेच अवमूल्यन धोरणाचा अवलंब करून हा असमतोल कमी करता येतो. इतर उपायामध्ये जकात दर, निर्यात प्रोत्साहन, आयात पर्यायीकरण, आणि विनिमय नियंत्रण यांचा समावेश होतो. जागतिक व्यापार संघटना ही एक आंतरसरकारी संस्था आहे जी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन आणि सुविधा देते. आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करणारे नियम स्थापित करण्यासाठी, सुधारण्यासाठी आणि लागू करण्यासाठी सरकार संस्थेचा वापर करतात. १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेने अधिकृतपणे कार्य सुरू केले. १९४८ साली स्थापन करण्यात आलेल्या GATT कराराच्या जागी बदलून जागतिक व्यापार संघटना स्थापन करण्यात आली.

जागतिक व्यापार संघटना ही जगातील सर्वात मोठी आर्थिक संस्था आहे. सध्या या संस्थेचे १६४ देश सदस्य आहेत. आणि ती सर्व जागतिक व्यापार आणि जागतिक GDP च्या ९८% पेक्षा जास्त व्यापाराचे प्रतिनिधित्व करतात. ते भेदभाव न करण्याच्या आणि प्रगतिशील उदारीकरणाच्या तत्वावर आधारित आहेत. TRIPs करार बौद्धिक संपदा अधिकारांचे रक्षण करण्यासाठी प्रदान करण्यात येणाऱ्या संरक्षणाची किमान मानके ठरवतो. व्यापार संबंधित गुंतवणूक उपायांचे ध्येय जगभरातील सर्व गुंतवणूकदार सदस्यांना न्याय्य वागणूक देणे हे आहे . GATs मध्ये सर्व सेवा क्षेत्र समाविष्ट आहे. इतर सदस्यांच्या सेवा प्रदात्यांना राष्ट्रीय हित आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे बंधन त्यात आहे. जागतिक व्यापार संघटना करारामुळे भारतासारख्या विकसनशील देशांना जागतिक व्यापार आणि जकात दर कमी करून फायदा होतो.

## ६.६ प्रश्न

१) व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी आर्थिक उपाय स्पष्ट करा.

२) व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी गैर - आर्थिक उपाय स्पष्ट करा.

३) व्यवहारशेषातील असंतुलन सुधारण्यासाठी अवमूल्यन आणि घसारा या संकल्पना स्पष्ट करा.

४) व्यवहारशेषातील असंतुलन कमी करण्यासाठी खर्च बदलण्याच्या धोरणाची चर्चा करा.

५) जागतिक व्यापार संघटनेचे महत्त्वाचे करार कोणते आहेत?

६) जागतिक व्यापार संघटनेच्या TRIPs आणि TRIMs कराराची चर्चा करा.

७) जागतिक व्यापार संघटनेच्या GATs आणि TRIMs कराराची चर्चा करा.

८) जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे आणि तत्वे काय आहेत?

९) GAT च्या संदर्भात जागतिक व्यापार संघटनेच्या कराराची चर्चा करा.

❖❖❖❖

munotes.in

**प्रकरण ४**

# ७

# विनिमय दर : भाग - १

**घटक रचना**


७.० उद्दिष्ट्ये

७.१ विनिमय दर म्हणजे काय ?

७.२ स्थिर विनिमय दर अर्थ आणि फायदे व तोटे

७.३ विनिमय दर निश्चिती

७.४ विदेशी चलनाच्या मागणीचे उद्देश / कारणे / हेतू

७.५ विदेशी चलनाच्या पुरवठ्याचे उद्देश / कारणे / हेतू

७.६ सारांश

७.७ प्रश्न


## ७.० उद्दिष्ट्ये

१. विनिमय दर ही संकल्पना समजावून घेणे.

२. स्थिर विनिमय दराचे फायदे व तोटे जाणून घेणे.

३. बदलत्या विनिमय दराचे फायदे व तोटे जाणून घेणे.

४. विनिमय दर निश्चिती समजावून घेणे.

५. विदेशी चलनाच्या मागणीचे उद्देश जाणून घेणे.

६. विदेशी चलनाच्या पुरवठ्याचे उद्देश जाणून घेणे.

आंतरराष्ट्रीय व्यवहारात दोन देशातील चलनांची देवघेव ज्या दराने होते त्या दराला विनिमय दर असे म्हणतात. एका देशातील चलनाची दुसऱ्या देशातील चलनात व्यक्त केलेली अधिकृत किंमत म्हणजे विनिमय दर होय. दोन देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार सुरु होण्यापूर्वी दोन देशांना विनिमय दर ठरविणे आवश्यक असते.

munotes.in

## ७.१ विनिमय दर म्हणजे काय?

ज्याप्रमाणे एखाद्या वस्तूची किंमत आपण आपल्या चलनात व्यक्त करतो. उदा. १ बॉलपेनची किंमत = १० रू. आहे. त्याच प्रमाणे एका देशाच्या चलनाचे मूल्य दुसऱ्या देशाच्या चलनात व्यक्त करणे म्हणजे विनिमय दर होय. उदा. १ डॉलर = ४९ रू., १ पौंड स्टर्लिंग = ७०. ५ रू., १ युरो = ६२. ३८ रू. इ. तेंव्हा आपण विनिमय दराच्या सहाय्याने दोन देशांतील वस्तू आणि सेवांची किंमत अप्रत्यक्षरित्या व्यक्त करत असतो.

थोडक्यात विनिमय दर म्हणजे काय हे सांगताना असे म्हणता येईल की, “ एका देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलनात व्यक्त केलेली अधिकृत किंमत म्हणजे विनिमय दर होय.”

## ७.२ स्थिर विनिमय दर म्हणजे काय?

सुवर्ण परिमाण पद्धतीत विनिमय दर सुवर्ण आयात बिंदू आणि निर्यात बिंदूनी नियंत्रित होत असत. त्यावेळी स्थिर विनिमय दर पद्धती अस्तित्वात होती. “ जेंव्हा दोन देशातील निश्चित झालेला विनिमय दर हा कायम असतो. त्यात बदल होत नाही. त्या विनिमय दरास स्थिर विनिमय दर असे म्हणतात.”

**स्थिर विनिमय दराचे गुण / फायदे / महत्व(बाजूचे मुद्दे):**

**१. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाढीसाठी:-** स्थिर विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होणाऱ्या व्यक्ति व संस्थामध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होऊन परकीय व्यापारात वाढ होते.

**२. निश्चितता:-** स्थिर विनिमय दरामुळे निर्यात व्यापाऱ्यांना निर्यातीपासून किती उत्पन्न मिळेल तसेच आयातदारांना आयातीपोटी किती रक्कम द्यावी लागेल याची निश्चित माहिती मिळते.यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात निश्चितता आणि विश्वासाचे वातावरण तयार होते.

**३. सट्टेबाजीला आळा:-** चलन मुल्यातील बदलांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात सट्टेबाजीचे व्यवहार होतात. परंतु विनिमय दर स्थिर राहात असतील तर सट्टेबाजीस आळा बसतो.

**४. परकीय गुंतवणूकीस चालना:-** विनिमय दरातील स्थिरतेमुळे परकीय भांडवल गुंतवणूकदारांमध्ये विश्वास आणि शाश्वतीचे वातावरण वाढीस लागते. त्यामुळे परकीय गुंतवणूकीला चालना मिळते.

**५. भांडवल बाजाराचा विकास:-** स्थिर विनिमय दरामुळेआंतरराष्ट्रीय भांडवल बाजारात विकास होण्यास पोषक वातावरण तयार होते. त्यातून आंतरराष्ट्रीय भांडवल बाजाराची निकोप वाढ होऊन त्याचा विकास होण्यास मदत होते.

**६. आर्थिक विकास:-** अल्पविकसित देशांना विकास कार्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली साधनसंपत्ती आयात करावी लागते. तसेच परदेशातून कर्जही घ्यावे लागते. अशा वेळी स्थिर विनिमय दर पद्धतीमुळे अशा भांडवली साधनसंपत्तीचा आणि कर्जाचा निश्चित अंदाज

येतो. त्यामुळे विकासासाठी लागणाऱ्या भांडवली साधनसंपत्ती आणि तंत्रज्ञान यांची आयात सुलभ होते.

**७. व्यापारी राष्ट्रांचा लाभ:-** जे देश आंतरराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून आहेत. अशा सर्व देशांना स्थिर विनिमय दर पद्धती हिताची ठरते. कारण स्थिर विनिमय दराने आंतरराष्ट्रीय व्यापारातील नुकसान टाळता येते.

**८. साधनसामग्रीचा पुरेपूर वापर:-** स्थिर विनिमय दर पद्धतीमुळे देशांतर्गत साधनसामग्रीचा पुरेपूर वापर होण्यास मदत होते आणि अपव्यय टाळला जातो.

**९. अल्प रोखतेवर व्यापार:-** स्थिर विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांना व्यापारासाठी निश्चित किती रक्कम लागेल याचा अंदाज येतो. त्यामुळे अकारण मोठी रक्कम जवळ बाळगण्याची गरज नाही.

**१०. विशिष्ट चलनासाठी उपयुक्त:-** आज कांही देशांच्या चलनाला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात बरेच महत्व प्राप्त झाले आहे.उदा. डॉलर गट, स्टर्लिंग गट इ. स्थिर विविमय दरामुळे या चलनगटाचे कामकाज सुलभ बनते आणि ते टिकून राहते.

**११. देशांतर्गत उद्योगाची उभारणी:-** विनिमय दरातील स्थैर्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी उत्पादन करणाऱ्या उद्योगांना फायदा आणि तोट्याचे अचूक अंदाज बांधता येतात. देशांतर्गत उद्योगधंद्याच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी स्थिर विनिमय दराचे धोरण आवश्यक आहे.

**१२. आर्थिक स्थैर्य:** - स्थिर विनिमय दरामुळे देशांतर्गत व्याजदर, वेतनदर इ.दर स्थिर राहतात. त्यामुळे देशात गुंतवणूक वाढून आर्थिक स्थिरता प्राप्त होते.

**१३. रोजगार वाढ:-** स्थिर विनिमय दर पद्धतीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मिळणारे स्थैर्य आणि गुंतवणुकीला मिळणारी चालना यातून देशात रोजगार आणि उत्पन्नात वाढ होते.

**१४. चलनवाढीलाआळा:-** आंतरराष्ट्रीय चलनवाढीचा धोका टाळण्यासाठी स्थिर विनिमय दराचे समर्थन केले जाते.

अशा रीतीने स्थिर चलनविषयक दराचे वरील सर्व फायदे आहेत. एकंदरीत स्थिर विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वासाचे वातावरण निर्माण होऊन देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते.

**स्थिर विनिमय दराचे दोष / तोटे / उणीवा (विरोधी मुद्दे):**

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थिर विनिमय दराचे जसे फायदे आहेत. तसेच त्याचेकांही तोटे देखील आहेत याची चर्चा पुढील प्रमाणे करता येईल.

**१. अंतर्गत स्थिरतेचा बळी:-** अनेक वेळा विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी देशांतर्गत किंमतींमध्ये मोठे बदल करावे लागतात. परंतु असे मोठे बदल केल्यास अंतर्गत स्थैर्य प्रस्थापित करणे कठीण जाते.

**२. स्वतंत्र चलनविषयक धोरणाचा अभाव**:-जेंव्हा देशातील चलन पद्धती ही आंतरराष्ट्रीय व्यवहारातून मिळणाऱ्या सुवर्ण आयात-निर्यातीशी निगडित असते.तेंव्हासंबंधित देशाला स्वतंत्र असे चलनविषयक धोरण आखता येत नाही. परिणामी देशांतर्गत किंमत पातळी, रोजगार पातळी इ. वर नियंत्रण ठेवता येत नाही आणि हा धोका मोठा असतो.

**३. आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढीला आधार नाही**:- स्थिर विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होते असे म्हटले जाते. परंतु प्रत्यक्षात तसे अनुभव नाहीत.

**४. वास्तवापासून दूर**:- सध्या कोणत्याही देशांमध्ये स्थिर विनिमय दराची संकल्पना अस्तित्वात नाही. त्यामुळे स्थिर विनिमय दराचे धोरण वास्तवात आढळत नाही.

**५. साधनसंपत्तीचा अयोग्य वापर**:- स्थिर विनिमय दरामुळे देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था ही व्यापारावर केंद्रित होते. त्यामुळे देशातील साधन संपत्तीचा वापर देशातील लोकांच्या गरजा पूर्ण करण्याऐवजी आंतरराष्ट्रीय बाजारासाठी केला जातो.या साधन संपत्तीचा वापर आपल्या लोकांसाठी होत नाही. थोडक्यात साधनसंपत्तीचा अयोग्य वापर होतो.

**६. विषमतेत वाढ**:- स्थिरविनिमयदराचा फायदा परदेशातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होतो. परंतु आपल्या देशातील नागरिकांना याचा फायदा होत नाही. त्यामुळे आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर वाढत जाते.

**७. कृत्रिम स्थैर्य**:- आंतरराष्ट्रीय व्यापारात आणि व्यवहारात जरी अस्थैर्य निर्माण झाले तरी विनिमय दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु हे स्थैर्य कृत्रिम असते. त्यासाठी राष्ट्रहिताचा बळी जातो तसेच काळाबाजार वाढीस लागतो.


**८. तेजी मंदी**:- स्थिर विनिमयदराचे धोरण स्वीकारल्यास परदेशात तेजी अथवा मंदी यासारख्या घडणाऱ्या घटना पासून देशाच्या अर्थव्यवस्थेचे नुकसान होते. हा स्थिर विनिमय दराचा तोटा आहे.

**९. अवमूल्यन**:- विनिमय दरात स्थिरता राखण्यासाठी बऱ्याच वेळा देशी चलनाचे अवमूल्यन करावे लागते.

अशा रीतीने वरील सर्व स्थिर विनिमयदराचे दोष आहेत.

## ७.३. विनिमय दराची निश्चिती

दोन भिन्न देशातील वेगवेगळ्या चलनाच्या अदलाबदलीचा दर म्हणजे विनिमय दर होय. दोन देशातील चलन हे वेगवेगळे असते. तसेच त्याचे बाजार मूल्यही वेगवेगळे असते. अशावेळी दोन देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार सुरू होण्यासाठी त्या दोन देशांना एकमेकांच्या चलनाच्या तुलनेत एकमेकांच्या चलनाचे मूल्य ठरवावे लागते. ज्याप्रमाणे वस्तूचे मूल्य हे वस्तूची मागणी आणि वस्तूंचा पुरवठा यावरून ठरते. त्याचप्रमाणे विनिमय दर हा सुद्धा विदेशी चलनाला असणारी मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा यावरून ठरते. हे पुढील आकृतीवरून स्पष्ट होईल.




**आकृती ७.१**

वरील आकृतीत OX अक्षावर विदेशी चलनाची मागणी व पुरवठा दर्शवविला आहे. तर OYअक्षावर विनिमय दर दर्शविला आहे.DD हा विदेशी चलनाच्या मागणीचा वक्र असून SS हा विदेशी चलनाचा पुरवठा वक्र आहे.विदेशी चलनाची मागणी आणिविदेशी चलनाचा पुरवठा यांचे संतुलन E बिंदूत झाले असून OP हा विनिमय दर निश्चित झाला आहे. तर ON ही विदेशी चलनाची मागणी पुरवठ्यांची समतोल नगसंख्या आहे. यावरून विदेशी विनिमय दर हा विदेशी चलनाची मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा यांच्या संतुलनाने ठरतो हे सिद्ध होते.

## ७.४ विदेशी चलनाच्या मागणीची कारणे / हेतू / उद्देश / घटक

**१. आयात वस्तूंचे मूल्य देण्यासाठी**:- देशातील उपभोक्त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी बराच बऱ्याच वेळा दुसऱ्या देशातून वस्तू आयात केल्या जातात. अशावेळी आयात मालाचे पैसे देण्यासाठी परकीय चलनाची मागणी केली जाते.

**२. कर्जाची परतफेड**:- विविध कारणांसाठी आपला देशइतर देशाकडून कर्ज घेतो. त्यामुळे या कर्जाची परतफेड करताना मुद्दल व व्याज देण्यासाठीआपल्या देशाला परकीय चलनाची गरज असते.

**३. दिलेले कर्ज**:- बऱ्याच वेळा आपल्या देशातील गुंतवणूकदार हे इतर देशात गुंतवणूक करतात. त्या गुंतवणुकीस केलेली गुंतवणूक किंवा दिलेले कर्ज असे म्हणतात. इतर देशांना कर्ज देण्यासाठी त्या देशाच्या चलनाची देशाला गरज असते.

**४. कर्जावरील व्याज**:-जेंव्हा एखाद्या देशाने इतर देशाकडून जे कर्ज घेतलेले असते.तेंव्हा या देशाला कर्ज फेडताना मुद्दल आणि कर्जावरील व्याज देण्यासाठी विदेशी चलनाची गरज असते.

**५. गुंतवणुकीवरील लाभांश**:- परकीय गुंतवणूकदारांनी आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी यासाठी सरकारकडून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जातात. ही गुंतवणूक

जर कर्जाच्या स्वरूपात असेल तर त्यावर व्याज द्यावे लागते. हा मोबदला विदेशी चलनात द्यावा लागतो. यासाठी विदेशी चलनाला मागणी असते.

**६. आर्थिक मदत**:-अनेक विकसित देश गरीब आणि विकसनशील देशाला आर्थिक विकासासाठी आर्थिक मदत देतात. ही मदत जर कर्जाच्या स्वरूपात असेल तरत्या कर्जाची परतफेड करताना मुद्दल आणि व्याज हे विदेशी चालनात द्यावे लागते.

## ७.५ विदेशी चलनाच्या पुरवठ्याची कारणे / उद्देश आणि हेतू

**१. निर्यात**:- आपल्या देशातून विदेशाला मालाची निर्यात करीत असताना आवश्यक त्या खर्चासाठी विदेशी चलनाची गरज भासत असल्याने त्यासाठी विदेशी चलनाचा पुरवठा केला जातो.

**२. दिलेल्या कर्जाची प्राप्ती**:-अनेक देशाला दुसऱ्या देशातील गुंतवणूकदारांनी आपल्या देशात गुंतवणूक करावी म्हणून त्यांना आकर्षित करावे लागते. अर्थात त्यासाठी त्यांना आकर्षक व्याज आणि सवलती दिल्या जातात. हे व्याज आणि सवलतीची रक्कम देण्यासाठी विदेशी चलनाचा पुरवठा करावा लागतो.

**३. अनुदान**:- देशावर नैसर्गिक आपत्ती सारखी संकटेही आकस्मीतपणे येत असतात. या संकटाचा सामना करण्यासाठी इतर देशाकडून अनुदान स्वरूपात अर्थसहाय्य मिळते. प्राप्त झालेल्या या अर्थसहाय्यापैकी अनुदानाची रक्कम सोडून उर्वरित इतर रक्कम विदेशी चलनाच्या स्वरूपात परत करावी लागते. त्यासाठी जास्तीचे विदेशी चलनलागते.

**४. देणग्या**:- अनेक विकसित देश हे अविकसित देशातील सामाजिक व शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक आणि आरोग्य विषयक विकासासाठी मोठ्या प्रमाणात देणग्या देतात. या देणग्यांची रक्कम देण्यासाठी विदेशी चलनाचा पुरवठा करावा लागतो.

**५. कर्जावरील व्याज**:-एखाद्या देशाला मिळालेल्या विदेशी कर्जावर व्याज देणे आवश्यक असते. हे व्याज विशिष्ट काळात कर्ज देणाऱ्या देशाच्या चलनात द्यावे लागते. यासाठी विदेशी चलनाचा पुरवठा केला जातो. अशा प्रकारे वरील सर्व कारणासाठी विदेशी चलनाचा पुरवठा आवश्यक असतो.

## ७.६ सारांश

आंतरराष्ट्रीय व्यवहारात दोन देशातील चलनांची देवघेव ज्या दराने होते त्या दराला विनिमय दर असे म्हणतात. एका देशातील चलनाची दुसऱ्या देशातील चलनात व्यक्त केलेली अधिकृत किंमत म्हणजे विनिमय दर होय. दोन देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार सुरु होण्यापूर्वी दोन देशांना विनिमय दर ठरविणे आवश्यक असते.

सुवर्ण परिमाण पद्धतीत विनिमय दर सुवर्ण आयात बिंदू आणि निर्यात बिंदूनी नियंत्रित होत असत. त्यावेळी स्थिर विनिमय दर पद्धती अस्तित्वात होती. “ जेंव्हा दोन देशातील निश्चित झालेला विनिमय दर हा कायम असतो. त्यात बदल होत नाही. त्या विनिमय दरास स्थिर विनिमय दर असे म्हणतात.”

दोन भिन्न देशातील वेगवेगळ्या चलनाच्या अदलाबदलीचा दर म्हणजे विनिमय दर होय. दोन देशातील चलन हे वेगवेगळे असते. तसेच त्याचे बाजार मूल्यही वेगवेगळे असते. अशावेळी दोन देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार सुरू होण्यासाठी त्या दोन देशांना एकमेकांच्या चलनाच्या तुलनेत एकमेकांच्या चलनाचे मूल्य ठरवावे लागते. ज्याप्रमाणे वस्तूचे मूल्य हे वस्तूची मागणी आणि वस्तूंचा पुरवठा यावरून ठरते. त्याचप्रमाणे विनिमय दर हा सुद्धा विदेशी चलनाला असणारी मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा यावरून ठरते.

## ७.७ प्रश्न

१. विनिमय दराची संकल्पना स्पष्ट करा.
२. स्थिर विनिमय दर म्हणजे काय? त्याचे फायदे आणि तोटे सांगा.
३. विनिमय दराची निश्चिती कशी होते ते स्पष्ट करा.
४. विदेशी चलनाच्या मागणी आणि पुरवठ्याचे उद्देश स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

# ८

# विनिमय दर :भाग -२

**घटक रचना**


८.०. उद्दिष्ट्ये

८.८. हजर किंवा तत्कालिक विनिमय दर म्हणजे काय ?

८.२. वायदा किंवा अग्रीम विनिमय दर म्हणजे काय ?

८.३. क्रयशक्ती समता सिध्दांत म्हणजे काय ?

८.४. परकीय विनिमय बाजार म्हणजे काय?

८.५. अवमूल्यन म्हणजे काय ?

८.६. विनिमय दर ठरविण्यात मध्यवर्ती बँकेची भूमिका

८.७. सारांश

८.८. प्रश्न


## ८.० उद्दिष्ट्ये

१. हजर किंवा तत्कालिक विनमय दराची संकल्पना समजावून घेणे

२. वायदा किंवा अग्रीम विनमय दराची संकल्पना समजावून घेणे

३. क्रयशक्ती समता सिध्दांत समजावून घेणे

४. परकीय विनिमय बाजाराची संकल्पना समजावून घेणे

५. अवमूल्यन आणि त्याचे फायदे व तोटे समजावून घेणे

७. विनिमय दर ठरविण्यात मध्यवर्ती बँकेची भूमिका जाणून घेणे

## ८.१ . हजर किंवा तत्कालिक विनमय दराची संकल्पना

परकीय चलनाची तात्काळ खरेदी करण्यासाठी जो दर निश्चित केला जातो. त्याला विनिमयाचा हजर दर किंवा तात्कालीक दर असे म्हणतात. उदा.१ डॉलर = ६२ रुपये असा दर सांगितला जातो. समजा हा बँकेच्या विक्रीचा दर असेल तर खरेदीचा दर हा १ डॉलर = ६१ रुपये असा सांगितला जातो. एका देशातून दुसऱ्या देशात रक्कम पाठवण्याचा जो खर्च येतो त्यावर विक्री दर व खरेदी दर यातील फरक अवलंबून असतो. चलन बदलून

देण्याची दलाली, विमा खर्च इ. खर्चाचा समावेश विनिमय दर ठरविताना होतो. बँक विदेशातील परकीय विनिमय बाजारातील विनिमय दर केंद्राकडे संदेश पाठवते व त्यामुळे खरेदीदाराला किंवा विक्रेत्याला विदेशी चलनाचे हस्तांतरण करता येते. या प्रकारचे व्यवहार साधारणत: दोन ते तीन दिवसात पूर्ण होतात.

## ८.२. वायदा किंवा अग्रिम विनिमय दर

विनिमय दरात विविध कारणांनी चढ-उतार होत असतात. परंतु हेच चढ-उतार जेंव्हा मोठ्या प्रमाणात होतात तेंव्हा मात्र विदेशी व्यापार करणाऱ्यांना मोठे नुकसान होऊ शकते. हे चढ-उतार तीव्र आणि अनिश्चित स्वरूपाचे असतात.त्यातून आयात-निर्यातीवर विपरीत परिणाम होतो. विदेशी व्यापारात गुंतलेल्या व्यापाऱ्यांना मोठ्या नुकसानीची धास्ती असते. या चढउतारापासून होणाऱ्या हानीपासून बचाव करण्यासाठी वायदा किंवा अग्रिम विनिमय दर हा एकमेव उपाय आहे.

**वायदा किंवा अग्रिम विनिमय दर:** एव्हिर यांच्या मते,“अग्रिम विनिमय दर हे विनिमय दराचे असे व्यवहार आहेत की, ज्याद्वारे भविष्यातील निश्चित वेळेला किंवा तारखेला पूर्ण करायच्या विनिमयाच्या खरेदीचे किंवा विक्रीचे दर ठरवण्यात येतात. उदा. समजा आज ०१ डॉलर = ३० रुपये असा विनिमय दर असताना एका भारतीय व्यापाऱ्याने अमेरिकेतील व्यापाऱ्याकडून ०१ लाख डॉलरचा माल आयात केला.तेंव्हा हे ०१ लाख डॉलर अमेरिकन व्यापाऱ्याला तीन महिन्यात द्यायचे आहेत.आणि ही रक्कम ०१ डॉलर = ३० रुपये या दराने ३० लाख रुपये इतकी होईल. समजा तीन महिन्यानंतर डॉलरचा भाव वाढला आणि तो ०१ डॉलर = बरोबर ३१ रुपये असा झाला तर अशा परिस्थितीत भारतीय व्यापाऱ्याला ३० लाख रुपया ऐवजी ३१ लाख रुपये हे अमेरिकन व्यापाऱ्याला द्यावे लागतील आणि या व्यवहारात भारतीय व्यापाराचे एक लाख रुपयाचे नुकसान होईल. होणारे हे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी भारतीय व्यापारी विनिमय बँकेकडून तीन महिन्यानंतर डॉलर खरेदी करण्याचा विचार हा आजच करून ठेवील.व तसा करार करेल. हा करार आजच्या आज०१ डॉलर = ३० रुपये या विनिमय दराने करण्यात येईल किंवा त्यापेक्षा थोड्या जास्त किंवा थोड्या कमी दरावर करण्यात येईल.

याउलट समजा भारतीय निर्यात दराने अमेरिकेला एक लाख डॉलरचा माल पाठविला आणि ही रक्कम त्याला तीन महिन्यानंतर मिळणार आहे.पण प्रत्यक्ष मात्र ही रक्कम किती मिळणार हे तीन महिन्यानंतरच्या विनिमय दरावर अवलंबून राहील.तेंव्हा जर हा दर कमी होऊन ०१ डॉलर = २९ रुपये इतका झाला तर भारतीय निर्यातदाराला एक लाख रुपयाचे नुकसान सहन करावे लागेल. असे नुकसान होऊ नये याकरिता भारतीय निर्यातदार विनिमय बँकेला एक लाख डॉलर तीन महिन्यानंतर विकण्याचा विचार हा आजच करून ठेवील. हा करार आजच्या आज०१ डॉलर = ३० रुपये या विनिमय दराने करण्यात येईल.हा करार किंवा विनिमय दर आजच निश्चित करतात. त्यामुळे तीन महिन्यानंतर किती रक्कम मिळेल याची निश्चित कल्पना आजच येते.

थोडक्यात “वर्तमान काळात ठरलेल्या ज्या दराने भविष्यकाळात खरेदी-विक्री होणार असेल त्या दराला वायदा किंवा अग्रिम म्हणतात.” या दरामुळे व्यापाऱ्याचे होणारे नुकसान टाळता येते.

## ८.३. क्रयशक्ती समता सिद्धांत

एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनाच्या स्वरूपातील मूल्य हे त्यांच्या विशिष्ट वेळी असलेल्या मागणी पुरवठ्याच्या स्थितीने निश्चित होते. चलनाचे मूल्य व क्रयशक्ती त्या-त्या देशातील वस्तू सेवांच्या स्वरूपात असते. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की,विनिमय दर त्या बिंदूवर स्थिर राहतो. जेथे दोन्ही देशांच्या चलनाची क्रयशक्ती समान होते. यालाच क्रयशक्ती समता सिद्धांत असे म्हणतात.

**क्रयशक्ती समतेचा अर्थ**:

क्रयशक्ती समता हा असाविनिमयदर आहे की, ज्या दरावर एका देशातील चलनाच्या विशिष्ट रकमेत त्या देशात जेवढी क्रयशक्ती / खरेदीशक्ती मिळते. तेवढीच क्रयशक्ती त्या दरावर परिवर्तित केल्यावर दुसऱ्या चलनातील रक्कमेने दुसऱ्या देशात प्राप्त होते. समजा भारतात ५० रुपयात जेवढ्या वस्तू मिळतात. तेवढ्याच वस्तू अमेरिकेत ०१ डॉलर मध्ये प्राप्त होतात. त्यामुळे ०१ डॉलर = ५० रुपये या दराने रुपया व डॉलर मध्ये परिवर्तन केले तर भारतात ५० रुपयात जेवढ्या वस्तू खरेदी करता येतात. तेवढ्याच वस्तू अमेरिकेमध्ये ०१ डॉलर मध्ये प्राप्त होतात. त्यामुळे ०१ डॉलर = ५० रुपये हा क्रयशक्ती खरेदी शक्ती समता दर होईल.

**क्रयशक्ती समतेचे मापन**:

क्रयशक्ती समानता दर शोधून काढण्यासाठी कॅसलने खालील सूत्र दिले आहे.

नवीन विनिमय दर = जुनाविनिमय दर x दोन देशातील किंमत निर्देशांक म्हणजेच,

$$\text{नवीन विनिमय दर} = \text{आधार वर्षातील विनिमय दर} \times \frac{\text{देशातील किंमत निर्देशांक}}{\text{विदेशी किंमत निर्देशांक}}$$

हा बदललेला विनिमय दर शोधून काढण्यासाठी पुढील सूत्र काढले आहे.

$R_p = R_b \, x P_१ / P_२$ म्हणून

$$Rp = Rb \times \frac{P_१}{P_२}$$

$R_p$= नवीनक्रयशक्ती समता दर

$R_b$= जुना किंवा मूळ क्रयशक्ती समता दर

$P_१$= आपल्या देशातील किंमत निर्देशांक

$P_२$ =दुसऱ्या देशाचा किंमत निर्देशांक

उदा:- समजा जुना किंवा मूळ विनिमय दर हा ०१ डॉलर =२० रुपये असा आहे. मूळ दरात बदल झालेला असून चालू वर्षात आपल्या देशाचा मूल्यनिर्देशांक ३०० आहे. आणि विदेशी देशाचा मूल्यनिर्देशांक २०० इतका आहे. अशा स्थितीत नवीन क्रयशक्ती दर खालील प्रमाणे होईल.

$$\text{नवीन शक्ती समता दर} = २० \times \frac{३००}{२००} = ३०$$

अर्थात या बदललेल्या किंमत परिस्थितीत अमेरिकेत ०१ डॉलर मध्ये जेवढ्या वस्तू मिळतात तितक्याच वस्तू भारतात तीस रुपयात मिळतात त्यामुळे आता नवीन विनिमय दर हा ०१ डॉलर =२० रुपयेऐवजी ०१ = ३० रुपये असा होईल.

**विनिमय दराचे क्रयशक्ती / खरेदी शक्ती समतेशी समायोजन:**

आपल्या वरील उदाहरणात क्रयशक्ती समानता आधारावर ०१ डॉलर = ३० रुपये असा दर आहे . आणि हा दर जर त्यापेक्षा वेगळा असेल तर आयात आणि निर्यातीमधील बदलाद्वारे क्रयशक्ती पुन्हा समानतेकडे आकर्षित होईल. हे पुढील उदाहरणावरून लक्षात येईल.

समजा प्रत्यक्ष विनिमय दर ०१ डॉलर = ३१ रुपये आहे. या दरावर डॉलरचे आणि रुपयाचे अनुक्रमे अधिमुल्यन व अवमूल्यन झाले आहे. क्रयशक्ती समता सिद्धांतानुसार भारतात ज्या वस्तू ३० रुपयात मिळतात.तेवढ्याच वस्तू अमेरिकेतून आयात करावयाच्या झाल्या तर भारताला ३१ रुपये द्यावे लागतात. कारण विनिमय दर हा ०१ डॉलर = ३१ रुपये असा आहे. त्यामुळे भारताला अमेरिकेच्या वस्तू महाग होऊन भारताचे आयात कमी होईल. याउलट अमेरिकेला त्यांच्या देशात ०१ डॉलरच्या बदल्यात ३० रुपयाच्या वस्तू मिळू शकतील. कारण क्रयशक्ती ०१ डॉलर = ३० रुपये इतकी निश्चित झाली आहे. परंतु अमेरिकेने मात्र भारतातून वस्तू आयात केल्या तर त्यांना ३१ रुपयांच्या म्हणजेच जास्त वस्तू मिळतील. कारण प्रत्यक्ष विनिमय दर हा ०१ डॉलर = ३१ रुपये असा निश्चित झाला आहे. त्यामुळे अमेरिकेला भारताची वस्तू स्वस्त दरात उपलब्ध होऊन भारताची निर्यात वाढेल.

अशा प्रकारे एका बाजूने भारताची आयात घटेल आणि दुसऱ्या बाजूने भारताची निर्यात वाढेल. परिणामी रुपयाची मागणी वाढेल आणि मग ०१ डॉलरच्या बदल्यात ३१ रुपया ऐवजी ०१ एक डॉलर = ३० रुपये मिळतील म्हणजेच पुन्हा विनिमय दर हा ०१ डॉलर = ३० रुपये इतका होईल.

याउलट समजा प्रत्यक्ष विनिमय दर ०१ डॉलर = ३० रुपये या क्रयशक्ती समता दरापेक्षा कमी म्हणजेच ०१ डॉलर = २९ रुपये असा असेल तर याचा अर्थ असा होतो की, या स्थितीत रुपयाचे अधिमुल्यन तर डॉलरचे अवमूल्यन झाले आहे.

समजा ०१ डॉलर = २९ रुपये या दराने भारताने अमेरिकेकडून वस्तू घेतल्या वर भारताला स्वदेशात जेवढ्या वस्तू घेण्यासाठी ३० रुपये द्यावे लागतात. तेवढ्या वस्तू २९ रुपयात मिळतील म्हणजेच स्वस्त दरात उपलब्ध होतील. कारण प्रत्यक्ष विनिमय दर हा

०१ डॉलर = २९ रुपये इतका आहे. स्वाभाविकच भारताची आयात वाढेल. अमेरिकेला मात्र भारतातून ०१ डॉलरच्या बदल्यात २९ रुपयात मिळू शकतील इतक्याच वस्तू मिळतील. त्यामुळे अमेरिकेची भारतातून होणारी आयात कमी होईल. त्यामुळे भारताची निर्यात कमी होईल. मात्र आयात वाढलेली असल्याने डॉलरची मागणी वाढून त्याची किंमत वाढेल. आता ०१ डॉलर मिळवण्याकरता २९ रुपयांपेक्षा जास्त रक्कम द्यावी लागेल. आणि हा दर पुन्हा ०१ डॉलर = ३० रुपये असा निश्चित होईल.

**क्रयशक्ती समता सिद्धांतावर टीका पुढील प्रमाणे:**

१) या सिद्धांतानुसार विनिमय दर क्रयशक्ती समता दरानुरूप असतो. परंतु क्रयशक्ती समतेच्या मापणात अनेक अडचणी असतात. क्रशक्तीचे मापन किंमत निर्देशांकाच्या आधारे केले जाते. परंतु निर्देशांकांच्या अनेक मर्यादा आहेत. दोन देशातील निर्देशांक काढताना विचारात घेतलेल्या वस्तू आणि त्यांचे स्वरूप ही भिन्न असल्यामुळे दोन देशातील किंमत निर्देशांक तुलनीय असतीलच असे नाही. किंमत स्थर ही सरासरी असते. त्यांच्या आधारावर निर्धारित विनिमय दर वास्तविक स्वरूपाचे असणार नाहीत.

२) आंतरराष्ट्रीय व्यापारात नवीन देश सामील झाला. तर त्याचा दोन देशांच्या पारंपारिक व्यापाराच्या मात्रेवर परिणाम होऊन विनिमय दर बदलेल.

३) विनिमय दरावर दोन देशातील वस्तूंच्या मागणी पुरवठ्यातील बदलांचाही परिणाम होतो.

४) आयात निर्यात करांचाही विनिमय दरावर परिणाम होतो. करांच्या सहाय्याने एखादा देश आपल्या विनिमय दर उच्च प्रतीचा राखू शकतो. समजा अमेरिकेने भारतीय मालावर आयात कर लावले तर भारतीय मालांची निर्यात कमी होईल. उलट भारत मात्र आयातीबाबत अमेरिकेवर अवलंबून असेल तर भारताला तसे करही लावता येणार नाहीत. व भारताला आयातही कमी करता येणार नाही. परिणामी या करामुळे भारतीय माल महाग झाल्यामुळे निर्यात घटेल आणि भारताचा विदेशी व्यापार प्रतिकूल होऊन विदेशी विनिमय दर वाढेल.

munotes.in

## ८.४. परकीय विनिमय दर बाजार

जगामध्ये प्रत्येक देशांचे चलन हे वेगवेगळे आहे. परिणामी एका देशाचे चलन हे त्या देशात कोठेही स्वीकारले जाते. पण इतर देशांमध्ये मात्र ते स्वीकारार्य नसते. कारण आपल्या देशातील चलन इतर देशात चालत नाही. अशा वेळेला दोन देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारातून जी देणी घेणी निर्माण होण्यासाठी दोन देशांना विनिमय दर ठरवावा लागतो. विनिमय दर म्हणजे एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनाच्या तुलनेत असणारे मूल्य ठरविणे होय. हा विनिमय दर जेथे ठरविला जातो त्या ठिकाणाला परकीय विनिमय बाजार असे म्हणतात. विदेशी चलनाच्या खरेदी विक्रीचे हे व्यवहार दलाल किंवा डीलर यांच्या माध्यमातून पूर्ण केले जातात. त्यामुळे विदेशी विनिमय बाजार हा एक सुसंघटित बाजार मानला जातो. एकदा काविनिमय दर निश्चित झाला की, मग दोन देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराला सुरुवात होते.

**परकीय विनिमय बाजारपेठेची कार्य पुढील प्रमाणे आहेत.**

**१. विदेशी चलन खरेदी विक्रीचे व्यवहार पूर्ण करणे:-** परकीय विनिमय बाजारपेठेत विदेशी चलनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार पार पाडले जातात.

**२. अधिकार पत्र गोळा करणे:-** विदेशी विनिमय बँकेकडून विदेशी चलनाच्या संदर्भातील अधिकार पत्र गोळा करून आयात करणाऱ्यांना किंवा इतर गरजूंना विकणे हे महत्त्वाचे कार्य आहे .

**३. क्रशक्तीचे हस्तांतरण:-** वस्तू आणि सेवांच्या क्रयशक्तींचे हस्तांतरण एका देशातून दुसऱ्या देशात करण्याचे कार्य हे विदेशी विनिमय बाजारपेठेत चालते.

**४. समाशोधन गृहाची उपलब्धता करून देणे:-** आंतरराष्ट्रीय स्तरावर आयात व निर्यातीच्या माध्यमातून जी देणी घेणी निर्माण होतात. त्याचे सर्व व्यवहार पूर्ण करण्यासाठी समाशोधनगृहाची व्यवस्था परकीय विनिमय बाजारपेठा करून देतात.

**५. संरक्षण:-** विनिमय दरात होणाऱ्या संभाव्य हानीपासून संरक्षण देण्याचे कार्य विदेशी विनिमय बाजारपेठ करते.

## ८.५. अवमूल्यन म्हणजे काय? अवमूल्यनाचे उद्दिष्ट / उद्देश / कारणे / हेतू

"चलनाच्या समानता दरामध्ये सोन्याच्या अगर एखाद्या परकीय चलनाच्या संदर्भात घट घडून आणणे म्हणजे चलनाचे अमूल्यन होय एखाद्या देशाच्या सरकारने कायद्याद्वारे आपल्या देशातील चलनाचा विनिमय दर कमी करणे म्हणजे चलनाचे अवमूल्यन होय."

समजा ०१ डॉलर = ७२ रुपये असा दर आहे आणि त्यानंतर हा दर ०१ डॉलर = ७५ रुपये इतका झाला. म्हणजे आपल्या चलनाचे अवमूल्यन झाले. म्हणजेच डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत कमी झाली. अवमूल्यनामुळे देशाची निर्यात वाढते आणि आयात कमी होते.

**अवमूल्यनाचे उद्देश / कारणे / हेतू:**

**१. देशाची निर्यात वाढविणे:-** अवमूल्यनामुळे देशाची निर्यात वाढते. कारण अवमूल्यनामुळे आपल्या वस्तू परकीयांना स्वस्त होतात. उदा. अमेरिकन व्यक्तीला ४०० रुपये किंमतीच्या कोल्हापुरी चप्पलसाठी ६ डॉलर द्यावे लागत होते. रुपयाच्या अवमूल्यनानंतर मात्र याच ४०० रुपये किंमतीच्या चप्पलसाठी अमेरिकन व्यक्तीला ५ डॉलर द्यावे लागतील. हीच स्थिती इतर वस्तूच्या बाबतीत पण लागू होते. त्यामुळे एकूण निर्यात वाढवण्यास मदत होते.

**२. आयात कमी करणे:-** अवमूल्यन करणाऱ्या देशाला परकीय वस्तू महाग पडतात. त्यामुळे आयातीत घट होते. कारण अमूल्यनाने आयात महाग होते. उदा. अवमूल्यनापूर्वी ज्या अमेरिकन पुस्तकाला १०० रुपये लागत होते. त्याच पुस्तकाला आता १२० रुपये द्यावे लागतात. याचा अर्थ आयात महाग होते.

**३. व्यवहार तोलातील तूट भरून काढणे**:- अवमूल्यनामुळे देशाची निर्यात वाढते व आयात कमी होते. परिणामी व्यवहारतोल अनुकूल होण्यास मदत होते. त्यामुळे गरीब देश व विकसनशील देश वेळोवेळी आपल्या चलनाच्या अवमूल्यन करतात.

**४. देशांतर्गत उत्पादन पातळी व रोजगार पातळी वाढविणे**:- अवमूल्यन केलेल्या देशाच्या चलनाचे बाह्यमूल्य कमी झाल्याने त्या देशाची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढते. निर्यात वाढीमुळे या देशात मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढते आणि या उत्पादन वाढीमुळे मोठ्या प्रमाणावर देशात उत्पादनाची आणि रोजगाराची पातळी मोठ्या प्रमाणावर वाढते.

**५. विशिष्ट देशातील बाजारपेठा काबीज करणे**:- एखाद्या किंवा कांही देशातील बाजारपेठा काबीज करण्यासाठी किंवा त्या देशाचे परकीय चलन मिळवण्याच्या हेतूने कांही वेळा अवमूल्यन केले जाते अथवा अमूल्यनामुळे मोठ्या प्रमाणावर विदेशी बाजारपेठा काबीज केल्या जातात. कारण अमूल्यनामुळे निर्यात वाढण्यास मदत होते.

**६. संरक्षक उपाययोजना**:कांही वेळा इतर देश आपल्या चलनाचे अवमूल्यन करतात. तेंव्हाकेवळ नाईलाजास्तव आपल्या देशातीलचलनाचे अवमूल्यन करावे लागते. उदा. १९४९ मध्ये भारतीय रुपयाचे अवमूल्यन करण्याइतकी रुपयाची स्थिती इतकीखालावली नव्हती. परंतु इंग्लंडने आणि इतर सर्व राष्ट्रांनी आपल्या चलनाचे अवमूल्यन केल्याने भारताला अवमूल्यनाशिवाय पर्याय राहिला नाही.

**अवमूल्यनाचे गुण / फायदे / महत्व :**

**१. देशाच्या निर्यातीत वाढ**:- चलनाचे अवमूल्यन करणाऱ्या राष्ट्रातील वस्तू परकीयांना कमी किंमतीत मिळतात. त्यामुळे अवमूल्यन करणाऱ्या देशातील वस्तूंची निर्यात इतर देशात वाढते.

**२. शिलकी अंदाजपत्रक**:- अवमूल्यनामुळे परकीय मदतीचे मूल्य वाढते तसेच आयात करांचे उत्पन्न वाढते. त्यामुळे संबंधित देशाच्या तुटीच्या अंदाजपत्रकाचे रूपांतरशिलकी अंदाजपत्रकात होते.

**३. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ**:- अवमूल्यनाच्या काळात आयातीवरील बंधने शिथिल होत असल्याने देशातील न वापरलेल्या स्थितीत पडून असलेली उत्पादक साधनसामग्री आणि उत्पादन सामर्थ्य वापरात आणणे शक्य होते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

**४. साधन सामग्रीचे हस्तांतरण**:- अवमूल्यनामुळे आयात पर्यायतेच्या धोरणात बदल घडून येतो आणि अत्यंत खर्चिक अशा आयात पर्यायता उद्योगाकडून साधनसामग्री काढून घेऊन ती अधिक किफायतशीर ठरणाऱ्या निर्यात उद्योजकाकडे उद्योगाकडे वळविले जाते.

**५. आयातीत घट**:- अमूल्यन करणाऱ्या राष्ट्राला परकीय वस्तू महाग पडतात. त्यामुळे त्यांच्या आयातीत घट होते.

**६. व्यवहार तोलातील तूट भरून काढणे**:- अवमूल्यनामुळे देशातील निर्यात वाढते. कारण त्यामुळे परकीयांना आपल्या वस्तू स्वस्त होतात. परंतु आपणाला परकीयांच्या वस्तू मात्र महाग होतात. त्यामुळे आपली आयात कमी होते. परिणामी देशाचा व्यवहार तोल सुधारतो.

**७. अनुकूल व्यापार शर्ती:-** अवमूल्यन करणाऱ्या राष्ट्रातील आयात निर्यात वस्तूंच्या मागणीची लवचिकता ही पुरवठ्याच्या लवचिकतेपेक्षा जास्त असेल तर संबंधित देशाच्या व्यवहारतोलावर त्याचा अनुकूल परिणाम होतो.

**८. देशातील उत्पादन व रोजगार पातळीत वाढ:-** अवमूल्यन झाल्यामुळे आपल्या चलनाचे बाह्य मूल्य कमी होऊन आपली आयात कमी होते आणि निर्यात वाढते. परिणामी देशांमध्ये विविध वस्तूंच्या उत्पादन वाढीला चालना मिळून देशात उत्पादन व रोजगार पातळी मोठ्या प्रमाणावर वाढण्यास मदत होते.

**९. संरक्षक उपाय:-** आपल्या चलनाचे आंतरराष्ट्रीय मूल्य घटले नसले तरीही अन्य राष्ट्रांनी त्यांच्या चलनाचे अवमूल्यन केले असेल तर त्याला प्रत्युत्तर म्हणून संरक्षण स्वरूपाची उपायोजना म्हणून चलनाचे अवमूल्यन केले जाते. त्यामुळे आपल्या चलनाचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील सापेक्ष महत्त्व टिकून राहते.

अशाप्रकारे चलनाच्या अवमूल्यनामुळे एक प्रकारे देशांमध्ये उत्पादन उत्पन्न व रोजगार वाढीला चालना मिळते.

**अवमूल्यनाचे दोष / तोटे किंवा उणिवा:**

चलनाच्या अवमूल्यनाचे पुढील कांही तोटे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला सहन करावे लागतात ते पुढील प्रमाणे आहेत.

**१. आयात महाग होते:-** चलनाच्या अवमूल्यनामुळे परदेशातून आयात होणाऱ्या वस्तू महाग होतात. त्यामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. उदा. भारताच्या बाबतीत जेंव्हा अमूल्यनानंतर परदेशातून कच्चामाल, परदेशी तंत्रज्ञान आयात करण्याची वेळ येते.तेंव्हा ते महाग दराने उपलब्ध होत असल्याने उत्पादन खर्चात मोठी वाढ होते.

**२. व्यवहार तोलावर प्रतिकूल परिणाम:-** जेंव्हाअवमूल्यन करणाऱ्या राष्ट्रातील आयात वस्तूंची मागणी ताठर असेल तर आयात वस्तूंच्या किंमतीत वाढ घडून येईल. वस्तूची मागणी पूर्ण ताठर असेल तर किंमत वाढत असूनही मागणी कमी होणार नाही आणि आयातीवर प्रचंड पैसा खर्च होईल आणि आपला व्यवहारतोल प्रतिकूल होईल.

**३. परकीय चलनाच्या मिळकतीत घट:-** अवमूल्यन करणाऱ्या राष्ट्राला अवमूल्यनानंतर पूर्वीइतक्याच वस्तूंची निर्यात करून कमी उत्पन्न मिळते. त्यामुळे व्यवहारतोल आणखी बिघडतो तसेच परदेशात वस्तूंची मागणी ताठर असेल तर अशा वस्तूंच्या निर्यातीपासून परकीय चलन कमी प्रमाणात मिळते.

**४. भाववाढ:-** चलनाच्या अवमूल्यनामुळे संबंधित देशातील उत्पादन खर्चाचे प्रमाण सतत वाढत जाते. परदेशातून केली जाणारी आवश्यक वस्तूंची आयात महाग झाल्याने अवमूल्यन करणाऱ्या देशातील उत्पादन खर्च वाढत गेल्याने अंतर्गत किंमतपातळीत वाढ होते. तसेच अवमूल्यन करणाऱ्या देशाची निर्यात वाढत असल्याने देशांतर्गत पुरवठा मागणीच्या मानाने कमी पडून देशांतर्गत भाववाढ होते.

**५. विदेशी कर्जाचा वाढता भार:-** अवमूल्यन करणाऱ्या राष्ट्रांनाविदेशातून घेतलेल्या कर्ज परत करावयाचे असते तेंव्हाविदेशी कर्जाचे व्याज आणि कर्जाच्या परतफेडीचा हप्ता यात वाढ होऊन कर्जाचे ओझे वाढत जाते.

**६. निर्यात वाढवण्यात अडचणी:-** जोपर्यंत निर्यात वाढीच्या मार्गातील अडचणी दूर होत नाहीत. तोपर्यंत केवळ चलनाच्या अवमूल्यनामुळे निर्यात वाढेल असे समजणे चुकीचे आहे. कारण निर्यात वाढवण्यात अनेक अडचणी निर्माण होतात.

**७. इतर देशांचा विरोध:-** चलनाचे अवमूल्यन करणाऱ्या राष्ट्राला इतर देशांनी विरोध केला तर केवळ अवमूल्यनामुळे निर्यात कृती घडवून येण्याची शक्यता कमी असते. तेंव्हा इतर प्रेरणा उपलब्ध करून दिल्याशिवाय निर्यात वाढू शकत नाही. यासाठी आयात कर आणि निर्यात कर यांचा एकत्रित विचार झाला पाहिजे.

**८. परावलंबन:-** दुसऱ्या देशाकडून आयात होणाऱ्या वस्तूवर अवलंबून असणाऱ्या राष्ट्रांना अवमूल्यन विशेष फायदेशीर ठरत नाही. कारण अवमूल्यनामुळे आयात मालाच्या किंमती वाढतात. आयातीतील जीवनावश्यक वस्तूचे प्रमाण मोठे असेल तर जास्त असेल तर राहणीमान खर्चात वाढ घडून येते.

**९. सट्टेबाजी:-** चलनाचे अवमूल्यन करण्याच्या धोरणात सट्टेबाजीचा मोठा धोका निर्माण होतो. एखाद्या देशातील किंमतपातळी इतर देशाच्या किंमतपातळीपेक्षा दीर्घकाळ जास्त दराने वाढत असेल. तर अशा देशाचे चलन संशयास्पद समजून सट्टेबाजीचे व्यवहार वाढतात. परिणामी अवमूल्यनाचा हेतू सफल होत नाही.

अशा प्रकारे अमूल्यनामुळे वरील कांही तोटेही उद्भवतात आणि त्याचे अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतात.

## ८.६. विनिमय दर ठरविण्यातील मध्यवर्ती बँकेची भूमिका

परकीय चलन दर स्थिर राखण्यासाठी भारताच्या मध्यवर्ती बँकेला महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. मुक्त अर्थव्यवस्थेत आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम करणाऱ्या घटकांमुळे विनिमय दरात मोठ्या प्रमाणात चढउतार होतात. अशा प्रकारचे बदल विकसनशील देशांना हानीकारक असतात. विनिमय दरात स्थैर्य राखण्यासाठी मध्यवर्ती बँक पुढील उपाययोजना करते.

**१. राखीव निधीतून चलन काढून देणे:** परकीय चलनाच्या राखीव निधीतून चलन काढून आयातीसाठी पुरविले जाते. त्यामुळे परकीय चलनाचा पुरवठा वाढतो व विनिमय दर कमी होण्यास मदत होते.

**२. व्यवहारशेषातील तूट भरून काढणे:** भांडवली स्वरूपात मिळालेल्या चलनाचा वापर करून देशातील व्यवहारशेषात चालू खात्यात निर्माण झालेली तूट कमी करण्याचा प्रयत्न केला जातो.

**३. अनावश्यक आयातीला प्रतिबंध:** परकीय चलनाचा वापर करून अनावश्यक आयातीला प्रतिबंध करण्यासाठी प्राधान्यक्रमानुसार परकीय चलनाचे वाटप आयातीसाठी



munotes.in

केले जाते. त्यामुळे परकीय चलनाचा अपव्यय थांबून चलन दर स्थिर राखण्यासाठी मदत होते.

**४. परकीय चलन नियंत्रण कायदा:** परकीय चलन व्यवस्थापन कायदा अंमलात आणून चलन दर निश्चितीसाठी प्रयत्न केले जातात.

**५. अवमूल्यन:** देशातील चलनाचे परकीय चलनात असलेले मूल्य मध्यवर्ती बँकेकडून कमी केले जाते. त्यामुळे आयात कमी होण्यास मदत होते. परदेशात निर्यात वाढते त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात होणारी तूट भरून काढण्यासाठी मदत होते.

**६. चलनसंकोच:** आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढण्यासाठी व भाववाढ रोखण्यासाठी चलन संकोचाचा मार्ग अवलंबला जातो. तसेच व्यापारी बँकाद्वारे निर्माण होणाऱ्या पतपैशावर नियंत्रण आणले जाते.

अशा प्रकारे विनिमय दर स्थिरतेसाठी मध्यवर्ती बँक प्रयत्न करते.

**भारतातील विनिमय दर पद्धती :**

जेव्हा देशातील मध्यवर्ती बँक ही देशातील सर्वच आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करून विनिमय दर नियंत्रित करण्यासाठी प्रयत्न करते. त्यावेळेस मध्यवर्ती बँकेच्या भूमिकेस अथवा धोरणास विनिमय नियंत्रणाचे धोरण असे म्हणतात. विनिमय नियंत्रणाच्या सहाय्याने मध्यवर्ती बँक परकीय चलन निर्यातदारांना बँकेत जमा करण्यास प्रवृत्त करते. व आयात करणाऱ्यांना परवान्यांचे वाटप करून आयातीचे प्रमाण निश्चित केले जाते. यासंदर्भात मध्यवर्ती बँक १) विनिमय दर मर्यादेत ठेवणे २) विनिमय दर स्थिर निधी३) विनिमय निश्चित दर असे मार्ग अवलंबते.

**अ) विदेशी खाती गोठविणे:** या धोरणानुसार विदेशी  भांडवलदार , गुंतवणूकदार यांना गुंतवणुकीबद्दल किंवा भांडवलाबद्दल दिले जाणारे व्याज किंवा लाभांश त्यांना त्यांच्या देशाच्या चलनात न देता आपल्या देशाच्या चलनात दिले जाते. ही रक्कम त्यांच्या खात्यात जमा केली जाते. त्यामुळे त्यांना त्यांची प्राप्ती देशातच खर्च करावी लागते. पाकिस्तानमध्ये नवाज शरीफचे सरकार उलथवून सत्तेवर आलेल्या लष्करी सरकारने स्वीस बॅंकेतील संपत्ती राष्ट्रीयीकृत घोषित करून विदेशी खाती गोठविली.

**ब) स्थगिती :** जेंव्हा देशात विदेशी चलनाची तीव्र टंचाई निर्माण होते आणि विदेशी चलन उपलब्ध करून देणे अवघड होते त्यावेळेस संबंधित देशाशी स्थगिती करार करून त्यांची देणी काही काळासाठी स्थगित ठेवण्यात येतात. ही राशी एकदम देण्यापूर्वी हप्त्याने देण्याची व्यवस्था करण्यात येते. राशी परत करण्याची मुदत वाढविली जाते.

**क) विदेशी विनिमय दराचे समाशोधन:** हा करार देशातील परदेशी चलनांच्या मुक्त व्यवहारात अदान - प्रदान करण्यावर प्रतिबंध घालतो. केंद्रीय बँक देशातील देशाबाहेरील व्यापाऱ्यांना द्यावयाचे किंवा आलेले चलन स्वतःकडे ठेवून घेते आणि संबंधित पक्षास देशाचे चलनदेते . या रक्कमेचा उपयोग विदेशीकर्जाची परतफेड करण्यासाठी केला जातो.

**ड) हानिपूर्ती करार :** दोन देशात व्यापार होऊनही देशांना करावे लागणारे शोधन हे विदेशी चलनाचा उपयोग न करता देखील पूर्ण करण्यात येतात. त्या करारास हानीपुर्ती क्षतीपूर्ती करार असे म्हणतात. अशा व्यवहारास मध्यवर्ती बँकेचे सहकार्य असते.

भारताला विनिमय नियंत्रणाचे कार्य रिझर्व बँक ऑफ इंडिया कडे १९४७ पासून देण्यात आले आहे. त्यासाठी विनिमय नियंत्रण कायदा मंजूर करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारास विदेशी विनिमय हे पूरक समजले जातात.

## ८.७. सारांश

परकीय चलनाची तात्काळ खरेदी करण्यासाठी जो दर निश्चित केला जातो. त्याला विनिमयाचा हजर दर किंवा तात्कालीक दर असे म्हणतात. उदा.१ डॉलर = ६२ रुपये असा दर सांगितला जातो. समजा हा बँकेच्या विक्रीचा दर असेल तर खरेदीचा दर हा १ डॉलर = ६१ रुपये असा सांगितला जातो. एका देशातून दुसऱ्या देशात रक्कम पाठवण्याचा जो खर्च येतो त्यावर विक्री दर व खरेदी दर यातील फरक अवलंबून असतो.

एव्हिर यांच्या मते,“अग्रिम विनिमय दर हे विनिमय दराचे असे व्यवहार आहेत की, ज्याद्वारे भविष्यातील निश्चित वेळेला किंवा तारखेला पूर्ण करायच्या विनिमयाच्या खरेदीचे किंवा विक्रीचे दर ठरवण्यात येतात.

एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनाच्या स्वरूपातील मूल्य हे त्यांच्या विशिष्ट वेळी असलेल्या मागणी पुरवठ्याच्या स्थितीने निश्चित होते. चलनाचे मूल्य व क्रयशक्ती त्या-त्या देशातील वस्तू सेवांच्या स्वरूपात असते.

“चलनाच्या समानता दरामध्ये सोन्याच्या अगर एखाद्या परकीय चलनाच्या संदर्भात घट घडून आणणे म्हणजे चलनाचे अमूल्यन होय एखाद्या देशाच्या सरकारने कायद्याद्वारे आपल्या देशातील चलनाचा विनिमय दर कमी करणे म्हणजे चलनाचे अवमूल्यन होय.”

## ८.८. प्रश्न

१. विदेशी विनिमय दराचे हजर किंवा तत्कालीक दर आणि वायदा दर किंवा अग्रिम दर हे प्रकार स्पष्ट करा.

२. क्रयशक्ती समता सिद्धांतस्पष्ट करा.

३. परकीय विनिमय बाजाराची संकल्पना स्पष्ट करा.

४. अवमूल्यन म्हणजे काय? त्याचे फायदे आणि तोटे सांगा.

५. विनिमय दर ठरविण्यातील मध्यवर्ती बँकेची भूमिका स्पष्ट करा.

❖❖❖❖

***Revised Syllabus of Courses of B.Com. Programme at Semester V and VI with effect from the Academic Year 2022-2023***

# *Question Paper Pattern*

## *(Theoretical Courses)*

Maximum Marks: 100

Questions to be set: 06

Duration: 03 Hrs.

All Questions are Compulsory Carrying 15 Marks each.

| Question No | Particular | Marks |
|---|---|---|
| Q-1 | Objective Questions<br>A) Sub Questions to be asked 12 and to be answered any 10<br>B) Sub Questions to be asked 12 and to be answered any 10<br>(*Multiple choice / True or False / Match the columns/Fill in the blanks) | 20 Marks |
| Q-2<br><br>Q-2 | Full Length Question<br>***OR***<br>Full Length Question | 15 Marks<br><br>15 Marks |
| Q-3<br><br>Q-3 | Full Length Question<br>***OR***<br>Full Length Question | 15 Marks<br><br>15 Marks |
| Q-4<br><br>Q-4 | Full Length Question<br>***OR***<br>Full Length Question | 15 Marks<br><br>15 Marks |
| Q-5<br><br>Q-5 | Full Length Question<br>***OR***<br>Full Length Question | 15 Marks<br><br>15 Marks |
| Q-6<br><br><br><br>Q-6 | A) Theory questions<br>B) Theory questions<br>***OR***<br>Short Notes<br>To be asked 06<br>To be answered 04 | 10 Marks<br>10 Marks<br><br>20 Marks |

***Note:***

***Theory question of 15 marks may be divided into two sub questions of 7/8 or 10/5 Marks.***

munotes.in